# समकालीन भारत आणि शिक्षण

**घटक 1. शिक्षण आणि सामाजिक विविधता**

**उद्दिष्टे**

1. विद्यार्थ्यांना सामाजिक विविधतेची संकल्पना समजण्यास मदत करणे.
2. विद्यार्थ्यांना विविधतेचे स्तर समजण्यास मदत करणे.
3. विद्यार्थ्यांना विविधतेच्या पार्श्वभूमीवर बालकाच्या विकासामध्ये शिक्षकाची भूमिका समजण्यास मदत करणे.
4. विद्यार्थ्यांना शांततेचा अर्थ समजण्यास मदत करणे.
5. विद्यार्थ्यांना शांततेसाठीच्या शिक्षणाची ध्येय व उद्दिष्टे समजण्यास मदत करणे.
6. विद्यार्थ्यांना सहजीवनासाठी शांतता शिक्षण समजण्यास मदत करणे.
7. विद्यार्थ्यांना शांततेसाठी शिक्षणाचा अभ्यासक्रम समजण्यास मदत करणे.
8. विद्यार्थ्यांना शांततेसाठी शिक्षणाची आवश्यकता समजण्यास मदत करणे.

प्रस्तावना

भारतीय समाज हा विविधतेने नटलेला आणि ऐतिहासिक वारसा असलेला समाज आहे. भारतीय समाजामध्ये विविधता आढळून येते. मानवी जीवनातील मूलभूत तत्वज्ञान भारतीय समाजाने मांडले आहे. भारतात नैसर्गिक आणि सामाजिक विविधता मोठ्या प्रमाणात आहे. भारतात हिंदू, मुस्लिम, जैन, ख्रिश्चन, पारसी, बौद्ध, शिख इत्यादी धर्माचे, जाती व संप्रदायाचे लोक राहतात. भारतीय समाजातील लोकांची भाषा, रितीरिवाज, रुढी, परंपरा या वेगवेगळया आहेत. यामुळे भारतात सामाजिक विविधता मोठ्या प्रमाणात आहे. असे असले तरी विविधतेत एकता हे भारताचे खास वैशिष्ट्य आहे. आपल्या देशाच्या ऐक्याचे आधारभूत तत्त्व म्हणून या तत्त्वाचा पुरस्कार केला आहे.

**सामाजिक विविधता**

" समाजामध्ये आढळून येणाऱ्या भाषिक, प्रादेशिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, जातीय विविधतेस सामाजिक विविधता म्हणतात."

" मानव आपल्या आचार - विचारातून, प्रथा व रूढी परंपरेतून व वेशभूषा, राहणीमान,विविध भाषा यामधून आपले जीवनमान विविध स्वरूपात निर्माण करीत असतो याला सामाजिक विविधता किंवा सामाजिक भिन्नता म्हणतात "

" भारतीय समाजात हिंदू, मुस्लिम, शिख, ख्रिश्चन, जैन बौद्ध, पारशी इत्यादी धर्मांचे लोक विविध स्वरूपात आपआपल्या धर्माचे आचरण व पालन करतात यालाच धर्मातील सामाजिक विविधता असे म्हणतात."

" विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे परिस्थितीमुळे विविध प्रदेशातील लोकांचे राहणीमान व जीवनमान वेगवेगळ्या स्वरूपात दिसून येत असते. यालाच सामाजिक विविधता म्हणतात."

**ब) सामाजिक विविधतेचे स्तर**

आपल्या देशात सामाजिक विविधतेचे स्तर पुढील प्रमाणे दिसून येतात.

1. वैयक्तिक/व्यक्तीगत विविधता
2. प्रादेशिकता विविधता
3. भाषिक विविधता
4. धार्मिक विविधता
5. जातीय विविधता
6. जमातीय विविधता /आदिवासी घटक
7. आर्थिक विविधता
8. राजकीय विविधता
9. सांस्कृतिक विविधता

**क ) विविधतेच्या पार्श्वभूमीवर बालकाच्या विकासामध्ये शिक्षणाची भूमिका**

भारतात विविध कारणामुळे मोठ्या प्रमाणात सामाजिक विविधता असलेली दिसून येते. भारतीय समाजात अनेक धर्म जाती जमाती भाषा आहेत. या सर्वांचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वावर पडत असतो. भारतामध्ये असणाऱ्या सामाजिक विविधतेमध्ये बालकांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यामध्ये शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे. विविधतेच्या पार्श्वभूमीवर बालकांचा विकास घडवून आणण्यामध्ये शिक्षकांना पुढील प्रमाणे भूमिका पार पाडावी लागते.

1. विद्यार्थ्यांची वैयक्तिक भिन्नता विचारात घेऊन त्यांची बुद्धिमत्ता, आवड निवड क्षमता कौशल्य यांचा विचार करून विद्यार्थ्यांना अध्यापन करावे.
2. भारतीय संविधानामध्ये सांगितलेल्या विविध मुल्यांची रुजवणूक करावी.
3. विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीचा परिचय करून द्यावा.
4. शाळेमध्ये सर्व जाती धर्मातील विद्यार्थी मिळून मिसळून सहभोजन करतील अशी जेवणाची व्यवस्था करावी.
5. आपण सर्वजण भारतीय आहोत हा संस्कार विद्यार्थ्यांवर करावा.
6. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता घडवून आणण्यासाठी विविध कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन करावे.
7. शिक्षकांनी शाळेत जातीवाचक शब्द टाळावेत. कोणत्याही समाजाचे किंवा जमातीचे वर्णन करताना अल्पसंख्यांक, मागासलेले, अनुसूचित यासारख्या शब्दांचा वापर टाळावा.
8. विद्यार्थ्यांना भारतीय संविधान, राष्ट्रीय चिन्ह, राष्ट्रीय फूल, राष्ट्रीय पक्षी, राष्ट्रध्वज इत्यादींची जाणीव करून द्यावी.
9. विद्यार्थ्यांची सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक पार्श्वभूमी विचारात घेऊन शिक्षण द्यावे.
10. विद्यार्थ्यांना त्यांना समजेल अशा त्यांच्या बोलीभाषेतून शिक्षण देण्याचा प्रयत्न करावा.
11. सर्वधर्म, भाषा, संस्कृती, कला, साहित्य यांचा समन्वय साधून सर्वसमावेशक अशा कार्यक्रमांचे आयोजन करावे.
12. भारतामध्ये आढळून येणाऱ्या विविधतेला नैसर्गिक परिस्थिती कशी कारणीभूत आहे याची विद्यार्थ्यांना जाणीव करून द्यावी.
13. शिक्षकांनी विविध जाती धर्मातील विद्यार्थ्यांच्या विचारांचा व मतांचा आदर करावा. तसेच न्याय स्वातंत्र्य समता बंधुता या तत्त्वांचा पुरस्कार करावा.
14. विद्यार्थ्यांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता शिक्षकांनी लोकशाही जीवन पद्धतीचा अवलंब करावा.
15. विद्यार्थ्यांना सर्व धर्मातील थोर संत, महात्मे, यांची चरित्रे सांगावीत. सर्व धर्मातील सुवचने, सुभाषिते, सुविचार यांचे अर्थ मुलांना सांगावेत.
16. विविध धर्मातील मूलभूत अशा समान तत्वांची विद्यार्थ्यांना ओळख करून द्यावी.
17. देशाची उज्वल परंपरा, संस्कृती, तत्त्वज्ञान याविषयी विद्यार्थ्यांमध्ये अभिमान निर्माण करावा.
18. जात, धर्म, पंथ, प्रांत, भाषा याबाबतीतील सर्व भेद दूर करून मी भारतीय आहे अशी भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करावी.
19. विद्यार्थ्यांना भारतीय इतिहास, भूगोल, संस्कृती, कला व साहित्य यांचा परिचय करून द्यावा.
20. शिक्षकाने शाळेत जाती, धर्म, भाषा, संप्रदाय या आधारावर पक्षपात करू नये.
21. विद्यार्थ्यांना राष्ट्रहिताच्या दृष्टीने विघातक असणाऱ्या बाबींची किंवा घटनांची माहिती करून द्यावी.
22. विद्यार्थ्यांना धर्मनिरपेक्ष मूल्ये, लोकशाहीचे मुल्ये, नैतिक मूल्ये यांचे शिक्षण द्यावे.

**ड ) सहजीवनासाठी शांतता शिक्षण**

प्रास्ताविक

जगातील प्रमुख समस्यांपैकी दहशतवाद ही एक फार मोठी गंभीर समस्या आहे. सध्या संपूर्ण जगामध्ये अराजकता, अस्थैर्य, दहशतवाद हिंसाचार यांनी थैमान घातले आहे. यातून समाज विघातक शक्ती निर्माण होत चालल्या आहेत हे सर्व थांबविण्यासाठी समाजात शांतता प्रस्थापित होणे गरजेचे आहे. पहिल्या महायुद्धानंतर जगामध्ये अशांतता निर्माण झाली यावर उपाय म्हणून 1918 मध्ये जागतिक शांतता हा विचार प्रवाह सुरू झाला पण त्याचा फारसा परिणाम झाला नाही. नंतर जगामध्ये दुसरे महायुद्ध झाले या युद्धामध्ये जीवित हानी व आर्थिक हानी मोठ्या प्रमाणात झाली हे सर्व पाहून जागतिक शांतता निर्माण करण्याची व टिकविण्याची गरज सर्वच  राष्ट्रांना वाटू लागली यातूनच 24 ऑक्टोबर 1945 रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाली याची प्रमुख उद्दिष्टे जगात शांतता टिकविणे. सर्व राष्ट्रांना सार्वभौमत्वाची व प्रादेशिक अखंडत्वाची जोपासना करणे, राष्ट्रा-राष्ट्रांत निर्माण होणारे तंटे शांततेच्या मार्गाने सोडविणे व जगात आर्थिक व सामाजिक विकास साधणे ही होती 1980 मध्ये स्वीडन याठिकाणी शांततेसाठी शिक्षण हा कार्यक्रम भरला त्यानंतर अनेक देशांमध्ये शांततेसाठीच्या शिक्षणाचे उपक्रम सुरू केले.

**शांततेचा अर्थ व व्याख्या**

1. ' कोणावरही अन्याय,अत्याचार, युद्ध, दंगे न लादता सुखी जीवन जगणे म्हणजे शांतता होय '

2. ' राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय किंवा वैयक्तिक स्तरावर कोणत्याही स्वरुपाची हिंसक वृत्ती न करणे म्हणजे शांतता होय.'

**शांततेसाठी शिक्षण व्याख्या**

1. ' शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीमध्ये शांततामय सहजीवनाची मनोवृत्ती निर्माण करणे म्हणजे शांततेसाठी शिक्षण होय. '
2. ' स्वतःबरोबर आणि निसर्गासहित इतरांबरोबर सुसंवाद साधण्यासाठी आवश्यक असणारी मुल्ये, दृष्टिकोन आणि कौशल्य रुजवण्यासाठी दिले जाणारे शिक्षण म्हणजे शांततेसाठी शिक्षण होय.' - NCERT अभ्यासक्रम आराखडा 2005.

**शांततेसाठीच्या शिक्षणाची ध्येये किंवा उद्दिष्टे**

1. विद्यार्थ्यांना महत्त्व पटवून देणे.
2. त्यांना शांततामय जीवनासाठी प्रवृत्त करणे.
3. वैश्विक नागरिकत्वाची भावना निर्माण करणे.
4. शांततामय सहजीवनाची मनोवृत्ती निर्माण करणे.
5. विविध स्तरावरील शांततेसाठी कार्य करणाऱ्या संस्थांचा परिचय करून देणे.
6. समाजातील हिंसक घटनांचे दुष्परिणाम विद्यार्थ्यांना समजावून देणे.
7. मानवता या धर्माची मुल्ये जोपासण्यास मदत करणे.
8. आपल्या राष्ट्राबरोबरच इतर राष्ट्राबद्दल सहिष्णुता बाळगण्याची वृत्ती जोपासणे.
9. जगातील विविध संस्कृत्यांच, धर्माचा अभ्यास करण्यास मदत करणे.
10. संकुचित मनोवृत्ती झुगारून देऊन वैश्विक भावना निर्माण करणे. NCERT च्या अभ्यासक्रम आराखड्यात पुढील उद्दिष्टे दिलेली आहेत.
11. प्रत्येकाला मूलभूत हक्क आणि कर्तव्ये यांची जाणिव करुन देणे.
12. भारतीय संस्कृतीमधील शांततेच्या शिक्षणाचे दाखले विद्यार्थ्यांना देणे.
13. दारिद्य, हिंसा, निरक्षरता, अनारोग्य, हुंडा पद्धती जातिभेद या समस्यांच्या विरुद्ध लढण्यासाठी मनोभूमिका तयार करणे.

**शांततेसाठी शिक्षणाचा अभ्यासक्रम**

जपान मध्ये 1999 साली Teacher Education for Peace and International Understanding या विषयावर सेमिनार भरला होता. यामध्ये अभ्यासक्रमाचे पुढील घटक ठरवण्यात आली आहेत.

1. मानवी हक्क आणि जबाबदाऱ्या
2. लोकशाही सहिष्णुता
3. परस्पर सामंजस्य
4. अंतर्गत शांतता आणि सुसंवाद
5. मानवाची प्रतिष्ठा
6. चिरंजीवी विकास
7. आंतरराष्ट्रीय सहकार्य
8. सामाजिक न्याय
9. विविधतेतून एकता

**शांततेसाठी शिक्षणाची आवश्यकता / गरज / महत्व**

सध्या जगात धर्म, वंश, राष्ट्र वर्ण यांच्या नावाखाली विनाकारण संघर्ष होत आहेत. अतिरेकी हल्ले, दहशतवादी हल्ले जातीय दंगली हिंसाचार यामुळे अनेक निष्पाप जीवांचे, बळी विनाकारण जातात. समाजामध्ये अशांतता, असुरक्षितता, अस्थैर्य निर्माण होते हे थांबविण्यासाठी आणि मानवाची, समाजाची, राष्ट्राची आणि जगाची प्रगती करण्यासाठी शांतते शिवाय पर्याय नाही. समाजामध्ये शांतता निर्माण करण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे.

1. राष्ट्राराष्ट्रामधील कलह व मतभेद दूर करण्यासाठी.
2. समाजातील सुरक्षितता वाढविण्यासाठी.
3. समाजातील अस्थिरता कमी करण्यासाठी.
4. शस्त्रास्त्र निर्मितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी.
5. विज्ञान तंत्रज्ञानाचा वापर सुज्ञपणे करण्यासाठी.
6. भोगवादी प्रवृत्ती नष्ट करण्यासाठी.

7. मानव जातीचे कल्याण करण्यासाठी.
8. दहशतवादी व हिंसक प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी.
9. मानवतावादाचा पुरस्कार करण्यासाठी.
10. वैश्विक नागरिकत्वाची भावना निर्माण करण्यासाठी.
11. समाज व राष्ट्राची प्रगती करण्यासाठी.
12. शांततेसाठी कार्य करणाऱ्या संस्थांचा परिचय होण्यासाठी.

**शांतता निर्मितीचे विविध घटक / शालेय विषयातून शांततेसाठीचे शिक्षण**

1. **भाषा**

   भाषा हे दोन व्यक्तींना जोडणारे महत्त्वाचे साधन आहे. विविध भाषांच्या साहित्याच्या अभ्यासामुळे व्यक्तीचा दृष्टिकोन विशाल होतो. भाषांच्या साहित्यांच्या अभ्यासामुळे जगातील लोक परस्परांना समजून घेऊ शकतात. त्यामुळे त्यांच्यात विश्वबंधुत्वाची भावना निर्माण होऊन शांतता वाढीस लागण्यास मदत होते.

2. **इतिहास**

   इतिहासाच्या अभ्यासामुळे विविध देशात होऊन गेलेल्या थोर पुरुषांच्या कार्याचा व व्यक्तिमत्त्वाचा परिचय होतो. थोर पुरुषांच्या कार्याने मानवता धर्म कसा विकसित झाला जग समृद्ध कसे झाले हे लक्षात येते. इतिहासाच्या तुलनात्मक अभ्यासातून विविध देशांच्या संस्कृतीचा अभ्यास होतो इतिहासाच्या अभ्यासातून विविध घटना चे दुष्परिणाम लक्षात येतात त्यामुळे विश्वाला शांततेची गरज आहे याची जाणीव होते.

3. **भूगोल**

   भौगोलिक परिस्थितीने मानवी समाजाचे नियंत्रण होत असल्यामुळे कोणताही देश स्वयंपूर्ण ठरू शकत नाही हे भूगोलचा अभ्यासातून समजते. यातील सर्वच देश एकमेकांच्या सहकार्यावर अवलंबून आहेत. जागतिकीकरणामुळे व उदारीकरणामुळे हे विश्वच एक कुटुंब झाले आहे. विश्व व्यापार करण्यासाठी विश्वशांती शिवाय पर्याय नाही हे विद्यार्थ्यांच्या लक्षात येते.

4. **नागरिकशास्त्र**

   नागरिक शास्त्र विषयातून आक्रमक राष्ट्रवाद विनाश करतो तर डोळस राष्ट्रवाद विकास करतो हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावे.
   आपल्या हक्काच्या जाणवे बरोबरच दुसऱ्यांच्या अधिकारावर गदा येणार नाही याची दक्षता घ्यावी.
   नागरिक शास्त्र विषयातून जागतिक शांतता व सुरक्षितता यांचे महत्त्व पटवून देता येते.

5. **विज्ञान**

   विज्ञान विषयांच्या माध्यमातून जगातील विविध ठिकाणच्या शास्त्रज्ञांनी मानवाचे जीवन समृद्ध केले, आनंदी केले. त्यांनी आपल्या देशाबरोबरच संपूर्ण माणूवसमूहाचा, विश्वाचा विचार केला आहे हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावे. आजही दैनंदिन जीवनात विज्ञान क्रांतिकारक बदल घडवीत आहे. त्यातून जगात शांतता कायम राहावी अशी शिकवण विद्यार्थ्यांना द्यावी.

6. **गणित**

   भाषा ही एक जागतिक भाषा असून जगातील चिन्हे, भाषा, कल्पना सर्व ठिकाणी समान आहेत. गणित हा जीवनाचा पाया आहे. गणिताने जगाला शून्याची कल्पना, दशांश पद्धती या मौल्यवान देणग्या दिल्या आहेत. या विषयातून ही विश्वबंधुत्व व शांतीची जोपासना करता येते.

7. **विविध कला**

   भाषेशिवाय भावनांचा अभिषेक करणारे प्रभावी व परिणामकारक माध्यम म्हणजे विविध कला. प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या कलेमध्ये रममान होत असते. त्यातून त्या व्यक्तीला आनंद मिळतो. त्यांच्या अंतकरणात शांती समाधान मिळते. व्यक्तीचे जीवन शांततामय होऊन समाज जीवन शांततामय होण्यास मदत होते.

**शांततेसाठी शिक्षणामध्ये शिक्षकाची भूमिका / शिक्षकांनी राबवायचे उपक्रम / कार्यक्रम**

1. **शिक्षकांचा दृष्टीकोण वस्तुनिष्ठ असावा.**
2. **शिक्षकाने चांगल्या बाबींचा आदर करावा.**
3. विद्यार्थ्यांमध्ये शांततेचे संस्कार करण्यासाठी शिक्षक सदैव तत्पर असावा.
4. विविध प्रकारच्या गोष्टी, गाणी, कथा, खेळ यातून शांततेचे महत्त्व पटवून द्यावे.

5. शिक्षकांना स्वतःमधील दोष व मर्यादा यांची जाणीव असावी.
6. वैश्विक शांततेसाठी कार्य केलेल्या थोर व्यक्तींचा परिचय करून द्यावा.
7. शाळेमध्ये शांततेने संदर्भातील पथनाट्य, परिषदा, संवाद यांचे आयोजन करावे.
8. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदत, दौरे आयोजित करावे.
9. दहशतवाद, युद्धे, हिंसाचार यांचे दुष्परिणाम चित्रफितीच्या माध्यमातून दाखवावेत.
10. शांततेसाठी पूरक योग, ध्यानधारणा इत्यादी शिबिरांचे आयोजन करावे.
11. दैनंदिन अध्यापनातून विद्यार्थ्यांमध्ये संस्कार निर्मिती करावी.
12. विद्यार्थ्यांमध्ये मानवतावादी मूल्यांची रुजवणूक करावी.
13. मध्ये शांततेसंदर्भातील विविध फिल्म दाखविणे.

**सारांश**

**अ) सामाजिक विविधता संकल्पना**

समाजामध्ये आढळून येणाऱ्या भाषिक, प्रादेशिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, जातीय विविधेस सामाजिक विविधता म्हणतात.

ब) **विविधतेचे स्तर**

1. व्यक्तिगत/ वैयक्तिक विविधता
2. प्रादेशिक विविधता
3. भाषिक विविधता
4. धार्मिकतेचा विविधता
5. जातीय विविधता / जातीयता
6. जमातीय विविधता
7. आर्थिक विषमता
8. राजकीय विविधता
9. सांस्कृतिक विविधता

क) **विविधतेच्या पार्श्वभूमीवर बालकाच्या विकासामध्ये शिक्षणाची भूमिका**

भारतात विविध कारणामुळे मोठ्या प्रमाणात सामाजिक विविधता असलेली दिसून येते. भारतीय समाजात अनेक धर्म, जाती, जमाती, भाषा आहेत. या सर्वांचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वावर पडत असतो. भारतामध्ये असणाऱ्या सामाजिक विविधतेमध्ये बालकांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यामध्ये शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे.

**ड ) सहजीवनासाठी शांतता शिक्षण**

**शांततेचा अर्थ व व्याख्या**

' राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय किंवा वैयक्तिक स्तरावर कोणत्याही स्वरूपाची हिंसक वृत्ती न करणे म्हणजे शांतता होय '

**शांततेसाठी शिक्षण व्याख्या**

**' शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीमध्ये शांततामय सहजीवनाचे मनोवृत्ती निर्माण करणे म्हणजे शांततेसाठी शिक्षण होय '.**

**शांततेसाठीच्या शिक्षणाची ध्येये किंवा उद्दिष्टे**

**शांततेसाठीच्या शिक्षणाचा अभ्यासक्रम**

जपान मध्ये 1999 साली Teacher Education for Peace and International Understanding या विषयावर सेमिनार धरला होता. यामध्ये अभ्यासक्रमाचे घटक ठरवण्यात आले.

**शांततेसाठी शिक्षणाची आवश्यकता**

समाजामध्ये अशांतता, असुरक्षितता, अस्थैर्य निर्माण होते. हे सर्व थांबविण्यासाठी आणि मानवाची, समाजाची, राष्ट्राची आणि जगाची प्रगती करण्यासाठी शांतते शिवाय पर्याय नाही. समाजामध्ये शांतता निर्माण करण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे.

**शालेय विषयातून शांततेसाठीचे शिक्षण**

1. **भाषा**
2. **इतिहास**
3. **भूगोल**
4. **नागरिकशास्त्र**

5. **विज्ञान**
6. **गणित**
7. **विविध कला**

**शांततेसाठी शिक्षणामध्ये शिक्षकाची भूमिका**

शिक्षकाचा दृष्टिकोण वस्तुनिष्ठ असावा. शिक्षकाने चांगल्या बाबींचा आदर करावा. विद्यार्थ्यांमध्ये शांततेचे संस्कार करण्यासाठी शिक्षक सदैव तत्पर असावा. विविध प्रकारच्या गोष्टी, गाणी, कथा, खेळ यातून शांततेचे महत्त्व पटवून द्यावे. वैश्विक शांततेसाठी कार्य करणाऱ्या थोर व्यक्तींचा परिचय करून द्यावा. दहशतवाद, युद्धे, हिंसाचार यांचे दुष्परिणाम चित्रफितीच्या माध्यमातून दाखवावेत.

**स्वाध्याय**

**प्रश्न 1. रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

1. विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे विविध प्रदेशातील लोकांचे राहणीमान व जीवनमान वेगवेगळ्या स्वरूपात दिसून येत असते यालाच……………….. म्हणतात.

अ) जातीय विविधता ब) सामाजिक विविधता
क) भाषिक विविधता ड) धार्मिक विविधता

2. व्यक्ती व्यक्तीमध्ये आढळून येणाऱ्या भिन्नतेला किंवा फरकाला……………….. म्हणतात.

अ) सामाजिक विविधता ब) भाषिक विविधता
क) धार्मिक विविधता ब) व्यक्तिगत विविधता

3. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीमध्ये शांततामय सहजीवनाची मनोवृती निर्माण करणे म्हणजे……………………… होय.

अ) वैयक्तिक शिक्षण ब) शांततेसाठी शिक्षण
क) कृतियुक्त अध्यापन ड) सहजीवनासाठी अध्ययन

4. गणिताची भाषा ही एक……………. भाषा असून गणिताची चिन्हे, भाषा, कल्पना सर्व ठिकाणी समान आहेत.

अ) प्रादेशिक ब) भौगोलिक क) जागतिक ड) खाजगी

5. शांततापूर्ण शिक्षणाने सामूहिक जीवनात…….. भावना रुजविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

अ) देशप्रेमाची ब) स्वाभिमानाची
क) विश्वबंधुत्वाची पड) कौटुंबिक प्रेमाची

6. समाजामध्ये आढळून येणाऱ्या भाषिक, प्रादेशिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, जातीय विविधतेस…………. विविधता म्हणतात.

अ) नैसर्गिक ब) सामाजिक क) भौगोलिक ड) प्रांतिक

7. ………….. रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाली.

अ) 20 ऑक्टोबर 1945. ब) 24 ऑक्टोबर 1945.
क) 30 ऑक्टोबर 1945. ड) 25 सप्टेंबर 1945.

8. भारताचे पहिले पंतप्रधान………….. यांनी शांततामय सहजीवनाचा पुरस्कार केला.

अ) लाल बहादूर शास्त्री. ब) पंडित जवाहरलाल नेहरू.
क) इंदिरा गांधी. ड) राजीव गांधी.

प्रश्न 2. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.
(शब्दमर्यादा 250)

1. सामाजिक विविधता ही संकल्पना स्पष्ट करा.
2. शालेय विषयातून शांततेसाठीचे शिक्षण कसे द्याल?
3. विविधतेच्या पार्श्वभूमीवर बालकाच्या विकासामध्ये शिक्षणाची भूमिका स्पष्ट करा.
4. शांततेसाठीच्या शिक्षणाची उद्दिष्टे स्पष्ट करा.

प्रश्न 3. सामाजिक विविधता म्हणजे काय? भारतातील सामाजिक विविधतेचे स्तर स्पष्ट करा.

प्रश्न 4. सहजीवनासाठी शांततापूर्ण शिक्षणाची गरज स्पष्ट करा व तुमच्या शाळेमध्ये शांततापूर्ण शिक्षण कसे राबवते सविस्तर विशद करा.

प्रश्न 5. सामाजिक विविधतेचे स्तर कोणते ? त्याचा शिक्षणामध्ये उपयोग कसा कराल ते सोदाहरण स्पष्ट करा.

**मराठी संदर्भ ग्रंथ सूची**

**1. डॉ. तापकीर दत्तात्रय, डॉ.निर्मला तापकीर**
**(2008, शिक्षणाचे तात्त्विक व समाजशास्त्रीय अधिष्ठान प्रकाशन, पुणे.)**
**2. डॉ. करंदीकर सुरेश डॉ. मीना मंगरूळकर.(2010, उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, फडके प्रकाशन, कोल्हापूर.**
**3. के.के.जाधव- नवीन काळाचे शिक्षण - तत्वज्ञान, मन प्रकाशन, नाशिक.**
**4. डॉ.वीरकर प्रभाकर, वीरकर प्रतिभा-शालेय शैक्षणिक अधिष्ठान, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे.**
**5. डॉ. शेवते आणि प्रीती पाटील भारतीय -भारतीय शिक्षण प्रणालीचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.**
**6. डॉ. भोसले रमा ढोणे उज्वला- शिक्षणातील बदलते विचार प्रवाह- फडके प्रकाशन, कोल्हापूर.**
**7. डॉ.बापट भा.गो.-शैक्षणिक प्रश्न आणि महाराष्ट्रातील शैक्षणिक विकास, व्हीनस प्रकाशन.**
**8. प्रा. जाधव भोसले- भारतीय शिक्षणाचा विकास,फडके प्रकाशन.**
**9. प्रा. अहेर हिरा -उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक,विद्या प्रकाशन, नागपूर.**
**10. प्रा. घोरमोडे यु.य.-शैक्षणिक प्रकाशन व व्यवस्थापन-विद्या प्रकाशन.**
**11. कुंडले म.बा. (1998 शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र पुणे, श्रीविद्या प्रकाशन.)**
**12. दुनाखे अ.रा.(2009 प्रगत शैक्षणिक तत्त्वज्ञान पुणे नित्य नूतन प्रकाशन.)**
**13. पारसनीस न.रा. (1998 शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्रीय भूमिका पुणे नूतन प्रकाशन.)**
**14. पंडित बन्सी बिहारी (2009 उदयन्मुख भारतीय समाजातील शिक्षक, नागपुर पिंपळापुरे व कंपनी पब्लिशर्स)**
**15. डॉ. शैलजा भंगाळे 'समकालीन भारत आणि शिक्षण', प्रशांत पब्लिकेशन-2015.**
**16. डॉ. रमा भोसले डॉ. उज्वला ढोणे,' शिक्षणातील बदलते विचार प्रवाह ', फडके प्रकाशन, कोल्हापूर - 2009.**

**घटक 2: भारतीय शिक्षणात राज्यघटनेचे योगदान**

**उद्दिष्टे**

1. विद्यार्थ्यांना राज्यघटनेची संकल्पना समजण्यास मदत करणे.
2. विद्यार्थ्यांना राज्यघटनेचे प्रास्ताविक समजण्यास मदत करणे.
3. विद्यार्थ्यांना राज्यघटनेतील मूलभूत अधिकार समजण्यास मदत करणे.
4. विद्यार्थ्यांना राज्यघटनेतील मूलभूत कर्तव्ये समजण्यास मदत करणे.
5. विद्यार्थ्यांना घटनात्मक मूल्यांशी संबंधित शिक्षणाची ध्येय समजण्यास मदत करणे.
6. विद्यार्थ्यांना भारतीय राज्यघटनेतील शिक्षणाशी संबंधित विविध मार्गदर्शक तत्त्वे समजण्यास मदत करणे.
7. विद्यार्थ्यांना भारतीय राज्य घटनेतील शिक्षणाशी संबंधित विविध मार्गदर्शक कलमे समजण्यास मदत करणे.
8. विद्यार्थ्यांना भारतीय शिक्षणाशी संबंधित पंचवार्षिक योजनेतील आर्थिक तरतुदी समजण्यास मदत करणे.

**प्रास्ताविक**

संविधानानुसार राज्यकारभार करण्याचे तत्व बहुतेक सर्व देशाने स्वीकारले आहे. तरीही प्रत्येक देशाच्या संविधानाचे स्वरूप वेगळे असते, कारण प्रत्येक देशाची समाजरचना, परंपरा, इतिहास आणि भौगोलिक रचना भिन्न असते. प्रत्येक देशाच्या गरजा आणि उद्दिष्टेही वेगवेगळी असतात, त्यास अनुसरून आपल्या भारताला स्वातंत्र्य प्राप्तीनंतर 29 ऑगस्ट 1947 रोजी घटना समिती तयार करण्यात आली. घटना मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची निवड करण्यात आली आणि इतर सात सदस्यांची ही निवड करण्यात आली. या घटना मसुदा समितीने अहोरात्र 2 वर्षे 11 महिने 17 दिवस कामकाज करून, घटनाकारांकडून संविधानात 395 कलमे आणि आठ परिशिष्टांचा समावेश करण्यात आला. संविधानाचे कामकाज पूर्ण करून शेवटी 26 नोव्हेंबर, 1949 रोजी भारतीय संविधान स्वीकारण्यात आले आणि 26 जानेवारी, 1950 रोजी प्रत्यक्षात संविधानाची अंमलबजावणी करण्यात आली. म्हणूनच खऱ्या अर्थाने या दिवसापासून भारतीय प्रजासत्ताक दिनाला सुरुवात झाली.

**संविधानाची संकल्पना**

प्रत्येक देशाचा राज्यकारभार त्या देशाच्या संविधानानुसार चालत असलेला. देशातील शासन प्रणालीची रचना व स्वरूप कसे असेल हे देशाचे संविधान ठरवित असते.
व्याख्या-1." संविधान म्हणजे त्या देशाचा मूलभूत कायदा होय ".
2." देशाच्या राज्यकारभारासाठी तयार करण्यात आलेले पायाभूत कायदे, नियम व तरतुदी ज्या ग्रंथात एकत्रित आहेत, त्यास संविधान असे म्हणतात. "

संविधानास " राज्यघटना" असेही म्हणतात.

- घटना समितीचे स्वरूप व कामकाज
- अध्यक्ष निवड
- कामकाजाचे दिवस व खर्च
- अधिकृत समिती
- मसुदा समिती
- घटनेचा मसुदा
- घटनेची स्वीकृती व अंमलबजावणी

**भारतीय राज्यघटनेचे प्रास्ताविक/सरनामा**

**राज्यघटनेचा असे थोडक्यात स्पष्ट करण्यासाठी उद्देश पत्रिका महत्त्वाचे असते**. भारतीय राज्यघटनेचे उगमस्थान भारतीय जनता आहे. घटनेच्या सरनाम्याच्या सुरुवातीलाच सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य असे राज्यव्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करून न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता ही राज्याची उद्दिष्टे घटनेच्या उद्देशपत्रिकेत सांगितलेली आहेत. भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका म्हणजे राज्यघटनेचा आत्मा किंवा प्राण समजला जातो.

**भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार/हक्क**

भारतीय संविधानाने नागरिकांना सहा प्रकारचे मूलभूत हक्क दिलेले आहेत.
1.समानतेचा हक्क( कलम 14 ते 18)
2.स्वातंत्र्याचा अधिकार (कलम 19 ते 22)
3.शोषणाविरुद्धचा अधिकार ( कलम 23 व 24)
4.धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार (कलम 25 ते 28)
5. सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार (कलम 29 व 30)
6. घटनात्मक उपायांचा अधिकार ( कलम 32 ते 35)

**भारतीय राज्यघटनेतील मूलभूत कर्तव्ये**

1976 मध्ये 42 व्या घटनादुरुस्तीने भारतीय राज्य घटनेच्या चौथ्या भागात कलम 51 क मध्ये दहा मूलभूत कर्तव्ये यांचा समावेश केलेला आहे.  2002 मध्ये झालेल्या 86 व्या घटनादुरुस्तीने घटनेत  अकरावे मूलभूत कर्तव्य समाविष्ट करण्यात आले आहे.
1. राज्यघटनेचे पालन करणे, राज्यघटनेतील आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे, मान राखणे.
2. आपल्या स्वातंत्र्य चळवळीला ज्यामुळे स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करून त्यांचे पालन करणे.
3. भारताची सार्वभौमता, एकता आणि एकात्मता यांचा सन्मान करून त्यांचे संरक्षण करणे.
4. आव्हान केले जाईल तेव्हा राष्ट्राचे संरक्षण करणे आणि राष्ट्रीय सेवा बजावणे.
5. धार्मिक भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेद न मानता सर्व भारतीय जनतेत ऐक्याची, बंधुत्वाची भावना वाढीला लावणे, तसेच  प्रतिष्ठेला बाधा आणणाऱ्या प्रथा सोडून देणे.
6. आपल्या गौरवशाली संस्कृतीचा वारसा मौल्यवान मानून तो जतन करणे.
7. जंगले, सरोवरे, नद्या व वन्य जीवनसृष्टी या नैसर्गिक संपत्तीचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे व सजीव प्राण्यांबाबत दयाबुद्धी बाळगणे.
8. शास्त्रीय दृष्टिकोन, मानवतावाद, शोधकबुद्धी आणि सुधारणावाद यांचा विकास करणे.
9. सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे आणि हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग तयार करणे.
10. राष्ट्र यशाच्या व प्रगतीच्या शिखराकडे सतत वाटचाल करील अशाप्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश मिळविण्यासाठी प्रयत्न करणे.
11. सहा ते चौदा वयोगटातील बालकास पालकांनी शिक्षण देणे.

ब) **घटनात्मक मूल्यांशी संबंधित शिक्षणाची ध्येये**

1. **न्याय**
   अ) राजकीय न्याय
   ब) सामाजिक न्याय
   क) आर्थिक न्याय
1. **स्वातंत्र्य**
2. **समता / समानता**
3. **बंधुता**

**क) भारतीय राज्यघटनेतील शिक्षणाशी संबंधित विविध मार्गदर्शक तत्त्वे**

1. **आर्थिक तत्वे**

**कलम 39 - सरकारने स्विकारावयाची धोरणविषयक कार्ये**
**कलम 41- काम, शिक्षण व सरकारी मदत**
**कलम 42- न्याय, माणुसकी आणि प्रस्तुतीसाहाय्य**
**कलम 43- निर्वाह वेतन आणि सामाजिक व सांस्कृतिक विकास**
**कलम 43 (क) उद्योगधंद्याच्या व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग**
**कलम 48- शेती व पशुसंवर्धन यांचा विकास**

1. **सामाजिक तत्वे**

कलम 45- सक्तीचे व मोफत शिक्षण.
कलम 46- दुर्बल घटकांना शिक्षण देणे व आर्थिक हितसंबंधांचे रक्षण करणे.
कलम 47- पोषणमान व राहणीमान उंचावणे आणि आरोग्य सुधारणे.
कलम 49- राष्ट्रीय स्मारके, स्थाने व वास्तू इत्यादींचे संरक्षण
3. **राजकीय तत्त्वे**
कलम 40- ग्रामपंचायती स्थापन करणे.
कलम 50- न्यायदान व शासन यंत्रणा अलग ठेवणे.
4. **न्यायालयीन तत्वे**
**कलम 39 (क)-सामान्य न्याय व मोफत कायदेविषयक सहाय्य**
कलम 44- समान नागरी कायदा
5.परराष्ट्र संबंधविषयक तत्वे
कलम 51- आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन

**भारतीय राज्यघटनेतील/संविधानातील शिक्षण विषयक कलमे/तरतुदी**

1. **मोफत व सक्तीचे शिक्षण -** कलम 45
2. धार्मिक शिक्षण-कलम 28
3. मागासवर्गीयांचे शिक्षण-

कलम 14- समानतेची सोय.
कलम 15- भेदभाव न करणे.
कलम 16- शासकीय सेवेतील नोकरी.
कलम 17- अस्पृश्यता नष्ट करणे.
कलम 46- शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जोपासणे.
कलम 335- नेमणुका व बढतीस आरक्षण

1. अल्पसंख्यांकाचे शिक्षण

कलम29(1) भाषा व संस्कृतीचे रक्षण
कलम 29 (2) शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश
कलम 30 (1) शिक्षण संस्था स्थापन करणे
कलम 30 (2) मदत देताना भेदभाव न करणे

1. भाषा शिक्षणविषयक तरतुदी

कलम 350 (अ) प्राथमिक स्तरावर मातृभाषेत शिक्षण
कलम 351 हिंदीचा प्रसार करणे.

कलम 344(1) आणि 351-मान्यताप्राप्त भाषा

1. संघसुचीतील सातव्या अनुसूचीनुसार गणल्या गेलेल्या महत्त्वाच्या संस्था

कलम 62-कलम 62 नुसार महत्त्वाच्या संस्था
कलम 63-कलम 63 नुसार महत्त्वाच्या संस्था
कलम 64-कलम 64 नुसार भारतीय संसदेने कायद्यान्वये अंशतः किंवा पूर्णत: घोषित केलेल्या संस्था
कलम 65- कलम 65 नुसार केंद्रीय अभीकरणे व संस्था
कलम 66- समन्वयन व निर्धारण
कलम 67- कलम 67 नुसार महत्त्वाच्या संस्था

**ड) भारतीय शिक्षणाशी संबंधित पंचवार्षिक योजनेतील आर्थिक तरतुदी**

नियोजन हा आर्थिक विकास घडवून आणण्याचा एक प्रभावी मार्ग आहे. ठरवलेली उद्दिष्टे विशिष्ट मुदतीत साध्य करण्याच्या हेतूने देशातील मर्यादित साधनसामुग्रीचा जास्तीत जास्त उपयोग करण्याचे तंत्र म्हणजे नियोजन होय. जगामध्ये असा एकही देश नाही की ज्या ठिकाणी नियोजन केले जात नाही. विकसित तसेच अविकसित अशा दोन्ही प्रकारच्या अर्थव्यवस्थेत आर्थिक नियोजनाचा अवलंब केला जातो देशाच्या आर्थिक विकासात अर्थव्यवस्थेचा एक अनिवार्य घटक म्हणून नियोजनाचा महत्त्व प्राप्त झालेले आहे.

**आर्थिक नियोजन**

1." राष्ट्राच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेची पाहणी करून त्याच्या आधारावर कोठे, केव्हा, कशा रीतीने कशाचे आणि किती प्रमाणात उत्पादन करावयाचे व त्या उत्पादनाचे वितरण कोणामध्ये व किती प्रमाणात करावयाचे यासंबंधी विशिष्ट सत्तेने जाणीवपूर्वक निर्णय घेणे म्हणजे आर्थिक नियोजन होय." - प्रा. एच. डी. डिकिन्सन.
2." सरकार किंवा मध्यवर्ती संस्थेने आर्थिक अग्रक्रमाची जाणीवपूर्वक व हेतुपुरस्कार केलेली निवड म्हणजे आर्थिक नियोजन होय."- श्रीमती बार्बारा वूटन.
3." ठराविक सामाजिक उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी देशातील साधनसामग्रीचे संघटन करून तिचा महत्तम वापर करण्यासाठी आखण्यात आलेला मार्ग किंवा पद्धती म्हणजे आर्थिक नियोजन होय."- भारतीय नियोजन मंडळ.
4. " देशातील उपलब्ध नैसर्गिक साधन सामग्री व त्या सामग्रीचा विशिष्ट कालावधीमध्ये उपभोग घेता यावा यासाठी केलेल्या नियोजनाला आर्थिक नियोजन म्हणतात."

**आर्थिक नियोजनाची वैशिष्ट्ये**

**1.आर्थिक नियोजन करण्याचे काम देशातील सरकार किंवा नियोजन मंडळ करते.**
2. नियोजनाची उद्दिष्टे पूर्वनिर्धारित असतात.
3. उद्दिष्टे ठराविक कालावधीत पूर्ण करावयाची असतात.
4. नियोजन करण्यासाठी संपूर्ण अर्थव्यवस्थेचे पाहणी करावी लागते.
5. देशात उपलब्ध असलेल्या साधन सामग्रीची जुळवाजुळव केली जाते.
6. अनेक उद्दिष्टांपैकी काही उद्दिष्टांना अग्रक्रम दिला जातो.
7. अग्रक्रमानुसार उपलब्ध साधनसामग्रीचे त्या त्या क्षेत्रात वाटप केले जाते.
8. आर्थिक नियोजनात संपूर्ण राष्ट्राचा विचार केला जातो.
9. आर्थिक नियोजनाच्या यशस्वितेसाठी जनतेचे सहकार्य अपेक्षित असते.
10.नियोजन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे आणि योजना हा त्या प्रक्रियेचा एक भाग आहे.

**आर्थिक नियोजनाची उद्दिष्टे/उद्देश**

1.राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणणे.
2.लोकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ घडवून आणणे.
3.उत्पन्नातील व संपत्ती वरील विषमता कमी करणे.
4. आर्थिक सत्तेचे मूठभर लोकांच्या हातातील केंद्रीकरण दूर करणे.
5. देशातील लोकांचे दारिद्य दूर करणे.
6. अन्नधान्याचे उत्पादन वाढवून अन्नधान्याच्या उत्पादनाच्या बाबतीत देशाला स्वयंपूर्ण बनविणे.
7. अर्थव्यवस्थेचे वेगाने औद्योगीकरण घडवून आणणे.
8. देशात रोजगाराच्या संधी निर्माण करून देशातील बेकारी नष्ट करणे.
9. लोकांना छोट्या कुटुंबाचे महत्त्व पटवून देऊन त्यांना स्वेच्छेने कुटुंब नियोजन करण्यास प्रवृत्त करणे.
10. भारतातील विविध भागांचा समतोल प्रादेशिक विकास घडवून आणणे.
11. परकीय मदतीवर परावलंबित्व कमी करण्यासाठी देशाला स्वयंनिर्भर बनविणे.

**आर्थिक नियोजनाची आवश्यकता/गरज/महत्त्व**

**1. आर्थिक विकासात वाढ करण्यासाठी**

2. संतुलित विकास करण्यासाठी
3. रोजगाराच्या संधीत वाढ करण्यासाठी
4. आर्थिक विषमता कमी करण्यासाठी
5. राहणीमानात वाढ व सुधारणा करण्यासाठी
6. सर्वांना समान संधी देण्यासाठी
7. देश स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनण्यासाठी
8. आर्थिक स्थैर्य प्राप्त करण्यासाठी
9. युद्धग्रस्त अर्थव्यवस्थेचे पुनर्वसन करण्यासाठी
10. सामाजिक सुरक्षिततेसाठी
11. सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी
12. सामाजिक सेवांचा विकास करण्यासाठी
13. विज्ञान व तंत्रज्ञानाची प्रगती करण्यासाठी
14. बेकारीच्या समस्या सोडविण्यासाठी

**शैक्षणिक नियोजन**

शिक्षण हे नियोजन बदलाची प्रक्रिया आहे. **आर्थिक** बाबीशिवाय नियोजन पूर्ण होऊ शकत नाही. भारतातील पंचवार्षिक योजनांचा एक महत्त्वाचा भाग म्हणून शैक्षणिक विकासाचे नियोजन केले जाते नियोजन करताना आर्थिक बाबी विचारात घ्याव्या लागतात.

**शैक्षणिक नियोजन करताना विचारात घ्यावयाच्या बाबी**

1. राज्याचे शिक्षण खाते विद्यापीठे मानव संसाधन विभागातील शिक्षण विभाग विद्यापीठ अनुदान मंडळ इत्यादी योजनांचा आराखडा तयार होण्यापूर्वी आपल्या शैक्षणिक सूचना नियोजन आयोगाला सादर करतात.
2. कार्यकारी गट मिळालेल्या सूचनांचे मूल्यमापन करीत असते.
3. नियोजन आयोगाने तयार केलेला आराखड्यास राष्ट्रीय विकास परिषद आणि विधान मंडळाची मान्यता घ्यावी लागते.
4. राष्ट्रीय विकास परिषद आणि विधान मंडळाची मान्यता मिळाल्यावर योजनेची कार्यवाही करण्यात येते.
5. नियोजन आयोग पंचवार्षिक योजना तयार करीत असते.
6. काही प्रकल्पांना केंद्र शासन अनुदान मंजूर करते मात्र कार्यवाही करण्याचे उत्तरदायित्व राज्य शासनाच्या शिक्षण मंत्र्यांची असते.
7. नियोजन आयोगाचे कार्यकारी गट असतात. त्यामध्ये शिक्षणक्षेत्राशी निगडीत राज्य आणि केंद्रशासनाचे प्रतिनिधी असतात.
8. नियोजन आयोगाच्या कार्यकारी गटाकडे सूचनांचा सखोल विचार करण्याची कामगिरी सोपवलेली असते.

**शैक्षणिक नियोजनामध्ये निर्माण होणाऱ्या अडचणी**

1. प्रचंड लोकसंख्या मुळे योजनेचा लाभ सर्वांना होत नाही.
2. गरजेनुसार साधन सुविधांची कमतरता भासते.
3. सामाजिक सुविधांच्या अभावामुळे शैक्षणिक नियोजनास गौण स्थान मिळते.
4. भारत देशाचे खंडप्राय स्वरूप
5. भारतातील सामाजिक समस्या
6. गरजेनुसारआर्थिक मदतीचा अभाव
7. सर्वांना विकासाच्या समान संधी पुरविणे अवघड असते.

**पंचवार्षिक योजना मधील शिक्षण विषयक तरतुदी**

भारतात 1951 पासून नियोजनास सुरुवात झाली. भारतातील पंचवार्षिक योजनांचा एक महत्त्वाचा भाग म्हणून शैक्षणिक विकासाचे नियोजन करण्यात येते. त्यामुळे शिक्षणाच्या विकासास चालना मिळते. भारताच्या पंचवार्षिक योजनांमध्ये शिक्षण विषयक केलेल्या तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

1. **पहिली पंचवार्षिक योजना 1951 - 56**

1. मुलोद्योगी, व्यावसायिक शिक्षण, तंत्रज्ञानविषयक शिक्षणावर भर देणे.
2.मुलोद्योगी शिक्षकांचे प्रशिक्षण, वेतन श्रेणी सेवाशर्ती यामध्ये सुधारणा करणे.

3. शिक्षणाच्या समान संधीची देशभर तरतूद करणे.
4. नागेश राज्यांना विशेष अनुदानाची तरतूद करणे.
5. शिक्षणाचे विविध स्तर व शाखा यामध्ये एकीकरण घडवून आणणे.
6. ग्रामीण भागात स्त्री शिक्षणाचा प्रसार करणे.
**2. दुसरी पंचवार्षिक योजना 1956 - 61 1.**मुलोद्योगी शिक्षण, बहुद्देशीय माध्यमिक शिक्षण, व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण उच्च शिक्षण सांस्कृतिक शिक्षण यांच्या दर्जावर भर देणे.
2. देशाचा औद्योगिक विकास करून रोजगार निर्मिती करणे.
3. लोकशाही मूल्ये आणि अभिवृत्तीच्या वाढीसाठी शिक्षणाच्या गुणवत्तेवर भर देणे.
4. शिक्षणावरील खर्चात वाढ करून प्राथमिक शिक्षणाचा विस्तार करणे.
5. देशातील बेरोजगारीची समस्या कमी करणे.
3. **तिसरी पंचवार्षिक योजना 1961-66**
1. उच्च शिक्षणातील विज्ञान विषयक अध्यापनात सुधारणा करणे.
2. मुला-मुलींच्या शिक्षणातील अंतर दूर करणे.
3. पदव्युत्तर अभ्यास आणि संशोधन यांना सोयी पुरवून त्यांची गुणवत्ता सुधारणे.
4. सहा ते अकरा या वयोगटातील मुलांना शैक्षणिक सुविधा पुरविणे
5. प्राथमिक शाळांचे मुलोद्योगी शाळात रूपांतर करणे.
6.शिक्षक शिक्षणात सुधारणा घडवून आणणे.
**4. चौथी पंचवार्षिक योजना 1969 - 74**
**1. प्रचलित शिक्षण पद्धतीतील कमतरता नष्ट करणे.**
2. शिक्षणाच्या संख्यात्मक विकासामुळे शिक्षण पद्धतीवर पडलेला ताण कमी करणे.
3. शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी करणे.
4. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या व कर्जाऊ शिष्यवृत्ती मध्ये वाढ करणे.
5. दुर्बल घटकांना देण्यात येणाऱ्या शिक्षणात सुधारणा करणे.
6. सामाजिक व आर्थिक विकासाच्या वाढणाऱ्या गरजा आणि शिक्षण पद्धती यांच्यामध्ये सांगड घालणे.
7. मोफत प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणे.
8. शिक्षक - शिक्षण, शैक्षणिक पात्रता सुधारणे व पगार वाढ यावर भर देणे.
9.महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणाच्या संदर्भात भारतीय भाषांमध्ये पुस्तकांची निर्मिती करणे.
**5. पाचवी पंचवार्षिक योजना 1974 - 79.**
**1. शिक्षणाच्या समान संधीवर भर देणे.**
**2. भाषांचा विकास करण्यावर भर देणे.**
**3.** माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायीकरण करणे.
4. सर्व स्तरावरील अभ्यासक्रमाची पुनर्रचना करणे.
5. शिक्षणाच्या सर्व स्तरावर आर्थिक विकास आणि रोजगार यांचा समन्वय साधणे.
**6. सहावी पंचवार्षिक योजना 1980 - 85.**
**1.** पाठ्यपुस्तकात गुणात्मक सुधारणा घडवून आणणे.
2. संशोधन प्रकल्प आणि तंत्रज्ञान विस्तार सेवा यांच्या प्रयोगात्मक सेवेवर भर देणे.
3. मानव साधन संपत्तीच्या विकासाचे साधन म्हणून शिक्षणाकडे पहावे.
4. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणावर अधिक भर देणे.
5. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण,व्यावसायीकरण या पूर्वीच्या योजनाकडे लक्ष देणे.
6. प्रचलित शैक्षणिक सुविधांचे आधुनिकीकरण करणे.
**7. सातवी पंचवार्षिक योजना 1985 - 1990.**
**1. प्रौढ शिक्षणावर अधिक भर देणे.**
2. सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट पूर्ण करणे.
3. शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा करणे.
4. तंत्रज्ञान शिक्षणाचे आधुनिकीकरण करणे.
**8. आठवी पंचवार्षिक योजना 1992 - 97**

**1. नोकऱ्यांची उपलब्धता सुधारित स्वास्थ्यासाठी उपक्रम** आणि **अधिक प्रमाणावर शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे.**
**2. आर्थिक, व्यापार, व्यवसाय, मानव विकास आणि औद्योगिक विभाग यांना प्राधान्य देणे.**
**3. सामाजिक विभागातील लाभ सर्वांना मिळावा म्हणून पर्याप्त संघटना तयार करणे.**
**4**. ज्या क्षेत्रांना विशेष प्राधान्य देण्यात आले त्यांना मूलभूत सोयी उपलब्ध करून देणे.
5. नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे.
6. 15 ते 35 वयोगटातील निरक्षरता नष्ट करून प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे.
7. लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी लोकांचा सहभाग व प्रतिबंधक उपाय विचारात घेणे.
9. **नववी पंचवार्षिक योजना 1997 - 2002**
1. आर्थिक विकासाच्या गतीला चालना देणे.
U2. निर्मितीक्षम नोकऱ्यांच्या उपलब्धतेस प्राधान्य देणे.
3. मागेल त्याला रोजगार उपलब्ध करून देणे.
4. सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणासारख्या पायाभूत सेवा पुरविणे.
10. दहावी **पंचवार्षिक योजना 2002** - **2007.**
**1. समानता आणि सर्वांना न्याय देण्याची व्यवस्था करणे.**
**2.** फायदेशीर रोजंदारी उपलब्ध करून देणे.
3. 2007 पर्यंत साक्षरतेचे प्रमाण 75 टक्के पर्यंत वाढविणे.
4. 2007 पर्यंत गरिबीचे प्रमाण 5% कमी करणे.
5. 2003 पर्यंत सर्व बालकांच्या शिक्षणाची सोय करणे.
11. अकरावी पंचवार्षिक योजना 2007 - 2012.
1. शिक्षण आणि कौशल्यांचा विकास करणे.
2. प्राथमिक शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा मानदंड विकसित करणे.
3. साक्षरतेचे प्रमाण वाढविणे.
4. साक्षरतेत लैंगिकता भेद कमी करणे.
5. उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण वाढविणे.
12. **बारावी पंचवार्षिक योजना 2012 - 2017.**
**13. 1 जानेवारी 2015 पासून निती आयोग सुरू झाला.**
**सारांश-**
**राज्यघटनेची संकल्पना**

- संकल्पना
- घटना समितीचे स्वरूप व कामकाज
- अध्यक्ष निवड
- कामकाजाचे दिवस व खर्च
- अधिकृत समिती
- मसुदा समिती
- घटनेचा मसुदा
- घटनेची स्वीकृती व अंमलबजावणी
- भारतीय राज्यघटनेचा सरनामा/प्रास्ताविक

**भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार/हक्क**

- **समतेचा अधिकार-कलम 14 ते 18**
- स्वातंत्र्याचा अधिकार-कलम 19 ते 22
- शोषणाविरुद्धचा अधिकार-कलम 23 ते 24
- धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार- कलम 25 ते 28
- सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार-कलम 29 ते 30
- मालमत्तेचा अधिकार-कलम 31 (1978 मध्ये 44 व्या घटनादुरुस्तीनुसार रद्द)
- घटनात्मक उपायांचा अधिकार-कलम 32 ते 35

**भारतीय राज्यघटनेतील मूलभूत कर्तव्ये**

**ब) घटनात्मक मूल्यांशी संबंधीत शिक्षणाची ध्येये**

1. न्याय

अ) राजकीय न्याय

ब) सामाजिक न्याय

क) आर्थिक न्याय

2) स्वातंत्र्य

3) समता

4) बंधुता

**क) भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वे**

- आर्थिक तत्वे
- सामाजिक तत्वे
- राजकीय तत्त्वे
- न्यायालयीन तत्वे
- परराष्ट्र संबंधविषयक तत्वे

**भारतीय राज्यघटनेतील शिक्षण विषयक कलमे**

1. मोफत व सक्तीचे शिक्षण
2. धार्मिक शिक्षण
3. मागासवर्गीयांचे शिक्षण
4. अल्पसंख्यांकांचे शिक्षण
5. भाषा शिक्षण विषयक तरतुदी
6. संघसुचीतील सातव्या अनुसूचीनुसार गणल्या गेलेल्या महत्त्वाच्या संस्था

**भारतीय राज्यघटनेतील सुची**

1. संघ सूची

2. राज्यसूची

3. समाईक सूची

**ड) भारतीय शिक्षणाशी संबंधित पंचवार्षिक योजनेतील आर्थिक तरतुदी**

- आर्थिक नियोजन
- नियोजन मंडळ
- आर्थिक नियोजनाची वैशिष्ट्ये
- आर्थिक नियोजनाची उद्दिष्टे
- आर्थिक नियोजनाची आवश्यकता
- शैक्षणिक नियोजन
- **शैक्षणिक नियोजन करताना विचारात घ्यावयाच्या बाबी**
- **शैक्षणिक नियोजनामध्ये निर्माण होणाऱ्या अडचणी**
- **पंचवार्षिक योजना**
- **पंचवार्षिक योजनांमधील शिक्षण विषयक तरतुदी शिक्षण विषयक**

**1. पहिली पंचवार्षिक योजना 1951-56**

**2. दुसरी पंचवार्षिक योजना 1956-61**

**3. तिसरी पंचवार्षिक योजना 1961-66**

**4.चौथी पंचवार्षिक योजना1969-74**

**5.पाचवी पंचवार्षिक योजना 1974-79**

**6.सहावी पंचवार्षिक योजना 1980-85**

**7.सातवी पंचवार्षिक योजना 1985-90**

**8.आठवी पंचवार्षिक योजना 1992-97**

**9.नववी पंचवार्षिक योजना 1997-2002**

**10.दहावी पंचवार्षिक योजना 2002-2007**

**11.अकरावी पंचवार्षिक योजना 2007-2012**

**12. बारावी पंचवार्षिक योजना 2012-17**
**13.1जानेवारी 2015 पासून निती आयोग सुरू झाला.**
**स्वाध्याय**
**प्रश्न 1. खालील विधाने योग्य पर्याय निवडून पूर्ण करा.**
**1. रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**
**1.** भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर………….. रोजी घटना समिती तयार करण्यात आली.
अ) 29 नोव्हेंबर 1947 ब) 29 ऑक्टोबर 1946
क) 29 ऑगस्ट 1947 ड) 29 डिसेंबर 1947
2. घटना मसुदा समितीचे अध्यक्ष …………….होते.
अ) महात्मा गांधी ब) पंडित नेहरू
क) बॅरिस्टर जीना ड) डॉ. बाबासाहेब आंबेडकर
3. भारतीय घटनेत…………… कलमांचा समावेश करण्यात आला.
अ) 393 ब) 394 क) 395. ड) 448
4. संविधानास…………. असेही म्हणतात.
अ) राज्यसभा आयोग ब)संघराज्य
क) राज्यघटना ड)मूलभूत कायदा
5. संविधानात…………….. प्रकारचे हक्क आहेत.
अ) चार ब)सहा क)सात ड) पाच
6. संविधानात समाविष्ट केलेल्या नागरिकांच्या हक्कांना ……………..असे म्हणतात.
अ) नैतिक हक्क ब) मूलभूत हक्क
क) सामाजिक हक्क ड) नागरी हक्क
7. प्रत्येक व्यक्तीला आपल्या धर्माचा……………. करण्याचा अधिकार आहे.
अ) त्याग ब)प्रसार
क) पालन ड) प्रचार-प्रसार
8. संविधानाच्या प्रास्ताविकेचे अखेरीस…………….. रोजी हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतःच्या स्वतः ला अर्पण करण्यात आले.
अ) 26 ऑक्टोबर 1948 ब) 26 जानेवारी 1946
क) 26 नोव्हेंबर 1949 ड) 26 डिसेंबर 1945
9………. साली भारतीय संविधानात 10 मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला.
अ) 1976. ब) 1975 क) 1960 ड) 1950
10. भारतीय राज्यघटनेचे सल्लागार………… होते.
अ) बी एन. राव ब) पंडित नेहरू
क) मौलाना आझाद ड) डॉ.राजेंद्र प्रसाद
11. राज्यघटनेच्या……….. व्या कलमात अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे.
अ)18 ब)15. क) 17. ड) 12
12. पहिली पंचवार्षिक योजना……….. सुरू झाली.
अ) 1960. ब) 1951 क) 1970 ड) 1955
13. ……….. यांना संविधानाचे शिल्पकार म्हटले जाते.
अ) डॉ. राजेंद्र प्रसाद ब) बी. एन. राव
क) सुचेता कृपलानी ड) डॉ. बाबासाहेब आंबेडकर
14. देशाच्या राज्यकारभारासाठी तयार करण्यात आलेले पायाभूत कायदे, नियम व तरतुदी या ग्रंथात एकत्रित आहेत त्यास ………………म्हणतात.
अ) ज्ञानेश्वरी ब)संविधान क) कायदा ड)न्या
15. भारतीय संविधानाची प्रास्ताविका ………. ओळींची आहे.
अ) 14. ब) 15. क) 16 ड) 18
16. नागरिकास आपले मत मांडण्याचा अधिकार ………………..या मूल्यानुसार मिळाला आहे.
अ) समाजवाद ब) समता क) स्वातंत्र्य ड)न्याय

17.भारतीय संविधानातील……….. या कलमानुसार नागरिकांमध्ये भेदाभेद केला जाणार नाही.
अ) कलम 13 ब) कलम15 क)कलम 12 ड)कलम 14
18. भारतीय संविधान हे………. पासून अमलात आले.
अ) 26 जानेवारी 1950 ब) 26 नोव्हेंबर 1949
क) 26 डिसेंबर 1950 ड) 26 जानेवारी 1949
19………….. रोजी भारतातील पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाली.
अ) 1 जून 1951 ब) 1 मे 1951
क) 1 एप्रिल 1951 ड) 1जुलै 1991
20. उच्च शिक्षणातील शिक्षण घेणाऱ्यांची संख्या 6% वरून 10% पर्यंत नेण्याचे उद्दिष्ट …………पंचवार्षिक योजने ठरवण्यात आले.
अ) आठव्या ब)नवव्या क)दहाव्या ड)अकराव्या
21. भारतीय राज्यघटनेतील ………….कलमान्वये शिक्षण संस्थांतून धार्मिक शिक्षण देण्यास बंदी घालण्यात आली.
अ) कलम 28 ब) कलम 42
क)कलम 45 ड)कलम 29
22. संविधानात नागरिकांची…………. कर्तव्ये समाविष्ट आहेत.
अ) 10 ब) 11 क) 9. ड) 8
23. दारिद्य निर्मूलन आणि शिक्षणाचे सार्वत्रीकरण हे………. पंचवार्षिक योजनेचे उद्दिष्ट होते.
अ) 7व्या ब) 8व्या क) 9व्या ड)10व्या
**24. दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये पुढील पैकी कोणत्या बाबींवर भर दिला**
**अ)** प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी सर्वसमावेशक दृष्टिकोन स्वीकारणे.
ब) सन 2005 पर्यंत 75 टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट पूर्ण करणे.
क) अंगणवाडी सेविकांचे प्रशिक्षण आणि अध्ययन साहित्य उपलब्ध करून देणे.
ड) वरील सर्व
25. सामाजिक बंधुता यामध्ये…….. अभिप्रेत आहे.
अ) समान दर्जा ब) ऐक्य भावनेचा विकास
क) समान वागणूक. ड)समान सुविधा
26. 2002 मध्ये झालेल्या………..व्या घटनादुरुस्तीने 11वे मूलभूत कर्तव्य समाविष्ट करण्यात आले आहे.
अ) 86 ब) 45 क) 42 ड)20
27. …………म्हणजे समाजाचा सर्वांगीण विकास साधणे होय.
अ) न्याय ब)समता क)स्वातंत्र्य ड)बंधुता
28.1976 साली झालेल्या………व्या घटना दुरुस्तीने मार्गदर्शक तत्वांना न्यायालयीन संरक्षण देण्यात आलेले आहे.
अ) 42 ब)86 क)45 ड)44
29. पंचवार्षिक योजनेची संकल्पना…………यांनी सुचवलेली आहे.
अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब) डॉ. राजेंद्र प्रसाद
क) पंडित जवाहरलाल नेहरू ड) डॉ. बी. एन. राव
30……….. पासून निती आयोग सुरू झाला.
अ) 5 जून 2016 ब) 1 जानेवारी2015
क) 4 जूलै 2016 ड) 15 जून 2015
31.' सारे भारतीय माझे बांधव आहेत ' हे वाक्य………….. दर्शविते.
अ) समता ब) सार्वभौमत्व
क) राष्ट्रीय ऐक्य ड) न्याय
32. खालीलपैकी ……………या देशात सर्वाधिक सामाजिक विविधता आहे.
अ) भारत ब)पाकिस्तान क) इराण ड)बांगलादेश
३३. भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रिका ………………..यांनी तयार केली आहे.
अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

ब) पंडित जवाहरलाल नेहरू
क) महात्मा गांधी
ब) राजेंद्र प्रसाद
अपेक्षित उत्तरे
1.क-29 ऑगस्ट 1947
2.ब-डॉ. बाबासाहेब आंबेडकर
3.क-395
4.क-राज्यघटना
5.ब-सहा
6.ब-मूलभूत हक्क
7.ड-प्रचार-प्रसार
8.क-26 नोव्हेंबर 1949
9.अ-1976
10.अ-बी.एन.राव.
11.क-17
12.ब-1951
13.ड-डॉ. बाबासाहेब आंबेडकर
14.ब-संविधान
15.अ-14
16.क- स्वातंत्र्य
17.ब- कलम 15
18.अ- 26 जानेवारी 1950
19.क-1 एप्रिल1951
20.क- 10 व्या
21.अ- कलम 28
22.ब- 11
23.क - नवव्या
24. ड- वरील सर्व
25. ब - ऐक्य भावनेचा विकास
26. अ - 86
27. अ - न्याय
28. अ - 42
29. क - पंडित जवाहरलाल नेहरू
30. ब - 1 जानेवारी 2015
31. क - राष्ट्रीय ऐक्य
32. अ - भारत
33. ब - पंडित जवाहरलाल नेहरू.
प्रश्न 2 खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (शब्दमर्यादा 250)
1. भारतीय संविधानातील शिक्षणाची संबंधीत कलमे लिहा
2. भारतीय संविधानातील नागरिकांची मूलभूत कर्तव्ये सांगा.
3. कोणतेही पाच मूलभूत अधिकार स्पष्ट करा.
4. भारतीय राज्यघटनेतील कलम 65 गावे व कलम 66 वेळेचे महत्व स्पष्ट करा.
5. शिक्षणाशी संबंधित मार्गदर्शक तत्वे स्पष्ट करा.
6. भारतीय संविधानाची प्रास्ताविका स्पष्ट करा.
प्रश्न 3. भारतीय राज्यघटनेचे उद्देश पत्रिकेतील प्रवर्धित मूल्यांची चर्चा करा.
मराठी संदर्भ ग्रंथ सूची
1.डॉ. तापकीर दत्तात्रय, डॉ.निर्मला तापकीर

(2008, शिक्षणाचे तात्त्विक व समाजशास्त्रीय अधिष्ठान प्रकाशन, पुणे.)
2. डॉ. करंदीकर सुरेश डॉ. मीना मंगरूळकर.(2010, उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
3. के.के.जाधव- नवीन काळाचे शिक्षण - तत्वज्ञान, मन प्रकाशन, नाशिक.
4. डॉ.वीरकर प्रभाकर, वीरकर प्रतिभा-शालेय शैक्षणिक अधिष्ठान, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे.
5. डॉ. शेवते आणि प्रीती पाटील भारतीय -भारतीय शिक्षण प्रणालीचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
6. डॉ. भोसले रमा ढोणे उज्वला- शिक्षणातील बदलते विचार प्रवाह- फडके प्रकाशन, कोल्हापूर.
7.डॉ.बापट भा.गो.-शैक्षणिक प्रश्न आणि महाराष्ट्रातील शैक्षणिक विकास, व्हीनस प्रकाशन.
8. प्रा. जाधव भोसले- भारतीय शिक्षणाचा विकास,फडके प्रकाशन.
9. प्रा. अहेर हिरा -उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक,विद्या प्रकाशन, नागपूर.
10. प्रा. घोरमोडे यु.य.-शैक्षणिक प्रकाशन व व्यवस्थापन-विद्या प्रकाशन.
11. कुंडले म.बा. (1998 शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र पुणे, श्रीविद्या प्रकाशन.)
12. दुनाखे अ.रा.(2009 प्रगत शैक्षणिक तत्त्वज्ञान पुणे नित्य नूतन प्रकाशन.)
13. पारसनीस न.रा. (1998 शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्रीय भूमिका पुणे नूतन प्रकाशन.)
14. पंडित बन्सी बिहारी (2009 उदयन्मुख भारतीय समाजातील शिक्षक, नागपुर पिंपळापुरे व कंपनी पब्लिशर्स)
15. डॉ. शैलजा भंगाळे 'समकालीन भारत आणि शिक्षण', प्रशांत पब्लिकेशन-2015.
16. डॉ. रमा भोसले डॉ. उज्वला ढोणे,' शिक्षणातील बदलते विचार प्रवाह ', फडके प्रकाशन, कोल्हापूर - 2009.

# घटक 3. कालपूर्व व कालोत्तर भारतीय शिक्षणाचा दर्जा

उद्दिष्टे- या घटकाचे अध्यापन केल्यानंतर तुम्हाला
1. वैदिक शिक्षणातील विविध घटकांचे स्पष्टीकरण करता येईल.
2. मुस्लीम शिक्षणातील विविध घटक स्पष्ट करता येतील.
3. बौद्ध शिक्षणातील विविध घटक स्पष्ट करता येतील.
4. मिशनरी शिक्षणातील विविध घटक स्पष्ट करता येतील.
5. कोठारी आयोग याची उद्दिष्टे स्पष्ट करता येतील.
6. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्पष्ट करता येईल.
7. राष्ट्रीय अभ्यासक्रमातील गाभाभूत घटक सांगता येतील.
8. दिलास कमिशन चे चार स्तंभ अस स्पष्ट करता येतील.
9. ज्ञान आयोग स्पष्ट करता येईल.
10. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 स्पष्ट करता येईल.
11. कालपूर्व कालोत्तर भारतीय शिक्षणाचा तुलनात्मक अभ्यास करता येईल.
12. शिक्षणासंबंधी हंटर आयोगाच्या शिफारशी सांगता येतील.
13. शिक्षणासंबंधी शिक्षण आयोगाच्या शिफारशी सांगता येतील.
14. शिक्षणासंबंधी मुदलियार आयोगाच्या शिफारशी सांगता येतील.
15. शिक्षणासंबंधी कोठारी आयोगाच्या शिफारशी सांगता येतील.

**प्रास्ताविक**

स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षण व ज्ञान हे भारतीय लोकांना काही नवीन नाही. प्रत्येक विद्यार्थी जाणतो की अति प्राचीन काळापासून या देशातील नागरिकांनी शिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिले होते. शिक्षणाचा संबंध धर्माशी जोडला गेला. धर्माचा शिक्षण क्षेत्रावरही प्रभाव पडला.
आणि एका नवीन शिक्षण प्रणालीचा विकास झाला. त्यास बौद्धकालीन शिक्षण प्रणाली असे म्हणतात.
ही शिक्षण प्रणाली वैदिक शिक्षण प्रणाली पेक्षा वेगळी असूनही काही बाबतीत समान होती.

लोकसभेने शिक्षण हक्क विधेयक संमत केले. या विधेयकामुळे प्राथमिक शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक शैक्षणिक क्रांती घडून येईल अशी अपेक्षा आहे. सन 2002 ची व 2005 ची 93 वी घटना दुरूस्तीनुसार सर्व बालकाचे मोफत व सक्तीचे शिक्षण असावे. असा मूलभूत हक्क कलम 21 व अन्वये राज्यांना देण्यात आला. त्यानुसार घटनेच्या कलम 45 प्रमाणे तरतुद करावी असेही निर्देश देण्यात आले. तसेच या सुधारीत घटना दुरूस्तीच्या विधेयकाच्या कलम 51 (व) (k) प्रमाणे प्रत्येक पालकाने शिक्षणाची संधी आपल्या अनिवार्यपणे उपलब्ध करून दयावी असेही निर्देश देण्यात आले. लोकशाही, सामाजिक न्याय व समानतेच्या तत्त्वाप्रमाणे सर्वांना समान गुणवत्तेचे शिक्षण उल्पब्ध करून द्यावे. हे प्रमुख उद्दिष्ट विधेयक 2002 च्या घटनादुरूस्तीचे होते. हे उद्दिष्ट साध्य हाण्यासाठी शिक्षणाच्या व्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण केले जावे आणि वंचितासाठी शिक्षण व समान गुणवत्तेचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत स्थलांतराचा बालकांचा हक्क निश्चित केला जाण्याची तरदूत करण्यात आली.

शिक्षण हक्क विधेयक 2005 च्या मसुद्यामध्ये केंद्र शासनाने 93 वी घटना दुरूस्ती केली. धर्म, वंश, जात, लिंग आणि जन्मठिकाण याबाबत भेदभावास मनाई अशी तरतूद करण्यात आली. या दुरूस्तीमुळे सर्व स्तरातील बालकांना वय वर्षे 6 ते 14 पर्यंत शिक्षणाचे दार सर्वार्थाने खुले करण्यात आले.

शिक्षण हक्क विधेयक 2009 उपरोक्त घटना दुरूस्तीनुसार व आवश्यक त्या बदलासह लोकसभेने समंत केले. ही देशाच्या दृष्टीने विशेष शैक्षणिक घटना आहे.

या कायदयातील महत्त्वाची मार्गदर्शक तत्त्वे खालीलप्रमाणे –

1. ही योजना 100 टक्के यशस्वी करण्याची जबाबदारी शासनाइतकीच शिक्षक, पालक School Management Committee (SMC) यांची संयुक्तरीत्या आहे. ही जाणीव या घअकांना असणे आवश्यक आहे.

2. या योजनेची अंमलबजावणी योग्य रीतीने व्हावी म्हणून कायद्याच्या कलम 20 ते 32 मध्ये सविस्तर चर्चा केलेली आहे. त्यातील काही महत्त्वाच्या बाबींचा अभ्यास पालक, शिक्षक व संस्थाचालक यांनी केला तर त्यांना त्यांची त्यांची भूमिका समजाऊन घेण्यास नक्कीच मदत होईल. म्हणून काही महत्त्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

**अ. कलम 22 :** School Management Committee (SMC) बाबत सविस्तर खुलासा या कलमात आहे. कमिटीत 75 टक्के सभासद पालकांचे प्रतिनिधी असावेत असा आग्रह आहे. यावरुन पालकांची भूमिका स्पष्ट अधोरेखित केली आहे. शाळेची सर्व मालमत्ता SMC च्या ताब्यात द्यावी असे सुचविले आहे. याचा स्पष्ट अर्थ शाळेचे सर्व व्यवस्थापन SMC कडेच सोपविले आहे.

**ब. कलम 25 :** या कलमात शिक्षकांच्या योग्यतेचे निकष स्पष्टपणे नमुद केले आहेत. SMC ने अयोग्य शिक्षक नेमू नयेत असे सूचित केले आहे.

**क. कलम 26 :** या कलमात शिक्षकांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्या विषयी चर्चा केलेली आहे. शिक्षकाने कसे शिकवावे, विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर कसे लक्ष ठेवावे तसेच पालंकांशी कसा व कशाबाबत संवाद साधावा वगैरेबाबत सविस्तर चर्चा केली आहे.

कलम 29 : या कलमात प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम ठरविताना खालील गोष्टींची काळजी घेण्याची आवश्यकता नमुद केली आहे.

1. अभ्यासक्रम शिकवणे व मूल्यांकन या बाबी घटनेने जतन केलेल्या मूल्यांशी सुसंगत असाव्यात.
2. शाळेची कार्यपद्धती विद्यार्थीकेंद्रीत, आपुलकीची व त्याच्याशी जवळीक साधणारी असावी.
3. मुलांना सर्व बाबतीत स्वतःची मते निर्भयतेने मांडण्यासाठी प्रोत्साहीत करणारे शैक्षणिक वातावरण घरात व शाहेत असावे.
4. शिक्षणाचे माध्यम कमीत कमी 5 व्या इयत्तेपर्यंत तरी विद्यार्थ्यांच्या मातृभाषेतच असावे.
5. शिकविण्याची पद्धत, खेळ, कृती, जाणीव जागृती, प्रश्नांची सोडवणूक यांच्याशी निगडीत असावी.
6. शैक्षणिक वातावरण भयमुक्त व काळजीमुक्त असावे.

7. शिकविण्याची पद्धत ही विद्यार्थ्यांचा सर्वागीण विकास (बौद्धिक, भावनिक व शारीरिक) साधण्याच्या दृष्टीने विकसित केलेली असावी.
8. 8. विद्यार्थ्यांचे मूल्यांकन निरंतर व सर्वसमावेशक असावे.

**ड. कलम 32 :** या कलमात शिक्षकांच्या शिक्षणाविषयी व निरंतर प्रशिक्षणाविषयी मार्गदर्शन केलेले आहे. शिक्षकाने ताहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याबाबत सूचित केले आहे.

1. 6 ते 14 वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण दिले जात आहे याची खात्री करणे.
2. बालकांना शाळेत प्रवेश देण्यासाठी चाचणीस प्रतिबंध.
3. केवळ शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच बालकांना प्रवेश न देता इतर वेळेतही बालक आल्या त्याला प्रवेश देण्याची तरतुद.
4. इयत्ता 8 वी पर्यंत अनुतीर्ण करण्यास प्रतिबंध.
5. प्रवेशासाठी जन्मदाखल्याची आवश्यकता नाही.
6. शाळेत प्रवेश देण्यासाठी देणगी घेता येणार नाही.
7. शिक्षकांना अशैक्षणिक कामे देण्यास प्रतिबंध.
8. शिक्षक अर्हता व वेतन.
9. शिक्षकांची कर्तव्ये व शिक्षकांच्या तक्रारीचे निवारण या कलमाचा समावेश.
10. शालेय व्यवस्थापन समिती.
11. प्राथमिक शिक्षकांचे अध्यापन
12. प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र.
13. बालकांना शारीरिक शिक्षा देण्यास प्रतिबंध व शिक्षण प्रशिक्षण या बाबींचा समावेश.

**शिक्षणाचा हक्क कायदा – संदर्भ**

1. घटनेचे 41 वे कलम – कामाचा हक्क (Right to work)
2. घटनेचे 45 वे कलम व 86 वी घटना दुरुस्ती – 14 वर्षांच्या आतील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणे हे राज्याचे कर्तव्य.
3. घटनेचे 48 वे कलम – अनुसूचित जाती–जमातींचे सामाजिक अन्यास व शोषण यापासून संरक्षण करणे.
4. मोमिनी जैन विरुद्ध कर्नाटक राज्य – खटल्याचा निकाल : शिक्षण हा मूलभूत हक्क म्हणून समाविष्ट.
5. उन्नी कृष्णन जे. पी. विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य निकाल.
6. दिनांक 28 नोव्हेंबर 2001 मध्ये 'प्राथमिक शिक्षणाचा हक्क' विधेयक लोकसभेत सर्वांनुमते मंजूर करण्यात आले.
7. दिनांक 14 मे 2001 हे विधेयक राज्यसभेत सर्वांनुमते मंजूर करण्यात आले.
8. मा. राष्ट्रपतींच्या सहीने भारतीय राज्यघटनेमध्ये 6 वी घटनादुरुस्ती कलम 21(a) निश्चित करुन 6 ते 14 या वयोगटातील बालकांसाठी प्राथमिक शिक्षण हा त्यांचा मूल्भूत अधिकार बनला.(डिसेंबर 2002)
9. 2003 – बालकांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाचे विधेयक – 2003.
10. 2004 – बालकांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाचे विधेयक – 2004.
11. 2005 – बालकांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाचे विधेयक – जून 2005.
12. 2006 – बालकांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाचे विधेयक – 2006.
13. सन 2005 मध्ये Right to Education वर पहिला मसुदा तयार करण्यात आला.
14. 2008 मध्ये केंद्रीय मंत्रीमंडळासमोर हे विधेयक विचारार्थ ठेऊन यामध्ये काही सुधारणा सुचविल्या.
15. जुलै 2009 रोजी लोकसभेने व केंद्रीय मंत्रीमंडळाने विधेयकास मान्यता देऊन हे विधेयक राज्यसभेच्या मान्यतेसाठी पाठविले.

16. 20 जुलै 2009 रोजी राज्यसभेने या विधेयकास मान्यता दिली व परत हे विधेयक चर्चेसाठी लोकसभेत पाठविण्यात आले.

17. 4 ऑगस्ट 2009 रोजी चर्चा व दुरुस्त्या सुचवून हे विधेयक राज्यसभेमार्फत मा. राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आले.

18. 20 ऑगस्ट 2009 रोजी लोकसभेने या विधेयकास अंतिम मान्यता दिली.

19. 26 ऑगस्ट 2009 रोजी मा. राष्ट्रपतींनी या विधेयकावर शिक्कामोर्तब केले व 26 ऑगस्ट 2009 रोजी राज्यपत्र प्रसिद्ध केले.

20. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम राज्यात लागू झाला. शासन परिपत्रक क्रमांक 2009/प्र. क्र.292/प्राशि 1दिनांक दिनांक 10 मे 2010.

अशा प्रकारे एक ऐतिहासिक निर्णय ज्याचे संपूर्ण शिक्षणक्षेत्रातून स्वागत झाले. ”The Right Children to free and compulsory Education Act 2009” to work म्हणून आस्तित्वात आला.

**5.2.3 क. सातत्यपूर्ण आणि आकलनात्मक शिक्षण**

या उपघटकाचा अभ्यास केल्यानंतर खालील बाबी आपल्या लक्षात येतील.

1. सातत्यपूर्ण आणि आकलनात्मक शिक्षण पार्श्वभूमी.
2. शिक्षणाचा अर्थ
3. शिक्षणाची वैशिष्ट्ये
4. शिक्षणाची कार्ये
5. शिक्षण पद्धती –
6. सातत्यपूर्ण शिक्षण आणि आकलनात्मक शिक्षण

**1. पार्श्वभूमी**

शिक्षण मानवी जीवनाचा सर्वांगीन विकास शिक्षणामुळे होतो. शिक्षण प्रक्रिया जीवनाचा अविभाज्य भाग आहे. शिक्षण ही मूलभूत गरज. बनली आहे. तात्त्विक आधार चारित्र्याची जडणघडण आणि उपजिविकेचे साधन यासाठी शिक्षणची आवश्यकता आहे. शिक्षणच्या माध्यमातून शारिरिक, मानसिक, बौद्धिक, आत्मिक, सामाजिक अशा अनेक पातळ्यांवर विकास होतो.

2. **शिक्षणाचा अर्थ**

‘या विद्या मा विमुक्तये’ – जी मुक्त करते ती विद्या.

Education 1. Educave - उभारणे, पोषण, करणे, जोपासणे, बाहेर काढणे , नेतृत्वातून दिशादर्शन करणे

1. Education - प्रशिक्षण देणे, तयार करणे.

**3. शिक्षणाची वैशिष्ट्ये**

1 हेतूपूर्वक

2 नियोजनपूर्वक प्रक्रिया

3 आजीवन चालणारी (Long life)

4 प्रभावानुसार होणारी प्रक्रिया

5 विकासात्मक प्रक्रिया

6 शिक्षण द्विधृवीय प्रक्रिया (शिक्षक व विद्यार्थी)

7 शिक्षण तीन धृवी प्रक्रिया (शिक्षक, विद्यार्थी, अभ्यास)

8 मानसशास्त्रीय प्रक्रिया

9 समाजशास्त्रीय प्रक्रिया
10 शिक्षण नैसर्गिक प्रक्रिया
11 शिक्षण नैसर्गिक प्रक्रिया

**4. शिक्षणाची कार्ये**

1. वैयक्तिक विकासाची कार्ये
2. सामाजिक विकासाची कार्ये




**5. शिक्षण पद्धती –**

1. अप्रत्यक्ष शिक्षण
2. प्रत्यक्ष शिक्षण
3. वैयक्तिक शिक्षण
4. सामुहिक शिक्षण
5. सर्वसामान्य शिक्षण
6. विशेष शिक्षण

   1. **प्रासंगिक (Informal)** – प्रासंगिक शिक्षण म्हणजे प्रसंगानुरुप मिळणारे शिक्षण. जगण्याच्या स्वाभाविक प्रक्रियेत जे ज्ञान सहजतेने मिळते ते सहज शिक्षण होय. समाजाच्या अनुषंगाने जे आपण शिकतो ते सहज शिक्षण होय. विविध अनुभवांतून काहीतरी षिकत असतो ते सहज शिक्षण. निरीक्षण, अनुभव, अनुकरण व परानुभवातून मिळणारे सर्व शिक्षण म्हणजे सहज शिक्षण होय.

**2. औपचारिक शिक्षण** (Formal) – ज्ञान देण्याची, ज्ञान घेण्याची प्रक्रिया हेतूपूर्वक, सुसंघटीतपणे व योजनाबद्ध पद्धतीने चालते ते औपचारिक शिक्षण होय.

**6. औपचारिक शिक्षणाची वैशिष्ट्ये –**

1. हेतूपूर्ण
2. कालावधी निश्चित
3. शिक्षण देणारी औपचारिक संस्था
4. वेळ
5. प्रशिक्षित शिक्षक
6. उपस्थिती अनिवार्य
7. शिक्षकाचे स्थान
8. अभ्यासक्रम
9. परीक्षा पद्धती
10. नियम

**7. सातत्यपूर्ण शिक्षण/निरंतर शिक्षण (Non-formal)** – निरंतर शिक्षण म्हणजे **सातत्यपूर्ण शिक्षण**. निरंतर शिक्षण म्हणजे आजीवन शिक्षण. निरंतर शिक्षण म्हणजे जीवनभर शिक्षण. निरंतर शिक्षणाची 'माणूस' हा जन्मभर विद्यार्थी ही संकल्पना आहे.

**सातत्यपूर्ण शिक्षण किंवा निरंतर शिक्षणामागील भूमिका –**

1. सातत्यपूर्ण शिक्षणाला कोणतेही स्तर मान्य नाहीत.
2. सातत्यपूर्ण शिक्षण आयंष्यभर चालू राहते.
3. सातत्यपूर्ण शिक्षणामध्ये गरजेनुसार बदल होत राहतो.
4. सातत्यपूर्ण शिक्षणामध्ये व्यक्तीभेद राहतो.
5. सातत्यपूर्ण शिक्षण वैयक्तिक विकासास पूरक राहते.

### 5.2.4 ड. ज्ञानाची रचना आणि वंचितांचे शिक्षण

या उपघटकाचा अभ्यास केल्यानंतर खालील बाबी आपल्या लक्षात येतील.

1. पार्श्वभूमी.
2. ज्ञानरचनावाद
3. ज्ञानरचनावादी अध्यापन
4. वंचितांचे शिक्षण

### 1. पार्श्वभूमी

या आकांक्षा, समाजाच्या अपेक्षा व विद्यार्थ्यांच्या गरजा यांच्या पूर्तीसाठी शिक्षण हा एक महत्त्वाचा घटक आहे. व्यक्ती व राष्ट्र यांच्या विकासामध्ये महत्त्वाच्या कामगिरीसाठी शिक्षणप्रक्रियेमध्ये परिवर्तन आवश्यक आहे. आजच्या, उद्याच्या अनेकविध आव्हानांना सामोरे जाण्यासाठीच्या क्षमता शिक्षणातून याव्यात यासाठी अभ्यासक्रम आणि अध्ययन–अध्यापन प्रक्रिया ज्ञानाधिष्ठीत व विद्यार्थीकेंद्रीत असायला हवी.

ज्ञान म्हणजे जोडून घेणे, ज्ञान हे साध्य असले पाहिजेत. सभोवतालचा समाज, परिसर यासंदर्भातून शिक्षण घडते. सभोवतालच्या परिसराशी होणाऱ्या क्रिया–प्रतिक्रियांद्वारे ज्ञानाची रचना होते. विद्यार्थी हा ज्ञानाचा निर्माता असतो. विद्यार्थी शिकण्याच्या प्रक्रियेत सहभागी झाला पाहिजे. त्याच्या पूर्वज्ञानाचा, तारतम्य बुद्धीचा व निरीक्षण क्षमतेचा उपयोग करुन ज्ञाननिम्रितीची संधी मिळून विद्यार्थी ज्ञानाचा निर्माता व्हावा ही ज्ञानरचनावादी दृष्टिकोनाची महत्त्वाची भूमिका आहे

### 2. ज्ञानरचनावाद

ज्ञानरचनावाद constructivism हा शब्द con strucre या लॅटिन शब्दापासून तयार झाला. con strucre म्हणजे construct. म्हणजेच मांडणी करणे किंचा रचना करणे. ज्ञानाची रचना करण्याची प्रक्रिया कार्यान्वित ठेवणे हा ज्ञानरचनावादाचा गाभा आहे. पूर्वज्ञानाच्या किंवा पुर्वानुभाच्या आधारे जेव्हा व्यक्ती नवीन संकल्पना/संबोधांची रचना करते तेव्हा त्यातून जे अध्ययन घडते त्याला ज्ञानरचनावाद म्हणतात. सक्रिय अनुभव घेण्याच्या प्रक्रियेतून विद्यार्थी नवीन ज्ञान निर्मिती करतात.

ज्ञानरचनावादानुसार ज्ञान प्रेषित म्हणजे एकाने दुसऱ्यापर्यंत पोहोचविणे होत नसून ज्ञानाची निर्मिती होत असते. Knowledge is not transmitted, it is constructed. ज्ञानरचनावादामध्ये निर्माण झालेल्या ज्ञानावर भर देण्यापेक्षा ज्ञाननिर्मितीच्या प्रक्रियेवर भर दिला जातो. पारंपारिक अध्यापन पद्धतीमध्ये एकमार्गी संप्रेषण आहे. याउलट ज्ञानरचनावादी पद्धीनुसार ज्ञाननिर्मितीसाठी वैयक्तिक स्वातंत्र्य देण्याबरोबर, सामुहिक व सहकार्यातून ज्ञाननिर्मितीवर भर आहे. एक प्रश्न व त्याला अनेक उत्तरे यालाही स्थान दिले जाते. ज्ञानरचनावादामध्ये शिक्षक ज्ञानदान न करता ज्ञाननिर्मितीसाठी मागदर्शन व मदत करतात.

### 3. ज्ञानाची रचना –

ज्ञान ही एक शक्ती आहे. देशातील मनुष्यबळाचा पुरेपुर वापर होण्यासाठी, राष्ट्रीय उत्पादकता वाढण्यासाठी शिक्षण प्रक्रियेमध्ये अमुलाग्र बदल आवश्यक आहेत. संशोधन, प्रयोग आणि प्रयत्न झाले पाहिजेत. यासाठी एकूणच शिक्षणप्रक्रिया 'ज्ञानाधिष्ठीत झाली पाहिजेत.

**ज्ञान –**

ज्या माहितीच्या आधारे आपण वास्तव परिस्थितीचे आकलन करु शकतो, तिचे स्पष्टीकरण करु शकतो, तिचे नियंत्रण करु शकतो, भविष्यकथन करु शकतो अशी बाब / वर्तन म्हणजे ज्ञान होय.




**4. ज्ञानरचनावादी अध्यापन**

1. ज्ञाननिर्मितीवर भर असलेले अध्ययन विद्यार्थ्यांनी करावे.
2. अध्ययन कसे करावे याचे कौशल्य विद्यार्थ्यांनी प्राप्त करावे.
3. पोषक वातावरण निर्मिती करुन विद्यार्थ्यांना अध्ययनास प्रवृत्त करो.
4. प्रश्न विचारुन विद्यार्थ्यांना विचार, चिंतन करण्यास उद्युक्त करावे.
5. समोर मांडलेल्या माहितीच्या पलीकडे जाऊन शोध घेण्यास विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

ज्ञानरचनावादात जीन पियाजे, विगोत्सी, ब्रुनर या विचारवंतानी मोलाची भर घातली आहे. 2005 च्या अभ्यासक्रमात ज्ञानरचनावादास विशेष प्राधान्य दिले आहे.

5. **वंचितांचे शिक्षण** (Marginalized students)

शिक्षणापासून वंचित घटक –

भारतीय राज्यघटनेने समाजातील सर्व घटकांना शि़क्षण घेण्याचा हक्क दिला आहे. तथापि आजही समाजातील काही घटक शिक्षणापासून वंचित आहेत.

वंचित घटक – सामान्य हक्कांपासून ज्यांना सामाजिक, आर्थिक, शारीरिक कारणांमुळे दूर रहावे लागते त्यांना वंचित घटक म्हटले जाते.

शिक्षणातील वंचित घटक

1. सामाजिकदृष्ट्या वंचित घटक :
   1. मुली
   2. विमुक्त भटक्या जमाती
   3. अनुसूचित जाती
   4. झोपडपट्टीतील रहिवाशी
   5. देवदासी
   6. वारांगणा
2. शारीरिकदृष्ट्या वंचित :
   1. मूकबधिर
   2. अंध
   3. कर्णबधिर
   4. अस्थिव्यंग
   5. मतिमंद
   6. गतिमंद
3. मानसिकदृष्ट्या, सामाजिक दबाव, न्यूनगंड असलेली

**5.4 सारांश**

सर्व शिक्षा अभियान योजनेची सर्व शिक्षा अभियान या योजनेची सुरूवात 2001 पासून झाली. ही केंद्र व राज्यशासनाची महत्त्वाकांक्षी योजना मानली जाते. घटनेचे 45 व्या कलमानुसार 6 ते 14 वयोगटातील मुलांमुलीना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देणे ही सरकारची जबाबदारी आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम 45 नुसार देशातील सर्व मुलांना वयाच्या 14 व्या वर्षांपर्यत मोफत व सक्तीचे शिक्षण दिले जावे अशी अपेक्षा होती पण आजतायागत यामध्ये 100 टक्के यश मिळालेले नाही. दिनांक 4 आगस्ट 2009 रोजी लोकसभेने शिक्षण हक्क विधेयक संमत केले. या विधेयकामुळे प्राथमिक शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक शैक्षणिक क्रांती घडून येईल अशी अपेक्षा आहे. निरंतर शिक्षण म्हणजे सातत्यपूर्ण शिक्षण. निरंतर शिक्षण म्हणजे आजीवन शिक्षण. निरंतर शिक्षण म्हणजे जीवनभर शिक्षण. निरंतर शिक्षणाची 'माणूस' हा जन्मभर विद्यार्थी ही संकल्पना आहे. ज्ञान ही एक शक्ती आहे. देशातील मनुष्यबळाचा पुरेपुर वापर होण्यासाठी, राष्ट्रीय उत्पादकता वाढण्यासाठी शिक्षण प्रक्रियेमध्ये अमुलाग्र बदल आवश्यक आहेत. संशोधन, प्रयोग आणि प्रयत्न झाले पाहिजेत. यासाठी एकूणच शिक्षणप्रक्रिया 'ज्ञानाधिष्ठीत झाली पाहिजेत. भारतीय राज्यघटनेने समाजातील सर्व घटकांना शि्क्षण घेण्याचा हक्क दिला आहे. तथापि आजही समाजातील काही घटक शिक्षणापासून वंचित आहेत. सामान्य हक्कांपासून ज्यांना सामाजिक, आर्थिक, शारीरिक कारणांमुळे दूर रहावे लागते त्यांना वंचित घटक म्हटले जाते.

**5.5 स्वाध्याय**

1. सर्व शिक्षा अभियान विविध योजनेची सुरुवात केव्हा झाली ?
2. घटनेच्या 45 व्या कलमात कोणती तरतुद आहे ?
3. सर्व शिक्षा अभियान विविध योजनेचे मूळ हेतू कोणते ?
4. सर्व शिक्षा अभियान योजनेतील अपेक्षा कोणत्या ?
5. सर्व शिक्षा अभियान या योजनेची उद्‌दिष्टे कोणती ?
6. सर्व शिक्षा अभियानातील विविध योजना कोणत्या ?
7. सर्व शिक्षा अभियानातील कार्यात्मक विभाग कोणते ?
8. शिक्षणाचा हक्क म्हणजे काय ?
9. 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009' विशद करा.
10. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 मध्ये शिक्षकाची भूमिका कोणती आहे ?
11. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 मध्ये मुख्याध्यापकांची जबाबदारी कोणती आहे ?
12. घटनेच्या 45 व्या कलमामध्ये कोणती तरतुद आहे ?
13. सन 2002 मध्ये शिक्षणासंबंधी 86 व्या घटना दुरुस्तीमध्ये कोणती तरतुद केली आहे ?
14. बालकांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या विधेयकास लोकसभेने केव्हा मान्यता दिली ?
15. बालकांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या विधेयकास राज्यसभेने केव्हा मान्यता दिली ?
16. या विधेयकावर मा. राष्ट्रपतींनी केव्हा शिक्कामोर्तब केले ?
17. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम महाराष्ट्र राज्यात केव्हा लागू झाला ?
18. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 मध्ये शाळा व्यवस्थापन समिती व पालक यांची भूमिका कोणती आहे ?
19. ज्ञान म्हणजे काय ?
20. ज्ञानरचनावाद ही संकल्पना स्पष्ट करा.
21. ज्ञानरचनावादी अध्यापनातील शिक्षकाची भूमिका विशद करा
22. शिक्षण म्हणजे काय ?
23. शिक्षण प्रक्रियेची वैशिष्ट्ये कोणती ?
24. शिक्षणाची कार्ये कोणती ?
25. शिक्षण पद्धतीचे प्रकार कोणते ?

26. सातत्यपूर्ण शिक्षण म्हणजे काय ?
27. सातत्यपूर्ण शिक्षणामागील भूमिका कोणती ?
28. वंचितांचे शिक्षण ही संकल्पना स्पष्ट करा.

### 5.6 संदर्भ


1. प्रा. आर्. आर्. माने, प्रा. व्ही. आर्. पालकर. समकालीन भारत आणि शिक्षण.
2. डॉ. लता पाटील, डॉ. भारती साकेकर. ज्ञान आणि अभ्यासक्रम.
3. डॉ. शैलजा भंगाळे. समकालीन भारत आणि शिक्षण.
4. डॉ. तापकीर दत्तात्रय, डॉ. तापकीर निर्मला, 2008. शिक्षणाचे तात्त्विक अधिष्ठान, नूतन प्रकाशन पुणे.
5. डॉ. करंदीकर सुरेश, डॉ. करंदीकर मीना, 2010, उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, फडके प्रकाशन कोल्हापूर.
6. प्रा. घोरमोडे यु. य., शैक्षणिक प्रशासन व व्यवस्थापन, विद्या प्रकाशन पुणे.
7. दुनाखे अ. रा., 2009, प्रगत शैक्षणिक तत्त्वज्ञान, नित्य नूतन प्रकाशन पुणे.
8. पारसनीस न. रा., 1998, शिक्षणाची तात्त्विक व समाजशास्त्रीय भूमिका, नूतन प्रकाशन पुणे.
9. डॉ. भोसले रमा, डोणे उज्ज्वला, शिक्षणातील बदलते विचारप्रवाह, फडके प्रकाशन कोल्हापूर.
10. कुंडले म. बा., 1998, शैक्षणिक तत्त्वज्ञान व शेक्षणिक समाजशास्त्र, श्री विद्या प्रकाशन पुणे.
11. प्रा. के. डी. शिंदे, प्रा. अनुराधा गोल्हार, 2017, समकालीन भारतातील शिक्षण, वर्ग आणि समाज, श्री प्रकाशन पुणे.
12. डॉ. चव्हाण संध्या विजय, ज्ञान अभ्यासक्रम आणि भाषार्जन, श्री प्रकाशन पुणे.
13. डॉ. भोसले आरती, प्रा. सरपोतदार प्राची, 2017, ज्ञान आणि अभ्यासक्रम, फडके प्रकाशन कोल्हापूर
14. प्रा. कपोले अरविंद, डॉ. सपकाळे आरती, भारतीय समाज आणि शिक्षण
15. डॉ. पेंडके प्रतिभा, भारतीय शिक्षणपद्धतीचा विकास आणि शालेय प्रक्रियेचे अधिष्ठान, श्री मंगेश प्रकाशन नागपूर

डॉ. रायकर एस्. एम्.
दिनकरराव के. शिंदे शिक्षणशास्त्र
महाविद्यालय गडहिंग्लज

# घटक क्रमांक – 6
# शिक्षकाची भूमिका

**अनुक्रमणिका**

6.0 उद्दिष्टे
6.1 प्रास्ताविक
6.2 विषय विवेचन
6.2.1 अ. विद्यार्थ्यांच्या किशोरावस्थेमध्ये शिक्षकाची भूमिका
6.2.2 ब. शाळेसंबंधी शिक्षकाची भूमिका
6.2.3 क. समाजाशी संबंधीत शिक्षकाची भूमिका
6.2.4 ड. शिक्षणाचे सार्वत्रिकरण व सर्वसमावेशक शिक्षणामध्ये शिक्षकाची भूमिका
6.3 सारांश
6.4 स्वाध्याय
6.5 संदर्भ

---

## 6.0 उद्दिष्टे

आपण या घटकातून विद्यार्थ्यांच्या किशोरावस्थेमध्ये शिक्षकाची भूमिका, शाळेसंबंधी शिक्षकाची भूमिका, समाजाशी संबंधीत शिक्षकाची भूमिका, शिक्षणाचे सार्वत्रिकरण व सर्वसमावेशक शिक्षणामध्ये शिक्षकाची भूमिका या बाबी अभ्यासणार आहोत.

या घटकातून आपणास –

1. विद्यार्थ्यांच्या किशोरावस्थेमध्ये शिक्षकाची भूमिका सांगता येईल.
2. शाळेसंबंधी शिक्षकाची भूमिका सांगता येईल.
3. समाजाशी संबंधीत शिक्षकाची भूमिका सांगता येईल.
4. शिक्षणाचे सार्वत्रिकरण व सर्वसमावेशक शिक्षणामध्ये शिक्षकाची भूमिका सांगता येईल.

## 6.1 प्रास्ताविक

1. शिक्षणाचा आणि शिक्षकाचा परस्परसंबंध आहे. शिक्षणाची गुणवत्ता ही शिक्षकावर अवलंबून आहे. यासाठी दर्जेदार शिक्षणासाठी दर्जेदार शिक्षक असले पाहिजे. म्हणूनच प्राचीन काळी शिक्षकाला सर्वश्रेष्ठ स्थान होते. शिक्षक या नात्याने विद्यार्थ्याच्या विकासप्रक्रियेचा अभ्यास आवश्यक आहे. विचारप्रक्रियेच्या अभ्यासामुळे शिक्षकाला विद्यार्थ्याच्या विकासाच्या विविध अवस्थांची वैशिष्ट्चे कळतात. त्यामुळे विद्यार्थी विशिष्ट अवस्थेत कसा असतो व कसा असावा हे शिक्षकाला समजते. मुलांची कुमारावस्था अत्यंत नाजूक असते. कुमारावस्थेतील मुले माध्यमिक शिक्षणाच्या टप्प्यात आलेली असतात. या अवस्थेतील मुलांना समजून घेतले पाहिजे. मुलांच्या नैसर्गिक भावना न ओळखता केवळ त्यांची हेटाळणी करणे किंवा त्याकडे दुर्लक्ष करणे हे मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासास मारक ठरण्याची शक्यता असते.शाळा ही विद्यार्थ्याच्या जडणघडणीचे एक संस्कारकेंद्र आहे. यासाठी शिक्षकाचा आणि शाळेचा परस्परसंबंध आहे. शाळेचा अविभाज्य घटक म्हणजे शिक्षक होय. शाळेत अध्ययनासाठी पोषक, अनुकूल वातावरण निर्माण करण्याची भूमिका शिक्षकाची असायला हवी. शाळेत विविधांगी भूमिका शिक्षकाची असायला हवी. शाळा म्हणजे मुलांचा सुयोग्य व अपेक्षित दिशेने विकास व्हावा या हेतूने विशिष्ट प्रकारचे गुणसमृद्ध जीवन, विशिष्ट पद्धतीच्या कृती व व्यवसाय यांचा लाभ करुन देणारे खास वातावरण होय ही बाब शिक्षकाने लक्षात घेतली पाहिजे. समाजनियंत्रण आणि समाजपरिवर्तन ही दोन्ही कार्ये शाळेच्या म्हणजेच शिक्षणाच्या माध्यमातून पार पडतात. शिक्षक आपल्या वर्तनाने, दृष्टिकोनाने शाळेवर म्हणजेच विद्यार्थ्यांवर प्रभाव टाकू शकतो. यासाठी शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे. शाळा आणि समाज दोहोंचाही विकास होण्यामध्ये शिक्षक हा

महत्त्वाचा दुवा असतो. समाजातील मागास, दुर्बल, अल्पसंख्यांक, आदिवासी, गोरगरीब, अपंग अशा सर्व स्तरांतील घटकांना शिक्षणामध्ये सहभागी करुन घेणे अपेक्षित आहे. समाजातील सर्व घटकांना शिक्षणाच्या विविध, समान तसेच सर्व सुविधा व संधी निर्माण करुन देणे अपेक्षित आहे. त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, त्यांच्या गरजेनुसार, आवडीनुसार व क्षमतेनुसार शिक्षण देणे अपेक्षित आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणामध्ये शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे. शिक्षणाच्या वेगवेगळ्या संधी वेगळवेगळ्या मार्गांनी, पद्धतींनी उपलब्ध करून देणे म्हणजे सर्व समावेशक शिक्षण होय.

**6.2.1 अ. विद्यार्थ्यांच्या किशोरावस्थेमध्ये शिक्षकाची भूमिका**

या उपघटकाचा अभ्यास केल्यानंतर खालील बाबी आपल्या लक्षात येतील.

1. शिक्षकाची भूमिका
2. शिक्षकाची गुणवैशिष्ट्ये
3. शिक्षकाची भूमिका
4. विकासाच्या अवस्था
5. शैक्षणिक महत्त्व

**1. शिक्षकाची भूमिका**

मानवाला सर्व प्रकारच्या अपूर्णततेतून मुक्त करणारे, माणसाला सुसंस्कृत बनविणारे व त्याचा सर्वांगीण विकास करणारे हेच खरे शिक्षण होय. शिक्षणाचा आणि शिक्षकाचा परस्परसंबंध आहे. शिक्षणाची गुणवत्ता ही शिक्षकावर अवलंबून आहे. यासाठी दर्जेदार शिक्षणासाठी दर्जेदार शिक्षक असले पाहिजे. म्हणूनच प्राचीन काळी शिक्षकाला सर्वश्रेष्ठ स्थान होते.

गुरुर्ब्रम्हा, गुरुर्विष्णू, गुरुर्देवो महेश्वरः !
गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्रीगुरुवे नमः !!

**2. शिक्षकाची गुणवैशिष्ट्ये**

शिक्षकाची गुणवैशिष्ट्ये

- T= Trained → प्रशिक्षित
- E = Efficeiency → कार्यकुशल
- A = Ability → कार्यक्षमता असणारा
- C = Character → चारित्र्यसंपन्न
- H = Honest → प्रामाणिक
- E = Eager → धडपड्या
- R = Responsibility → उत्तरदायित्व

**शिक्षकाची गुणवैशिष्ट्ये**

1. बहुश्रुतता
2. प्रसन्न व्यक्तिमत्त्व
3. व्यावसायिक नीतिमत्ता
4. आजन्म विद्यार्थी

5. उत्तम निरीक्षक
6. हरहुन्नरी
7. अध्यापनावर प्रभुत्व
8. निष्ठा
9. आत्मविश्वास
10. चिकाटी
11. शिस्तप्रियता
12. संयम
13. विद्यार्थ्यांबद्दल आत्मीयता
14. अद्ययावत ज्ञान

**3. शिक्षकाची भूमिका**

शिक्षक या नात्याने विद्यार्थ्याच्या विकासप्रक्रियेचा अभ्यास आवश्यक आहे. विचारप्रक्रियेच्या अभ्यासामुळे शिक्षकाला विद्यार्थ्याच्या विकासाच्या विविध अवस्थांची वैशिष्ट्ये कळतात. त्यामुळे विद्यार्थी विशिष्ट अवस्थेत कसा असतो व कसा असावा हे शिक्षकाला समजते. शिक्षकाला विद्यार्थ्याच्या विकासावस्थेचे ज्ञान झाले की त्यानुसार अभ्यासक्रम, अध्यापन पद्धतींची निवड करणे आणि विद्यार्थ्यांच्या अडचणींनुसार मार्गदर्शन करणे शक्य होते.

विचारप्रक्रिया ही सतत चालणारी प्रक्रिया असून विकास हा क्रमशः होत जातो. विकासप्रक्रिया ही संश्लेषणात्मक स्वरुपाची असते हे शिक्षकाने लक्षात घेतले पाहिजेत. तसेच विकासप्रक्रियेत व्यक्तीभिन्नता आढळते. विकासप्रक्रियेमध्ये व्यक्तीचे जैविक घटक व तिच्या भोवतालचा परिसर यांचा फार मोठा वाटा असतो. व्यक्तीविकास होत असताना तो विविध अंगांनी होत असतो. शारीरिक विकास, मानसिक विकास, भावनिक विकास व सामाजिक विकास या चतुर्विध अंगाने व्यक्तीविकास घडत असतो.

**4. विकासाच्या अवस्था**

| क्रमांक | अवस्था | | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | शैशवावस्था | | जन्मापासून तीन वर्षांचा काळ |
| 2 | बाल्यावस्था | पूर्व बाल्यावस्था | 3+ ते 6 वर्षांपर्यंतचा काळ |
| | | उत्तर बाल्यावस्था | 6 ते 12+ वर्षांपर्यंतचा काळ |
| 3 | कौमार्यावस्था | पूर्व कौमार्यावस्था | 13 ते 15 वर्षांपर्यंतचा काळ |
| | | उत्तर कौमार्यावस्था | 15 ते 19 वर्षांपर्यंतचा काळ |

**5. शैक्षणिक महत्त्व**

**1. बाल्यावस्था**

या वयोगटातील मुले शालेय विद्यार्थी असतात. मूल तीन–साडेतीन वर्षांचे झाले की त्याला बालवाडीत दाखल केले जाते. ज्या ठिकाणी बालवाडीची सोय नसते, तेथे सहा वर्षांनी पहिलीत दाखल होते. शिक्षकाला मुलांच्या विकासाची लक्षणे माहित असणे गरजेचे आहे. मुलांची या वयात स्मरणशक्ती वाढलेली असते. या अवस्थेत पाठांतर देण्यास हरकत नाही. याच वयात जिज्ञासावृत्ती वाढते. मुलांच्या जिज्ञासावृत्तीला शिक्षकांनी चालना दिली पाहिजे.

बाल्यावस्थेमध्ये मुलांची प्रवृत्ती आपल्या मित्रांच्या टोळ्या करुन राहण्याकडे असते. या बाबीचा शालेय उपक्रमातून फायदा करुन घेतला पाहिजे. विद्यार्थ्यांचे गट, विविध स्पर्धा, जबाबदारी, विविध कार्यक्रम, प्रदर्शनांचे आयोजन करुन विद्यार्थ्यांच्या क्रियाशक्तीला चालना दिली पाहिजे.

**2. कुमारावस्था**

मुलांची कुमारावस्था अत्यंत नाजूक असते. कुमारावस्थेतील मुले माध्यमिक शिक्षणाच्या टप्प्यात आलेली असतात. या अवस्थेतील मुलांना समजून घेतले पाहिजे. मुलांच्या नैसर्गिक भावना न ओळखता केवळ त्यांची हेटाळणी करणे किंवा त्याकडे दुर्लक्ष करणे हे मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासास मारक ठरण्याची शक्यता असते. यासाठी या वयातील मुलांच्या नैसर्गिक भावना समजून घेतल्या पाहिजेत. मुलांशी मित्रत्वाचे नाते निर्माण होण्यासाठी प्रयत्न करावे. या वयातील मुले स्वतःची मते बनवितात. बऱ्याचदा त्यांची मते आदर्शवादी असतात. मुलांच्या मताचा आदर केला पाहिजेत. आपली मते मुलांवर लादण्याचा प्रयत्न करु नये. या वयोगटातील मुलांकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. विद्यार्थ्याच्या मनःस्थितीचा व कुवतीचा विचार करुन अध्यापन केले पाहिजेत. त्यांच्या प्रवृत्तीला जोपासले पाहिजे. या वयातील शालेय जीवनात शिक्षकाच्या आचारात व विचारात जर विसंगती दिसू लागली तर विद्यार्थ्यांना अशा शिक्षकांबाबत आदर वाटत नाही. विद्यार्थ्यांच्या सहजीवनाला चालना देण्याच्या दृष्टीने शिक्षकाने पुढाकार घेऊन शिबीरे, सहली, संमेलने इत्यादींचे आयोजन करावे. या वयातील मुलांवर आधिक जबाबदारी टाकली की ती जबाबदारीने वागू लागतात. विद्यार्थी आधिकाधिक समाजाभिमुख बनावा यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करावे.

कोणत्या वयातील मुलांना कोणत्या प्रकारचे शिक्षण द्यावे हे समजून घेतले पाहिजेत. प्रत्येक बालक हे त्याच्या मातापित्याकडून काही अनुवांशिक बाबी घेऊन आलेले असते. त्या लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे आवश्यक असते. प्रत्येक विद्यार्थ्यावर सारखेच कष्ट घेतले तरी प्रत्येकजण सारख्याच गतीने प्रगती करेल याची खात्री देता येत नाही. म्हणून मागे राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दोष न देता त्यांना समजून घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना किती प्रमाणात व कोणत्या वेळी प्रशिक्षण व सराव द्यावा याचे ज्ञान व भान शिक्षकाला असणे आवश्यक आहे. मुलांचा जन्मजात कल शोधून त्याला मार्गदर्शन करणे शिक्षक आणि विद्यार्थी दोघांच्याही हिताचे आहे.

**6.2.2 ब. शाळेसंबंधी शिक्षकाची भूमिका**

या उपघटकाचा अभ्यास केल्यानंतर खालील बाबी आपल्या लक्षात येतील.

1. शाळेसंबंधी शिक्षकाची भूमिका : पार्श्वभूमी
2. शाळेसंबंधी शिक्षकाची भूमिका

**1. पार्श्वभूमी**

शाळा ही समाजाच्या जडणघडणीचे महत्त्वाचे केंद्र आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी पोषक वातावरण शाळेतच निर्माण करणे शक्य आहे. विद्यार्थी आणि शिक्षक म्हणजेच अध्ययन आणि अध्यापन महत्त्वाचे ठिकाण म्हणजे शाळा होय. शाळा ही समाजाची प्रतिकृती मानली जाते. विद्यार्थ्याच्या जीवनासाठी उपयुक्त सर्व क्षमता, मूल्ये, कौशल्ये, संस्कार तसेच बौद्धिक, भावनिक व शारीरिक विकास होण्यासाठी शाळा आणि विद्यार्थी यांच्यात आंतरक्रिया प्रस्थापित होण्यासाठी शिक्षकावर मोठी जबाबदारी आहे.

शाळा ही विद्यार्थ्याच्या जडणघडणीचे एक संस्कारकेंद्र आहे. यासाठी शिक्षकाचा आणि शाळेचा परस्परसंबंध आहे. शाळेचा अविभाज्य घटक म्हणजे शिक्षक होय. शाळेत अध्ययनासाठी पोषक, अनुकूल वातावरण निर्माण करण्याची भूमिका शिक्षकाची असायला हवी. शाळेत विविधांगी भूमिका शिक्षकाची असायला हवी.

**2. शिक्षकाची भूमिका**

शिक्षकाचे प्रमुख कार्य आणि ध्येय अध्यापन हे आहे. आपले अध्यापन सकस, सफल व परिणामकारक होण्यासाठी अध्यापनाशी संबंधीत सर्व बाबी म्हणजेच अभ्यासक्रम, उद्दिष्टे, अध्यापन विषय, अध्यापनाच्या विविध पद्धती, अध्यापनाची

तंत्रे, विविध शैक्षणिक साधने, विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र अशा अनेकविध बाबी शिक्षकाने जाणीवपूर्वक लक्षात घेऊन काम केले पाहिजे.

शाळा म्हणजे मुलांचा सुयोग्य व अपेक्षित दिशेने विकास व्हावा या हेतूने विशिष्ट प्रकारचे गुणसमृद्ध जीवन, विशिष्ट पद्धतीच्या कृती व व्यवसाय यांचा लाभ करुन देणारे खास वातावरण होय ही बाब शिक्षकाने लक्षात घेतली पाहिजे. जॉन ड्युई यांच्या मते मुलांना भावी जीवनाच्या दृष्टीने घडविणे, समर्थ व कार्यक्षम बनविण्याचा जागा म्हणजेच शाळा होय. याचाच अर्थ विद्यार्थ्यांमधील सुप्त शक्तींचा विकास करुन त्यांचे व्यक्तिमत्त्व सर्वांगाने विकसित करण्याचा प्रयत्न शिक्षकाने शाळेत केला पाहिजे. भावी आयुष्यात विद्यार्थ्यांना यशस्वी होता यावे, सुयोग्य समायोजन करता यावे यासाठी मानसिक विकास आणि व्यापक दृष्टिकोन बनविण्याचा प्रयत्न शाळेतच होतो. यासाठी शिक्षकाची भूमिका पूरक असली पाहिजे.

1. संस्कृती संक्रमण व संवर्धन
2. समाजीकरण
3. बौद्धिक विकास
4. भावनिक, मानसिक विकास,
5. शारीरिक विकास
6. स्वावलंबी जीवनासाठी क्षमता, कौशल्ये विकसित करणे.
7. व्यक्तीगत भिन्नतेनुसार संधी निर्माण करुन देणे.
8. विद्यार्थ्याच्या विशेष क्षमता, कल, कला, प्रज्ञा यांचा शोध व विकास.
9. नागरिकत्वाचे शिक्षण.
10. नेतृत्वाचे शिक्षण.
11. समाजाच्या अपेक्षांची पूर्तता करण्याची जाणीव निर्माण करणे.
12. नैतिक मूल्यांचे शिक्षण.
13. शिस्त, चारित्र्याची जडणघडण यासाठी शिक्षण.
14. विद्यार्थी, शाळा व समाज यांचा परस्परसंबंध निर्माण करणे.

### 6.2.3 क. समाजाशी संबंधीत शिक्षकाची भूमिका

या उपघटकाचा अभ्यास केल्यानंतर खालील बाबी आपल्या लक्षात येतील.

1. समाजाशी संबंधीत शिक्षकाची भूमिका : पार्श्वभूमी
2. समाजाशी संबंधीत शिक्षकाची भूमिका

### 1. पार्श्वभूमी

सर्व सजीव प्राण्यांमध्ये मानव हा सर्वश्रेष्ठ प्राणी समजला जातो. कारण मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर वैयक्तिक विकास केलाच केला व स्वतःबरोबर समाजाचाही विकास केला. त्यामुळे आदिमानव आणि आजचा मानव यांच्यात जमीन अस्मानाचे अंतर आहे. म्हणून बुद्धीच्या विकासासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. किंबहुना शिक्षण हेच मानवाच्या आणि समाजाच्या विकासाचे प्रमुख साधन आहे.

समाजनियंत्रण आणि समाजपरिवर्तन ही दोन्ही कार्ये शाळेच्या म्हणजेच शिक्षणाच्या माध्यमातून पार पडतात. शिक्षक आपल्या वर्तनाने, दृष्टिकोनाने शाळेवर म्हणजेच विद्यार्थ्यांवर प्रभाव टाकू शकतो. यासाठी शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे. शाळा आणि समाज दोहोंचाही विकास होण्यामध्ये शिक्षक हा महत्त्वाचा दुवा असतो. म्हणून शाळा व समाज यांचा परस्परसंबंध जितका वाढेल, सामाजिक गरजा व सामाजिक समस्यांची जाणीव विद्यार्थ्यांना ज्या प्रमाणात होईल व प्राप्त कौशल्यांची सामाजिक जीवनात उपयोजन करण्याची संधी जितकी अधिक प्रमाणात मिळेल तितकी शाळेची उपयुक्तता कार्यक्षमता वाढेल व पर्यायाने सामाजिक विकास व समाज परिवर्तन होईल म्हणून शिक्षक यादृष्टीने कार्यक्षम झाला पाहिजे.

**2. समाजाशी संबंधीत शिक्षकाची भूमिका**

1. जीवनानुभवी अभ्यासक्रम.
2. सामाजिक समस्यांची जाणीव व सोडवणूकीसाठी प्रयत्न.
3. सांस्कृतिक विकास.
4. समाजिकरणासाठी शिक्षण.
5. समाजोपयोगी व सामाजिक हिताचे शिक्षण
6. समाजाचा शाळेसाठी सहभाग.
7. शाळेची समाजासाठी उपयुक्तता.
8. शाळा व समाज यांच्यात आंतरक्रिया निर्मितीसाठी प्रयत्न.
9. सामाजिक मूल्यांची रुजवणूक.
10. सामाजिक अडसरांचे निर्मूलनासाठी प्रयत्न.
11. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन.
12. सामाजिक परिवर्तनासाठी पोषक वातावरण निर्मिती.
13. सामाजिक परंपरांचा स्वीकार.
14. सृजनशील विधायक कार्य.
15. शाश्वत विकासाची जाणीव.
16. जीवनकौशल्यांचे शिक्षण.

**6.2.4 ड. शिक्षणाचे सार्वत्रिकरण व सर्वसमावेशक शिक्षणामध्ये शिक्षकाची भूमिका**

या उपघटकाचा अभ्यास केल्यानंतर खालील बाबी आपल्या लक्षात येतील.

1. पार्श्वभूमी
2. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणामध्ये शिक्षकाची भूमिका
3. सर्वसमावेशक शिक्षण
4. सर्वसमावेशक शिक्षणामध्ये शिक्षकाची भूमिका

**1. पार्श्वभूमी**

एकवीसाव्या शतकामध्ये 'शिक्षण' ही प्रत्येकाची अनिवार्य गरज बनली आहे. व्यक्तीगत विकासापासून जागतिक विकासापर्यंत जाण्यासाठी शिक्षण हेच एकमेव प्रभावी साधन आहे हे जगन्मान्य आहे. यासाठी समाजातील मागास, दुर्बल, अल्पसंख्यांक, आदिवासी, गोरगरीब, अपंग अशा सर्व स्तरांतील घटकांना शिक्षणामध्ये सहभागी करुन घेणे अपेक्षित आहे. समाजातील सर्व घटकांना शिक्षणाच्या विविध, समान तसेच सर्व सुविधा व संधी निर्माण करुन देणे अपेक्षित आहे. त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, त्यांच्या गरजेनुसार, आवडीनुसार व क्षमतेनुसार शिक्षण देणे अपेक्षित आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणामध्ये शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे.

बालकांच्या मोफत आणि सक्तीच्या अधिनियमाची पार्श्वभूमी आपण माहित करून घेतली आहे. भारतातील 6 ते 14 वयोगटातील सर्व मुलांच्या दृष्टीने बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 पारित होणे हा क्रांतिकारी क्षण आहे. या कायद्यामुळे उत्तम दर्जाचे प्राथमिक शिक्षण मिळण्याचा बालकांना अधिकार प्राप्त झाला आहे. बालकांना बालस्नेही (Child friendly) वातावरणामध्ये सहज व सोप्या पद्धतीने गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळविण्यासाठी अधिनियम व नियमावलीमध्ये विविध तरतूदींचा समावेश करण्यात आला आहे. अशा तरतूदींचे आकलन आपण करून घेऊन त्याची अंमलबजावणी केली तरच बालकांना शिक्षणाचा हक्क प्राप्त होईल. अशा काही महत्त्वाच्या तरतुदींचा समावेश आहे.

**2. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणामध्ये शिक्षकाची भूमिका**

1. बालकांना त्यांच्या वयानुसार शाळेत प्रवेश देणे.

2. बालक त्याच वर्गात राहणार नाही, शाळा मध्येच सोडणार नाही, 100 टक्के शाळेत उपस्थित राहील यासाठी प्रयत्न करण्याची भूमिका.
3. बालकाला शाळेसंबंधी व शिक्षणासंबंधी येणारे अडथळे दूर करण्याची भूमिका.
4. समाजातील सर्व घटकांतील बालकांना शाळेत प्रवेश देऊन त्यांना शालेय सुविधा उपलब्ध करुन देणे.
5. बालकांच्या शिक्षण हक्क अधिकारानुसार आपल्या कर्तव्याचे पालन करणे.
6. बालकांच्या शिक्षण हक्कांसाठी पालक व समाजामध्ये जाणीवजागृती निर्माण करणे.

**3. सर्वसमावेशक शिक्षण**

सर्वसमावेशक शिक्षण ही संकल्पना सर्व शिक्षा अभियानाचा एक भाग आहे. सर्वसमावेशक शिक्षणाची संकल्पना मानवी हक्कातून पुढे आली आहे. सन 1990 मध्ये थायलंडमधील जोमेटियन येथे झालेल्या जागतिक स्तरावरील परिषदेमध्ये सर्वांसाठी शिक्षण ही संकल्पना पुढे आली. ही संकल्पना जागतिक स्तरावर मांडण्यात आली. सन 1994 मध्ये जगातील 93 देश व 25 जागतिक संघटनांनी सर्वसमावेशक शिक्षण ही संकल्पना मान्य केली.

2. सर्वसमावेशक शिक्षण म्हणजे सर्वांना सहभागी करुन घेणारे शिक्षण होय.
3. शिक्षणाच्या वेगवेगळ्या संधी वेगळवेगळ्या मार्गांनी, पद्धतींनी उपलब्ध करून देणे म्हणजे सर्व समावेशक शिक्षण होय.
4. विशेष गरजा असणाऱ्या मुलांचा सर्वसामान्य श़िक्षण योजनेत सहभाग होय.

**सर्वसमावेशक शिक्षणासाठी खालील बाबींचा विचार करावा**

1. शाळेची रचना कार्यक्रम व उपक्रम आखताना शाळेतील सर्व मुलांचा विचार केला जावा.
2. प्रत्येक मुलाची बुद्धिमत्ता, आवड, अभियोग्यता व क्षमतांनुसार शिक्षणाची संधी मिळणे आवश्यक आहे.
3. प्रत्येक बालकाला शिक्षणाचा हक्क असून बालक त्याच्या क्षमता समृद्धीपर्यंत शिकू शकते.
4. या पद्धतीनुसार शिक्षण प्रक्रिया प्रभावी होण्यास मदत होते.
5. विशिष्ट गरजा असलेल्या मुलांच्या गरजा विचारात घेऊन सामान्य मुलांत समावेश करण्यात यावा.

**सर्वसमावेशक शिक्षणाची आवश्यकता**

1. अपंगांचे पुनर्वसन करण्यासाठी.
2. सामाजीकरण करण्यासाठी.
3. शिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्यासाठी.
4. शाळेचे स्वरुप समजण्यासाठी.
5. अपंगाना सक्षम बनविण्यासाठी.
6. शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी.
7. प्रशिक्षण देण्यासाठी.

**सर्वसमावेशक शिक्षणाचे मुख्य घटक**

1. अध्ययन सहकार्याचा विकास.
2. विशेष शिक्षकांची भूमिका.
3. समाज व पालकांचा सहभाग.
4. मनुष्यबळ व साहित्य संशोधनाचे आदानप्रदान.
5. गरजाधिष्ठित मार्गदर्शन साहित्य.
6. सामान्य शिक्षकांचे क्षमता संवर्धन.

**4. सर्वसमावेशक शिक्षणामध्ये शिक्षकाची भूमिका**

1. सर्व प्रकारच्या मुलांना प्रवेश.

2. शालेय उपक्रमांमध्ये सर्वांचा सहभाग.
3. सर्व विद्यार्थ्यांचा विचार.
4. गरजेनुसार वर्ग बदलण्याची व्यवस्था.
5. शिक्षणाबरोबर सामाजिक कार्य.
6. पालकाची व मित्रत्वाची भूमिका.
7. मुलांच्या क्षमतेनुसार शिक्षणाची उद्दिष्टे ठरविणे.
8. सर्वसामान्य मुले व अपंग मुले यांच्यात आंतरक्रिया घडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे.
9. विशेष गरजा असणाऱ्या मुलांचे स्वागत करणे.
10. गरजू मुले शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत यासाठी दक्षता घेणे.
11. सर्व प्रकारचे अपंगत्व असणाऱ्या मुलांना प्रवेश व शिक्षण आणि सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे.
12. विविधांगी अध्यापन पद्धती, साधने, तंत्रे यांचा अवलंब.
13. अपंगाकडे पाहण्याचा शाळेतील सर्वसामान्य बालकांचा, पालकांचा व समाजाचा दृष्टिकोन व्यापक व सकारात्मक बनविण्याची भूमिका.
14. सामान्य मुले आणि अपंग मुले यांना एकाच पातळीवर आणण्याचा प्रयत्न करणे.
15. विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी विशेष प्रयत्न करण्याची भूमिका.

### 6.3 सारांश

कोणत्या वयातील मुलांना कोणत्या प्रकारचे शिक्षण द्यावे हे समजून घेतले पाहिजेत. प्रत्येक बालक हे त्याच्या मातापित्याकडून काही अनुवांशिक बाबी घेऊन आलेले असते. त्या लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे आवश्यक असते. प्रत्येक विद्यार्थ्यावर सारखेच कष्ट घेतले तरी प्रत्येकजण सारख्याच गतीने प्रगती करेल याची खात्री देता येत नाही. म्हणून मागे राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दोष न देता त्यांना समजून घेणे आवश्यक आहे. भावी आयुष्यात विद्यार्थ्यांना यशस्वी होता यावे, सुयोग्य समायोजन करता यावे यासाठी मानसिक विकास आणि व्यापक दृष्टिकोन बनविण्याचा प्रयत्न शाळेतच होतो. यासाठी शिक्षकाची भूमिका पूरक असली पाहिजे.शाळा व समाज यांचा परस्परसंबंध जितका वाढेल, सामाजिक गरजा व सामाजिक समस्यांची जाणीव विद्यार्थ्यांना ज्या प्रमाणात होईल व प्राप्त कौशल्यांची सामाजिक जीवनात उपयोजन करण्याची संधी जितकी अधिक प्रमाणात मिळेल तितकी शाळेची उपयुक्तता कार्यक्षमता वाढेल व पर्यायाने सामाजिक विकास व समाज परिवर्तन होईल म्हणून शिक्षक यादृष्टीने कार्यक्षम झाला पाहिजे. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, त्यांच्या गरजेनुसार, आवडीनुसार व क्षमतेनुसार शिक्षण देणे अपेक्षित आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणामध्ये शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे. सर्वसमावेशक शिक्षणाची संकल्पना मानवी हक्कातून पुढे आली आहे.

### 6.4 स्वाध्याय

1. शिक्षकाची गुणवैशिष्ट्ये स्पष्ट करा.
2. मुलांच्या विकासाच्या अवस्था कोणत्या ?
3. मुलांच्या बाल्यावस्थेमध्ये शिक्षकाची भूमिका कोणती असावी ?
4. मुलांच्या कुमारावस्थेमध्ये शिक्षकाची भूमिका कोणती असावी ?
5. शाळेसंबंधी शिक्षकाची भूमिका स्पष्ट करा.
6. समाजासंबंधी शिक्षकाची भूमिका स्पष्ट करा.
7. शिक्षणाचे सार्वत्रिकरण व सर्वसमावेशक शिक्षणामध्ये शिक्षकाची भूमिका स्पष्ट करा.
8. सर्वसमावेशक शिक्षणामध्ये शिक्षकाची भूमिका स्पष्ट करा.

## 6.5 संदर्भ


1. प्रा. आर्. आर्. माने, प्रा. व्ही. आर्. पालकर. समकालीन भारत आणि शिक्षण.
2. डॉ. लता पाटील, डॉ. भारती साकेकर. ज्ञान आणि अभ्यासक्रम.
3. डॉ. शैलजा भंगाळे. समकालीन भारत आणि शिक्षण.
4. डॉ. तापकीर दत्तात्रय, डॉ. तापकीर निर्मला, 2008. शिक्षणाचे तात्त्विक अधिष्ठान, नूतन प्रकाशन पुणे.
5. डॉ. करंदीकर सुरेश, डॉ. करंदीकर मीना, 2010, उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, फडके प्रकाशन कोल्हापूर.
6. प्रा. घोरमोडे यु. य., शैक्षणिक प्रशासन व व्यवस्थापन, विद्या प्रकाशन पुणे.
7. दुनाखे अ. रा., 2009, प्रगत शैक्षणिक तत्त्वज्ञान, नित्य नूतन प्रकाशन पुणे.
8. पारसनीस न. रा., 1998, शिक्षणाची तात्त्विक व समाजशास्त्रीय भूमिका, नूतन प्रकाशन पुणे.
9. डॉ. भोसले रमा, डोणे उज्ज्वला, शिक्षणातील बदलते विचारप्रवाह, फडके प्रकाशन कोल्हापूर.
10. कुंडले म. बा., 1998, शैक्षणिक तत्त्वज्ञान व शेक्षणिक समाजशास्त्र, श्री विद्या प्रकाशन पुणे.
11. प्रा. के. डी. शिंदे, प्रा. अनुराधा गोल्हार, 2017, समकालीन भारतातील शिक्षण, वर्ग आणि समाज, श्री प्रकाशन पुणे.
12. डॉ. चव्हाण संध्या विजय, ज्ञान अभ्यासक्रम आणि भाषार्जन, श्री प्रकाशन पुणे.
13. डॉ. भोसले आरती, प्रा. सरपोतदार प्राची, 2017, ज्ञान आणि अभ्यासक्रम, फडके प्रकाशन कोल्हापूर
14. प्रा. कपोले अरविंद, डॉ. सपकाळे आरती, भारतीय समाज आणि शिक्षण
15. डॉ. पेंडके प्रतिभा, भारतीय शिक्षणपद्धतीचा विकास आणि शालेय प्रक्रियेचे अधिष्ठान, श्री मंगेश प्रकाशन नागपूर

डॉ. रायकर एस्. एम्.
दिनकरराव के. शिंदे शिक्षणशास्त्र
महाविद्यालय गडहिंग्लज

# घटक क्रमांक – 7

# राष्ट्रीय एकात्मता आणि आंतरराष्ट्रीय एकात्मता यासाठी शिक्षण

**अनुक्रमणिका**

7.0 उद्‌दिष्टे
7.1 प्रास्ताविक
7.2 विषय विवेचन
7.2.1 अ. राष्ट्रीय एकात्मतातेसाठी शिक्षण – संकल्पना व गरज
7.2.2 ब. आंतरराष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षण – संकल्पना व गरज
7.2.3 क. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षक व शिक्षक प्रशिक्षकांची भूमिका
7.2.4 ड. जागतिकीकरण आणि शिक्षण
7.3 सारांश
7.4 स्वाध्याय
7.5 संदर्भ

---

## 7.0 उद्‌दिष्टे

---

आपण या घटकातून राष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षणाची संकल्पना व गरज, आंतरराष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षणाची संकल्पना व गरज, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षक व शिक्षक प्रशिक्षकांची भूमिका तसेच जागतिकीकरण आणि शिक्षण या बाबी अभ्यासणार आहोत.

या घटकातून आपणास –

1. राष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षणाची संकल्पना व गरज सांगता येईल.
2. आंतरराष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षणाची संकल्पना व गरज सांगता येईल.
3. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षक व शिक्षक प्रशिक्षकांची भूमिका सांगता येईल.
4. जागतिकीकरण आणि शिक्षणाचा परस्परसंबंध सांगता येईल.

## 7.1 प्रास्ताविक

भारतामध्ये धर्म, भाषा, प्रांत, वेश यादृष्टीने विविधता असली तरी त्या विविधतेतून एकता निर्माण करावयास पाहिजे. मानवामानवांबद्‌दल प्रेम माणसांच्या मनात निर्मांण करुन माणसांची मने सुधारण्याचे कार्य शिक्षणाचे आहे. विविध मूल्यांची रुजवणूक शिक्षणाने झाली पाहिजेत.

## 7.2.1 अ. राष्ट्रीय एकात्मतातेसाठी शिक्षण – संकल्पना व गरज

आपल्या देशाला 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वातंत्र्य मिळाले. दिनांक 26 मे 1950 पासून भारतामध्ये राज्यघटनेची अंमलबजावणी सुरु झाली. भारतीय घटनेने नमुद केले आहे की स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या सर्वांचे पालन करणे बंधनकारक आहे. भारताने स्वीकारलेल्या लोकशाही तत्त्वांचा अवलंब सर्वांनी करावा हे अपेक्षित आहे. व्यक्ती, समाज व राष्ट्र यांच्यामध्ये एकवाक्यता असली पाहिजे. भारत सर्वार्थाने कल्याणकारी राष्ट्र बनावे अशी अपेक्षा आहे.

भारतामध्ये धर्म, भाषा, प्रांत, वेश यादृष्टीने विविधता असली तरी त्या विविधतेतून एकता निर्माण करावयास पाहिजे. मानवामानवांबद्‌दल प्रेम माणसांच्या मनात निर्मांण करुन माणसांची मने सुधारण्याचे कार्य शिक्षणाचे आहे. विविध मूल्यांची रुजवणूक शिक्षणाने झाली पाहिजेत.

लोकशाही प्रजासत्ताक ही केवळ राज्यव्यवस्था आहे असे नसून ती एक जीवनपद्धती आहे. सामाजिक व राजकीय जीवनात लोकशाहीसाठी भारतीय घटनेतील काही कलमे खालीलप्रमाणे आहेत.

1. कलम 14 : कायद्यापुढे सर्वांना समान वागणूक.
2. कलम 15 (1) : धर्म, वंश, जात, लिंग यावरुन धार्मिक व सार्वजनिक ठिकाणी भेदभावास बंदी.
3. कलम 15 (2) : सामाजिक मागासलेल्यांसाठी भेदभावाचे कलम लागू होणार नाही.
4. कलम 17 : अस्पृश्यता रद्द.
5. कलम 19 : भाषण व एकत्रित संघटना स्थापन करणे, संचार, वास्तव्य व धंदा किंवा व्यापार करण्याचे स्वातंत्र्य.

प्रत्येक व्यक्तीला तिच्या राष्ट्राचे नागरिकत्व मिळते. त्या राष्ट्राविषयी आपलेपणाची, आपण सर्व भारतीय आहोत ही भावना जागृत होणे आवश्यक आहे. राष्ट्रीय एकात्मता ही मूळ भावना प्रत्येकाच्या मनात रुजणे गरजेचे आहे. त्यानुसार शिक्षण असायला हवे. भारतीय शिक्षण आयोगाने (कोठारी आयोग 1964–66) सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता शिक्षणातून निर्माण करणे हे स्वतंत्र उद्दिष्ट अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची शिफारस केलेली आहे.

### राष्ट्रीय एकात्मता

1. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे राष्ट्राच्या भविष्यावर विश्वास, उन्नत जीवनमूल्ये जपण्याची व कर्तव्याची भावना, स्वच्छ प्रशासन व परस्पर सद्भाव होय. .......डॉ. कोठारी आयोग.
2. राष्ट्रीय एकात्मतेची उभारणी विटा, माती व हातोडा यांनी होत नाही. लोकांच्या मनात ती असणे व कायमस्वरुपी ती रुजणे महत्त्वाचे होय. ...........डॉ. राधाकृष्णन.
3. संकुचित, प्रादेशिक, वर्गीय व पक्षीय हिताला प्राधान्य न देण्याच्या वृत्तीला प्रेरणा देणारी मनोभूमिका तयार करणे म्हणजेच राष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षण होय. ......... डॉ. संपूर्णानंद समिती.
4. विविध प्रकारच्या जीवनमूल्यांमध्ये राष्ट्राच्या वैशिष्ट्यांना व व्यक्तिमत्त्वाला अग्रस्थान देण्याची अभिवृत्ती म्हणजेच राष्ट्रवाद किंवा राष्ट्रीयत्व होय. .......... सामाजिकशास्त्र कोश.

### राष्ट्रनिर्मितीसाठी आवश्यक घटक

1. वांशिक समानता
2. भौगोलिक समानता.
3. धार्मिक समानता.
4. सांस्कृतिक समानता.
5. भाषिक समानता.
6. राजकीय समानता.
7. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व.
8. राष्ट्रप्रेम.
9. संस्कृती.
10. त्याग.
11. अस्मिता.

### राष्ट्रीय एकात्मतेची गरज / महत्त्व

1. राष्ट्रीयत्वाची भावना सतत जागृत ठेवण्यासाठी.
2. संकुचित भावना, वैयक्तिक स्वार्थाच्या त्यागासाठी.
3. राष्ट्रीयत्वाच्या भावनेची रुजवणूक करण्यासाठी.
4. लोकशाही तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी.
5. स्वातंत्र्य, समता व बंधुता, न्याय यांचे पालन करण्यासाठी.
6. परस्परांच्या धर्माविषयी आदरभाव निर्माण करण्यासाठी.

7. नैसर्गिक, मानवी आपत्तींना धैर्याने सामोरे जाण्यासाठी.
8. देशाला एकसंघ व बलशाली बनविण्यासाठी.
9. राष्ट्राची अस्मिता, प्रतिष्ठा जपण्यासाठी.
10. व्यक्ती, समाज व राष्ट्र यांच्यात एकवाक्यता रुजण्यासाठी.

### 7.2.2 ब. आंतरराष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षण – संकल्पना व गरज

शिक्षणाने शांततेसाठी कार्य करणे आवश्यक आहे. शांततेशिवाय सुखी व संपन्न समाजजीवन शक्य नाही याची जाणीव जगाला आता झाली आहे. यातूनच आंतरराष्ट्रीयत्वाच्या संकल्पनेचा उदय झाला. विश्वातील सर्व मानवजात एक आहे. सर्व माणसांची सुखदुःखे, इच्छा, आकांक्षा, गुणदोष इत्यादी भावना समान असतात. अशा मानवामधील विश्वबंधुत्वाची भावना म्हणजे आंतरराष्ट्रीय सामंजस्याची भावना होय. एका देशाने दुसऱ्या देशाकडे सहानुभूतीने पाहणे म्हणजे आंतरराष्ट्रीय सामंजस्य होय. विश्व हे एक कुटूंब आहे ही कल्पना मान्य करुन विश्वसमाजाशी समायोजन साधणे म्हणजेच वैश्विक दृष्टिकोन होय.

शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता रुजली पाहिजेत. त्याचप्रमाणे आपल्या देशाबरोबर वर्तमानकाळाचा विचार करताना दळणवळण, तंत्रज्ञान, विज्ञान, संशोधन इत्यादी बाबींचा विचार करुन प्रत्येक देशाच्या विकासाची, प्रगतीची ओळख विद्यार्थ्यांना करुन देणे काळाची गरज आहे. आपल्या देशाबरोबर जगाला जोडणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा विशाल दृष्टिकोन तयार करणे आवश्यक आहे.

विश्वाचा अभ्यास, अंतराळाचा अभ्यास करणाऱ्या मानवजातीला वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक जीवनात सुखाचे व शांततेचे जीवन हवे आहे. परस्परांमध्ये द्वेष, कलह, युद्ध नको आहे. अणूशक्तीसारख्या शक्तींचा विधायक कार्यासाठी वापर करुन विध्वंस टाळायचा आहे. दहशतवाद संपवून शांततेचे वातावरण तयार करावयाचे आहे. यासाठी आंतरराष्ट्रीयत्वाची भावना जोपासणे आवश्यक आहे.

### आंतरराष्ट्रीयत्व

1. व्यक्ती केवळ राज्याची, देशाची नव्हे तर संपूर्ण जगाची सभासद असते ही भावना म्हणजे आंतरराष्ट्रीयत्व होय. Internationalism is a feeling that the individual is not only a member of this state but a member of the world. .......ऑल्मिव्हर गोल्डस्मिथ
2. व्यक्तीचे, मग त्याचे राष्ट्रीयत्व वा संस्कृती कोणतीही असो, चिकित्सक व वस्तूनिष्ठ निरीक्षण व वर्तणूकीचे मूल्यमापन करण्याची क्षमता म्हणजे आंतरराष्ट्रीयत्त्वाची जाण होय. International understanding is the ability to observe critically and objectively and appraise the conduct of men everywhere irrespective of the nationality or culture to which they may belong. ................डॉ. लेविस वेल्टर
3. राष्ट्राराष्ट्रातील गैरसमज, अज्ञान व उच्चनीचभाव नष्ट करुन प्रेम, बंधुता, सहानुभूती इत्यादी भावनांचा विकास करणे व त्यासाठी भिन्नभिन्न पातळीवर परस्परसंबंध प्रस्थापित करणे व दृढ करणे आवश्यक आहे. यालाच आंतरराष्ट्रीय सामंजस्य म्हणतात.
4. स्वतःच्या राष्ट्राबाहेर विचार करुन सर्वच राष्ट्रांबद्दल आदराची, गुणग्राहकाची भावना म्हणजे आंतरराष्ट्रीयत्व होय.
5. आंतरराष्ट्रीय सामंजस्याचे अधिष्ठान वसुधैवकुटूंबकम् हे आहे. आंतरराष्ट्रीयत्व म्हणजे वैश्विक नागरिकत्व होय. प्रत्येकाने दुसऱ्या देशाला सहानुभूतीपूर्वक समजून घ्यायला हवे. यालाच आंतरराष्ट्रीय सामंजस्य म्हणतात.

### आंतरराष्ट्रीयत्वाची गरज

1. सर्व देशांमधील संस्कृती, लोकांचे आचारविचार, राहणीमान, चालीरिती, परंपरा, साहित्य, वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी इत्यादींची ओळख करुन देण्यासाठी.
2. जगातला कोणताही देश स्वयंपूर्ण नसतो. त्याला कोणत्या ना कोणत्या बाबींसाठी इतर देशांची गरज लागते हे समजण्यासाठी.

3. विविध देशातील व्यक्तीव्यक्तींमध्ये भाषा, चालीरिती, वेशभूषा, खाणेपिणे वेगवेगळे असले तरी माणूस म्हणून मन, भावना या एकच आहेत याची जाणीव करुन देण्यासाठी.
4. जग हे एक विशाल कुटूंब असून त्या कुटूंबातील आपण एक सदस्य आहोत ही भावना रुजविण्यासाठी.
5. मानवता हा श्रेष्ठ धर्म व त्यासाठी इतरांना सहकार्य व इतरांवर प्रेम करणे ही सहिष्णू वृत्ती जोपासण्यासाठी.
6. जगात असलेल्या अनेक देशांविषयी प्रेम, त्यांची प्रगती इत्यादीविषयी जवळीकता किंवा आपलेपणा प्रत्येक मानवामध्ये निर्माण होणे हे मूल्य रुजविण्यासाठी.
7. मानवजातीचे कल्याण हा मुख्य हेतू सर्वांचा असायला हवा या दृष्टिकोनाच्या विकसनासाठी.
8. जगातील विविध शोध, संशोधने, भाषा, तंत्रज्ञान, शिक्षण संस्कृती, दळणवळण, साहित्य, क्रीडा यांचे आदानप्रदान होण्यासाठी.
9. आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्यासाठी.
10. शाश्वत / चिरंजीवी विकासासाठी.

**आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी उपक्रम / उपाययोजना**

1. विविध जागतिक दिन साजरे करणे. उदा. जागतिक आरोग्य दिन, शिक्षक दिन...
2. आंतरराष्ट्रीय पातळीवरील विषयांवर चर्चासत्रे, वादविवाद, परिसंवाद, व्याख्याने इत्यादींचे आयोजन करणे. उदा. जागतिक दहशतवाद, आर्थिक मंदी...
3. प्रदर्शनांचे आयोजन करणे. उदा. विविध देशांतील राष्ट्रचिन्हे, तिकीटे.....
4. जागतिक किर्तीचे विचारवंत, शास्त्रज्ञ, संशोधक, साहित्यिक, कलावंत, क्रीडापटू इत्यादी महनीय व्यक्तींचा परिचय करुन देणे.
5. अन्य देशातील नागरिक, शिक्षक, संशोधक, विद्यार्थी, प्रशासक इत्यादींशी संवाद साधणे.

राष्ट्राराष्ट्रांच्या हितात संघर्ष अटळ नाही, सर्व मानव बांधव होत व संगरापेक्षा सहकार्यानेच मानवी प्रगती साधेल, हे पटवून देऊन विश्वबंधुत्वाची भावना निर्माण करणारे शिक्षण म्हणजे आंतरराष्ट्रीय सामंजस्याचे शिक्षण होय. दोन महायुद्धांनी लष्करी संघर्षामुळे होणारे अनिष्ट परिणाम प्रत्ययास आले. तिसरे महायुद्ध झाले तर मानवी संस्कृती नष्ट होईल, अशी भीती विचारवंतांना वाटत आहे. युध्दांचा उगम भावनेत असतो, म्हणून द्वेषभावना थोपवून धरून सदिच्छेचे बीजारोपण करणाऱ्या शिक्षणाची आवश्यकता निर्माण झाली आहे.

मूलत: सर्व मानवजात एकरूप आहे. भिन्न देशांत अन्न,वस्त्र, चालीरीती इ. बाबतींत भेद दिसत असले, तरी सर्वत्र मानवाच्या आशाआकांक्षा, गुणदोष, सुखदु:खे समान आहेत. सर्वत्र मानव पूर्णतेसाठी झटत आला आहे. व या प्रयत्नांचा परिपाक म्हणजे आजची उन्नत मानवी संस्कृती होय. या संस्कृतीचे जतन करणे सर्व मानवांचे कर्तव्य आहे. युद्धांनी भांडणे मिटत नाहीत, हानी मात्र होते. क्षयादी रोग, धरणीकंपादी उत्पात, अज्ञान व अंधश्रद्धा हे सर्व मानवजातीचे शत्रू असून त्यांना तोंड देण्यासाठी सहकार्याची अभेद्य फळी निर्माण करणे श्रेयस्कर आहे. विश्वबंधुत्वाची कल्पना सर्व धर्मांच्या तत्त्वप्रणालीत अंतर्भूत असली, तरी ही भावना रूजविण्याचे महत्त्व पहिल्या महायुद्धानंतर जाणवू लागले. त्यासाठी राष्ट्रसंघाची स्थापना झाली व राष्ट्रांतील तंटे समजुतीने सोडविण्याचे तत्त्व मान्य करण्यात आले. यासाठी खाजगी प्रयत्नही झाले; १९२४ साली विश्वभारती विद्यापीठाची स्थापना करून रवींद्रनाथ टागोर यांनी आंतरराष्ट्रीय सामंजस्याच्या शिक्षणास जोराची चालना दिली. हे प्रयत्न निष्फळ झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी सामंजस्याची आवश्यकता अधिकच तीव्रपणे भासू लागली. या तीव्र जाणिवेतून संयुक्त राष्ट्रे ही संघटना निर्माण झाली. तिचे मुख्य उद्दिष्ट मानवी समतेवर आधारलेले स्नेहसंबंध सर्व राष्ट्रांत निर्माण करणे हे आहे.

**शिक्षणांचे स्वरूप** - आंतरराष्ट्रीय पातळीवर सामंजस्याचे शिक्षण देण्याचे कार्य संयुक्त राष्ट्रांची एक प्रमुख शाखा यूनेस्को करीत आहे. यूनेस्कोच्या प्रेरणेने सभासदराष्ट्रे परराष्ट्रांतील अध्यापक व विद्यार्थी यांना शिष्यवृत्या व प्रवासवृत्या देतात. अशा रीतीने भिन्नदेशीय अध्यापकांचा व विद्यार्थ्यांचा परिचय होऊन परकीय जीवनाचे व संस्कृतीचे प्रत्यक्ष दर्शन घडते. तसेच यूनेस्कोच्या प्रेरणेने विविध राष्ट्रे आपली सांस्कृतिक शिष्टमंडळे व कलापथके परदेशात पाठवितात व त्यांच्या द्वारा लोकांना मानवी संस्कृतीच्या विविधतेतील एकात्मतेचा प्रत्यय येतो.

यूनेस्कोशी सहकार्य करणारी भारतीय राष्ट्रीय आयोग ही सरकारी यंत्रणा दिल्लीत आहे. प्रशिक्षण-विद्यालये व माध्यमिक शाळा यांतून सामंजस्याचे शिक्षण देण्याचे कार्य ही यंत्रणा करते. या कार्याचे स्वरूप शिक्षकांसाठी सत्रे भरविणे व शाळांमधून प्रकल्प तयार करून घेणे असे असते. अशा स्वरूपाचे कार्य राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण मंडळाच्या विस्तार सेवा विभागामार्फतही चालते. माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी जो अभ्यासक्रम आखलेला आहे, त्यात आंतरराष्ट्रीय सामंजस्याचे शिक्षण हा विषय समाविष्ट करण्यात आला आहे. शाळामधून होणाऱ्या सामंजस्याच्या शिक्षणात अध्यापकाची भूमिका महत्त्वाची आहे. त्याची वृत्ती आंतरराष्ट्रीय असेल व सर्व वादग्रस्त प्रश्नांकडे संकुचित राष्ट्रीय दृष्टीकोनातून न पाहता विशाल मानवी दृष्टीकोनातून तो पाहील, तर त्याला आपल्या विद्यार्थ्यांच्या मनात सामंजस्याचे बीजारोपण करता येईल. भाषा, इतिहास, विज्ञान इ. विषय शिकविताना मानवी उन्नतीस निरनिराळ्या देशांच्या व वंशांच्या लोकांनी कसा हातभार लावला, याचे चित्र उभे करता येईल व मानवाचे हित सहकार्यातूनच साधेल, हे पटवून सद्भावनेचे बीजारोपण करता येईल. सामंजस्याच्या शिक्षणाचे आणखी एक महत्त्वाचे साधन म्हणजे आंतरराष्ट्रीय दृष्टीकोनातून लिहिलेली पाठ्यपुस्तके होते. वेगवेगळ्या देशांतील इतिहासाची पाठ्यपुस्तके तपासून त्यांतील अन्य देशांविषयी गैरसमज पसरविणारी विधाने काढून टाकण्याचा सल्ला यूनेस्कोने दिला आहे.

सामंजस्य निर्माण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या विविध शाखांमार्फत विशेषत: मागसलेला देशांतील जनतेच्या हिताचे जे बहुमोल कार्य चालू आहे त्याचा चांगला उपयोग होतो. आरोग्यसंघटनेमार्फत रोगनिवारणाचे काम फार मोठ्या प्रमाणात चालते. कर्करोग, कुष्ठरोग, क्षय इ. रोगांवर संशोधन चालू असून प्रतिकारक औषधांचा पुरवठा करण्यात येतो. तसेच यूनेस्कोमार्फत नवोदित राष्ट्रांमध्ये मूलभूत शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी भरघोस साहाय्य देण्यात येते. या कार्याचे ज्ञान होण्यासाठी शाळांमधून संयुक्तराष्ट्र-दिन, मानवी-हक्क-दिन व जागतिक-आरोग्य-दिन साजरे केले जातात. सामंजस्य निर्माण करण्याचा आणखी एक उपाय परकीय वाङ्मयाचा अभ्यास होय. भाषांतरद्वारा जरी चांगल्या परभाषिक वाङ्मयाचा परिचय झाला, तरी त्यामधून मानवाच्या भावनिक एकात्मतेचा प्रत्यय येतो व आपपरभाव नाहीसा होऊन सामंजस्य निर्माण होते. असाच उपयोग निरनिराळ्या देशांतील विद्यार्थ्यांमध्ये पत्रमैत्री वाढीस लावण्याने होतो.

### 7.2.3 क. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षक व शिक्षक प्रशिक्षकांची भूमिका

जगामध्ये काही देश विकसित तर काही देश विकसनशील आहेत. विकसनशील देशांपुढे अनेक समस्या आहेत. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विकसित देशांची मदत आणि परस्पर सामंजस्याची आवश्यकता आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर परस्पर सामंजस्य निर्माण करण्यासाठी 1945 मध्ये युनोच्या अंतर्गत युनेस्कोची स्थापना करण्यात आली.

युद्धाचा प्रारंभ जर माणसाच्या मनामध्ये होतो तर शांततेच्या रक्षणाची, साधनेची व भावनेची निर्मितीही माणसाच्या मनातूनच निर्माण होऊ शकते. मानवाच्या श्रेष्ठत्वाकरिता मानवतेचे शिक्षण आणि संस्कृतीचा व्यापकतेने प्रसार झाला पाहिजे. विश्वात न्याय आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी मानवतेचे शिक्षण दिले पाहिजे. परस्पर सहकार्याच्या भावनेच्या आधारे प्रत्येक देशाने हे कार्य पार पाडले पाहिजे अशी भूमिका शिक्षणाची व पर्यायाने शिक्षकांची असली पाहिजे.

#### शिक्षक व शिक्षक प्रशिक्षकांची गुणवैशिष्ट्ये

1. मानवतावादी दृष्टिकोन.
2. संवेदनशीलता.
3. लोकशाही दृष्टिकोन.
4. मानवी मूल्यांची जपणूक.
5. विश्वव्यापी दृष्टिकोन.
6. परस्पर सहकार्याची भूमिका.
7. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सामंजस्यावर विश्वास व श्रद्धा.
8. सद्सतविवेकबुद्धी.

**अध्यापन पद्धती**

1. चर्चा – गटचर्चा, पथकचर्चा, चर्चासत्र, परिसंवाद इत्यादी.
2. जागतिक संदर्भ असलेल्या विविध विषयांवरील व्याख्यानांचे आयोजन.
3. प्रकल्प पद्धती.
4. बुद्धीमंथन पद्धती.
5. प्रवास पद्धती.
6. मुक्त संवाद.

**भूमिका**

1. अन्य देशातील महत्त्वपूर्ण शोध, संशोधन याबाबतचे ज्ञान देण्याची भूमिका.
2. जगातील सर्व क्षेत्रातील ख्यातनाम तज्ज्ञांचा कार्य परिचय करुन देण्याची भूमिका.
3. मानवी व नैसर्गिक आपत्तींच्यावेळी लोकांना मदत, सहकार्य करण्याची मनोवृत्ती विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याची भूमिका.
4. जगातील अन्य देशांतील संस्कृती, सामाजिक जीवन इत्यादींबाबत विद्यार्थ्यांमध्ये आस्था निर्माण करण्याची भूमिका.
5. जागतिक घडामोडींची जाणीव निर्माण होण्यासाठी वर्तमानपत्रे, संदर्भ पुस्तके, इंटरनेट यासारख्या माध्यमांचा उपयोग करण्याची भूमिका.
6. जागतिक संदर्भ असणारे दिन, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींचे आयोजन करण्याची भूमिका.
7. राष्ट्रीय व जागतिक स्तरावर आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी कार्यरत असणाऱ्या युनो, युनेस्को, जागतिक आरोग्य संघटना, जागतिक बॅंक, रेडक्रॉस अशा संस्थांचा परिचय करुन देण्याची भूमिका.

### 7.2.4 ड. जागतिकीकरण

जागतिकीकरण म्हणजे 'जागतिक अर्थव्यवस्था आस्तित्वात आणण्यासाठी सर्व राष्ट्रांची एकच बाजारपेठ निर्माण करणे' होय.'

**जागतिक बॅंकेचे जागतिकीकरणासाठी हेतू –**

1. उपभोग्य वस्तूंसह सर्व वस्तूंच्या आयातीवरील निर्बंध रद्द करणे.
2. आयात कर कमीत कमी पातळीवर आणणे.
3. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंद्यांचे खाजगीकरण करणे.
4. भांडवल, वस्तू, व तंत्रज्ञान यांच्या गतिशीलतेत वाढ होण्यासाठी व्यापारातील अडथळे दूर करणे.

**जागतिकीकरण आणि शिक्षण**

जागतिकीकरणामुळे जगाच्या भौगोलिक सीमा निखळून पडून जगाची संकल्पना 'जग खेडे' अशी वाटचाल करीत आहे. उदारीकरण, खाजगीकरण, पाश्चातीकरण, आधुनिकीकरण, जागतिकीकरण अशा धोरणातून स्पर्धात्मक जागतिक बाजारपेठेत प्रचंड झेप घेतली आहे. विकसित व विकसनशील देश जागतिकीकरणाच्या करारात असल्यामुळे सर्वच जग या क्षेत्रात उतरत आहे.

जागतिकीकरणाची प्रक्रिया केवळ आर्थिक क्षेत्रापुरती मर्यादित नसून सांस्कृतिक, विज्ञान, तंत्रज्ञान, अवकाश, संशोधन या क्षेत्रांबरोबर शिक्षणक्षेत्रावरही जागतिकीकरणाचा प्रभाव व परिणाम झाला आहे. भारताने गॅट करारावर सही केल्यामुळे व्यापार, उद्योगधंदे, वैद्यकीय, अभियांत्रिकी, शेती, सामाजिक जीवन आणि शिक्षण या क्षेत्रांवर जागतिकीकरणाचा प्रभाव पडला आहे.

**जागतिकीकरण**

सन 1990 च्या दरम्यान भारताची अर्थव्यवस्था कोलमडली होती. जागतिक बॅंक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्या शिफारशीनुसार जागतिकीकरणाचे धोरण भारताने जुलै 1991 पासून स्वीकारले. भारताच्या अर्थव्यवस्थेला गती यामुळे मिळण्यास मदत झाली. यालाच नवीन आर्थिक धोरण असे म्हटले जाते. याचाच भाग म्हणून 'गॅट'चे रुपांतर 1 जानेवारी 1995 मध्ये जागतिक व्यापार संघटनेमध्ये झाले. भारत जागतिक व्यापार संघटनेचा सभासद आहे. जागतिकीकरण आणि उदारीकरणाचा स्वीकार करण्याशिवाय जगाला पर्याय राहिलेला नाही.

आजच्या शिक्षणाला केवळ पदवीपुरता मर्यादित अर्थ राहिलेला नाही. तर शिक्षण जीवनाभिमुख आणि गुणवत्तापूर्ण असले पाहिजे. जागतिकीकरणामुळे अनेक आव्हानात्मक प्रश्न आपल्या शिक्षणव्यवस्थेसमोर निर्माण झाले आहेत.

**गुणवत्ता**

1. गुणवत्ता ही ग्राहकाच्या दृष्टीवर अवलंबून असते. ग्राहकांचे जे समाधान होते ती गुणवत्ता होय.
2. गुणवत्ता ही प्रक्रिया व निष्पती या दोन्हींबाबत असते.
3. अव्दितीय हे गुणवत्तेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

**जागतिकीकरण आणि भारतीय शिक्षण**

गॅट आणि (WTO) जागतिक व्यापार संघटना यांच्या करारानुसार शिक्षण आंतरराष्ट्रीय पातळीवर खुले झाले आहे. जगभरातील अनेक देशांना आपली विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्था भारतात सुरू करणे सुलभ झाले आहे. भारतीय शिक्षणामध्ये उत्तम गुणवत्ता, दर्जेदार शिक्षण व जीवनोपयोगी शिक्षण यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आवश्यक आहे.

**जागतिकीकरण भारतीय शिक्षणाची दिशा**

1. विद्यार्थ्यांचे समाधान.
2. अभ्यासक्रमात बदल.
3. गुणवत्तेची हमी देणारे शिक्षण.
4. उच्च शिक्षणाचे आधुनिकीकरण.
5. अध्यापकांची भूमिका.
6. आधुनिक माध्यमांचा वापर.
7. कौशल्यावर आधारीत शिक्षण.

**शिक्षणाच्या जागतिकीकरणातील अडथळे**

1. संगणक निरक्षरता.
2. भारतीय मूल्यांची जाण.
3. खर्चिक शिक्षण.
4. संप्रेषण माध्यमांची विश्वासार्हता.

**जागतिकीकरण**

1. जागतिकीकरण म्हणजे देशाच्या राजकीय सीमेबाहेर अर्थिक व्यवहारांचा विस्तार करणे होय.
2. जागतिकीकरण म्हणजे देशाचे परावलंबित्व कमी करुन कमी करुन स्वावलंबनासाठी परस्परावलंबन वाढविणे होय.
3. जागतिकीकरण म्हणजे सर्वच राष्ट्रांची एकच बाजारपेठ निर्माण करणे.

**जागतिकीकरणाचा प्रभाव / परिणाम**

1. माहिती आणि ज्ञानाचा अमर्याद वेगाने वापर व फैलाव.

2. वस्तूनिष्ठ वास्तवाचे आभासीकरण माहितीचे Digitsiisation झाले.
3. शिक्षण आणि जागतिक दळणवळणासाठी इंग्रजी भाषेचा आवश्यक जागतिक साधन म्हणून प्रसार.
4. वैश्विक व बहुसांस्कृतिक शिक्षणाच्या कल्पनांचा प्रसार.
5. ॲंग्लो, अमेरिकन संस्कृती आणि शैक्षणिक तत्त्वांचा अन्य संस्कृतीमध्ये प्रसार.
6. पौर्वात्य संस्कृतीची असमतोल वृद्धी.

**जागतिकीकरणाचे फायदे**

1. स्पर्धात्मकता.
2. ग्राहकाला अनेक संधी.
3. देशी बाजारपेठ सर्व उत्पादकांसाठी उपलब्ध.
4. शिक्षक, विद्यार्थी यांना संधी.
5. गुणवत्ता वाढ व कार्यक्षमता वाढ.
6. उत्पादन आवश्यकतेनुसार होते.
7. सातत्याने गुणवत्ता सुधारणे ही स्पर्धात्मकतेची अट.
8. विशेषीकरणाला महत्त्व.
9. प्रत्येक देशाला उत्पादनाचे फायदे.
10. जागतिकीकरणामुळे जगाला वैश्विक खेड्याचे स्वरूप प्राप्त.
11. नवीन तंत्रज्ञान व संचार यामुळे अनेक संधी.
10. उच्च प्रतीची सेवा कमी खर्चात उपलब्ध.

**जागतिकीकरणामुळे सरकारच्या शैक्षणिक धोरणांमध्ये झालेले बदल**

1. प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य देण्याच्या भूमिकेतून उच्च शिक्षणावरील खर्च कमी करण्याचा प्रयत्न. पर्यायाने खाजगीकरणाला संधी.
2. तळागाळातल्यांना शिक्षण देण्याच्या घटनात्मक जबादारीतून काढता पाय घेण्यासाठी घटना दुरूस्ती झाली. उदा. 93 वी घटनादुरूस्ती.
3. DPEP च्या योजनेतून पुढे आलेली बहुस्तरीय योजना. चार ते पाच वर्गाच्या प्राथमिक शाळेमध्ये दोन अथवा तीन शिक्षकांऐवजी एकाच शिक्षक कसा उत्तम शिकवू शकतो याबाबतचे प्रशिक्षण.
4. शाळांमध्ये रिक्त जांगावर कंत्राटी पद्धतीने भरती.
5. NCERT च्या शिक्षण धोरणात (2002) प्राथमिक शाळांना पर्याय सुचविताना पत्राद्वारे शिक्षणाची शिफारस.

**जागतिकीकरणाचा शिक्षणावरील परिणाम**

1. शिक्षणाच्या मूळ उद्देशांचे गांभीर्य व महत्त्व कमी होणे.
2. शिक्षणाची छोट्या छोट्या कप्प्यांत बंदिस्त अशी विभागणी होते.
3. जागतिक अर्थव्यवस्थेच्या हातातल्या सत्तेच्या केंद्रीकरणामुळे सामाजिक, सांस्कृतिक विविधता संपत जाणे.
4. विषम शैक्षणिक व्यवस्थेमुळे वंचितांना शिक्षणाच्या संधीपासून दूर ठेवले जाणे.

7.3 सारांश

भारतामध्ये धर्म, भाषा, प्रांत, वेश यादृष्टीने विविधता असली तरी त्या विविधतेतून एकता निर्माण करावयास पाहिजे. मानवामानवांबद्दल प्रेम माणसांच्या मनात निर्मांण करुन माणसांची मने सुधारण्याचे कार्य शिक्षणाचे आहे. विविध मूल्यांची रुजवणूक शिक्षणाने झाली पाहिजेत.

विश्वाचा अभ्यास, अंतराळाचा अभ्यास करणाऱ्या मानवजातीला वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक जीवनात सुखाचे व शांततेचे जीवन हवे आहे. परस्परांमध्ये द्वेष, कलह, युद्ध नको आहे. अणूशक्तीसारख्या शक्तींचा विधायक कार्यासाठी वापर करुन विध्वंस टाळायचा आहे. दहशतवाद संपवून शांततेचे वातावरण तयार करावयाचे आहे. यासाठी आंतरराष्ट्रीयत्वाची भावना जोपासणे आवश्यक आहे.

मानवाच्या श्रेष्ठत्वाकरिता मानवतेचे शिक्षण आणि संस्कृतीचा व्यापकतेने प्रसार झाला पाहिजे. विश्वात न्याय आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी मानवतेचे शिक्षण दिले पाहिजे. परस्पर सहकार्याच्या भावनेच्या आधारे प्रत्येक देशाने हे कार्य पार पाडले पाहिजे अशी भूमिका शिक्षणाची व पर्यायाने शिक्षकांची असली पाहिजे.

जागतिकीकरणाची प्रक्रिया केवळ आर्थिक क्षेत्रापुरती मर्यादित नसून सांस्कृतिक, विज्ञान, तंत्रज्ञान, अवकाश, संशोधन या क्षेत्रांबरोबर शिक्षणक्षेत्रावरही जागतिकीकरणाचा प्रभाव व परिणाम झाला आहे. भारताने गॅट करारावर सही केल्यामुळे व्यापार, उद्योगधंदे, वैद्यकीय, अभियांत्रिकी, शेती, सामाजिक जीवन आणि शिक्षण या क्षेत्रांवर जागतिकीकरणाचा प्रभाव पडला आहे.

### 7.4 स्वाध्याय :

1. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे काय ?
2. राष्ट्रनिर्मितीसाठी आवश्यक घटक कोणते ?
3. राष्ट्रीय एकात्मतेची गरज स्पष्ट करा.
4. राष्ट्रीय एकात्मता रुजण्यासाठी उपाययोजना सुचवा.
5. आंतरराष्ट्रीय सामंजस्य म्हणजे काय ?
6. आंतरराष्ट्रीय सामंजस्याची आवश्यकता स्पष्ट करा.
7. आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी कोणते उपक्रम आयोजित कराल ?
8. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षक व शिक्षक प्रशिक्षकांची भूमिका स्पष्ट करा.
9. शिक्षक व शिक्षक प्रशिक्षकांची गुणवैशिष्ट्ये कोणती असावीत ?
10. जागतिकीकरणाची संकल्पना स्पष्ट करा.
11. जागतिकीकरण म्हणजे काय ?
12. जागतिकीकरणाचे महत्त्व विशद करा.
13. जागतिकीकरणाचे कोणते परिणाम दिसून येतात ?

### 7.5 संदर्भ


1. प्रा. आर्. आर्. माने, प्रा. व्ही. आर्. पालकर. समकालीन भारत आणि शिक्षण.
2. डॉ. लता पाटील, डॉ. भारती साकेकर. ज्ञान आणि अभ्यासक्रम.
3. डॉ. शैलजा भंगाळे. समकालीन भारत आणि शिक्षण.
4. डॉ. तापकीर दत्तात्रय, डॉ. तापकीर निर्मला, 2008. शिक्षणाचे तात्त्विक अधिष्ठान, नूतन प्रकाशन पुणे.
5. डॉ. करंदीकर सुरेश, डॉ. करंदीकर मीना, 2010, उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, फडके प्रकाशन कोल्हापूर.
6. प्रा. घोरमोडे यु. य., शैक्षणिक प्रशासन व व्यवस्थापन, विद्या प्रकाशन पुणे.
7. दुनाखे अ. रा., 2009, प्रगत शैक्षणिक तत्त्वज्ञान, नित्य नूतन प्रकाशन पुणे.
8. पारसनीस न. रा., 1998, शिक्षणाची तात्त्विक व समाजशास्त्रीय भूमिका, नूतन प्रकाशन पुणे.
9. डॉ. भोसले रमा, डोणे उज्ज्वला, शिक्षणातील बदलते विचारप्रवाह, फडके प्रकाशन कोल्हापूर.
10. कुंडले म. बा., 1998, शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, श्री विद्या प्रकाशन पुणे.

डॉ. रायकर एस्. एम्.
दिनकरराव के. शिंदे शिक्षणशास्त्र
महाविद्यालय गडहिंग्लज

## घटक क्रमांक – 8
## वैयक्तिक विकासासाठी शिक्षण

**अनुक्रमणिका**

8.0 उद्दिष्टे
8.1 प्रास्ताविक
8.2 विषय विवेचन
8.2.1 अ. शाश्वत विकासासाठी शिक्षण, ब्रुटलॅंड कमिशन 1987 आणि युनेस्को
8.2.2 ब. शाश्वत विकासाची ध्येये आणि शिक्षणाची भूमिका
8.2.3 क. जीवनकौशल्यांच्या विकासासाठी शिक्षण
8.2.4 ड. सर्वसमावेशित शिक्षण/सर्वसमावशेक शिक्षण
8.3 सारांश
8.4 स्वाध्याय
8.5 संदर्भ

---

### 8.0 उद्दिष्टे

आपण या घटकातून शाश्वत विकासासाठी शिक्षण, ब्रुटलॅंड कमिशन 1987 आणि युनेस्को, शाश्वत विकासाची ध्येये आणि शिक्षणाची भूमिका, जीवनकौशल्यांच्या विकासासाठी शिक्षण आणि सर्वसमावेशित शिक्षण/सर्वसमावशेक शिक्षण या बाबी अभ्यासणार आहोत.

या घटकातून आपणास –

1. शाश्वत विकासासाठी शिक्षणाची गरज सांगता येईल.
2. ब्रुटलॅंड कमिशन 1987 आणि युनेस्कोची भूमिका सांगता येईल.
3. शाश्वत विकासाची ध्येये आणि शिक्षणाची भूमिका सांगता येईल.
4. जीवनकौशल्यांच्या विकासासाठी शिक्षणाची गरज सांगता येईल.
5. सर्वसमावेशित शिक्षण/सर्वसमावशेक शिक्षणाची संकल्पना व गरज सांगता येईल.

### 8.1 प्रास्ताविक

ज्याप्रमाणे मानवाला सांस्कृतिक विविधता महत्त्वाची आहे, त्याप्रमाणे निसर्गाला जैवविविधता आवश्यक आहे हे विकासाचे मूळ आहे. सांस्कृतिक विविधता हा चिरंतन विकासातील मूळ घटक आहे.शाश्वत विकास म्हणजे हमी देणारा, कधीही न थांबणारा विकास सर्व सजीवांचे कल्याण शाश्वत विकासामध्ये अभिप्रेत आहे. शिक्षण व प्रत्यक्ष जीवनातील अनुभव यांच्या परस्परसंबंधांची दखल घेऊन राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 मध्ये बदलत्या काळानुसार भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये कराव्या लागणाऱ्या संभाव्य बदलांवर भर देण्यात आला आहे. जीवनातील आव्हानाना सामोरे जाण्यासाठी कालसापेक्ष व समयसापेक्ष मूलभूत जीवनकौशल्ये विकसित करुन ती जीवनातील संदर्भांशी निगडीत ठेवण्यासाठी महाराष्ट्रामध्ये सन 2009 पासून प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात दहा जीवनकौशल्यांचा समावेश करण्यात आला आहे.

### 8.2.1 अ. शाश्वत विकासासाठी शिक्षण, ब्रुटलॅंड कमिशन 1987 आणि युनेस्को

**1. शाश्वत विकासाची संकल्पना**

शाश्वत विकास म्हणजे हमी देणारा, कधीही न थांबणारा विकास सर्व सजीवांचे कल्याण शाश्वत विकासामध्ये अभिप्रेत आहे. शाश्वत विकास म्हणजे स्वतःसाठी, आपल्या मुलांसाठी व त्यांच्या मुलांसाठी काळजी घेणे आणि आपण गेल्यानंतर उत्तम जागा ठेऊन जाणे.

सन 1972 मध्ये स्टॉकहोम परिषदेमध्ये मानव पर्यावरणावर (Human Environment) चर्चा करताना शाश्वत विकासाची संकल्पना व गरज मांडली. पुढे सन 1987 च्या पर्यावरण व विकास जागतिक आयोग (World Commission of Environment Development) म्हणजेच ब्रुंटलॅंड आयोगाने शाश्वत विकासाची संकल्पना उचलून धरली. सन 1992 मध्ये (United Nations Conference on Environment and Development - UNCED) जागतिक पातळीवर चिरंतन विकासाच्या संकल्पनेला मान्यता मिळाली. सन 2002 मध्ये जोहान्सबर्ग येथील जागतिक चिरंतन विकास परिषदेमध्ये 1. आर्थिक विकास 2. सामाजिक विकास व 3. पर्यावरणाचे संवर्धन ही त्रिसूत्री मांडली.

→ शाश्वत / चिरंतन / चिरंजीवी / टिकाऊ / चिरस्थायी / सुरक्षित विकास (Sustainable Development)

→ Sustain – to help up, आधार देणे, उचलून धरणे, टिकविणे.

→ Sustainaable - शाश्वत, दीर्घकाळ टिकणारा, चिरकाल टिकणारा, हमी देणारा विकास, कधीही न थांबणारा विकास, सर्व सजीवांचे कल्याण करणारा विकास.

1. वर्तमानकाळातील विकासाच्या गरजा पूर्ण करताना भावी पिढीच्या विकासाच्या क्षमतांशी तडजोड न करणे म्हणजे शाश्वत विकास होय.
2. ज्याप्रमाणे मानवाला सांस्कृतिक विविधता महत्त्वाची आहे, त्याप्रमाणे निसर्गाला जैवविविधता आवश्यक आहे हे विकासाचे मूळ आहे. सांस्कृतिक विविधता हा चिरंतन विकासातील मूळ घटक आहे.
3. स्वतःसाठी, आपल्या मुलांसाठी व त्यांच्या मुलांसाठी काळजी घेणे. आपण गेल्यानंतर उत्तम जागा ठेऊन जाणे म्हणजे शाश्वत विकास.
4. नैसर्गिक पर्यावरणाचे संतुलन दीर्घकाळ टिकवून ठेवण्यासाठी आणि मानवी जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी निसर्गात अनुकूल बदल करणे म्हणजे शाश्वत विकास होय.
5. शाश्वत विकास म्हणजे कधीही न थांबणारा विकास.

**शाश्वत विकासाची गरज**

1. मानवी आस्तित्व टिकविणे ही काळाची गरज बनली आहे.
2. पर्यावरण आस्तित्वासाठी शाश्वत विकास आवश्यक आहे.
3. संतुलित विकास आवश्यक आहे.
4. सर्वांच्या गरजा भागण्यात समानता यावी, मानवी हक्कांची जपणूक व्हावी, शांतता व सुरक्षितता आवश्यक आहे.
5. नैसर्गिक साधनसंपत्तीचा सुयोग्य वापर आवश्यक आहे.
6. राष्ट्र व समाजविकासासाठी शाश्वत विकास आवश्यक आहे.
7. भावी पिढीच्या संरक्षणासाठी व विकासासाठी शाश्वत विकास गरजेचा आहे.

**2. ब्रुटलॅंड आयोग / जागतिक पर्यावरण व विकास आयोग** (World Commission of Environment Development -WECD)

**मिशन** – चिरंतन विकासासाठी जगातील सर्व देशांना एकत्रित आणणे.

सन 1972 मध्ये स्टॉकहोम येथे 'मानवी पर्यावरण' या विषयावर परिषद झाली. सन 1980 मध्ये निसर्गाच्या संवर्धनासाठी आंतरराष्ट्रीय युनियन तयार झाली. डिसेंबर 1983 मध्ये संयुक्त राष्ट्राचे माजी सेक्रेटरी जनरल जव्हीथर पर्झ सीलर यांनी ग्रो हरेम ब्रुटलॅंड (Gro Harlem Brutland) यांची आयोगाचे अध्यक्ष म्हणून निवड केली. उपाध्यक्ष म्हणून मन्सूर खलीद यांची निवड झाली. या आयोगाची सदस्यसंख्या 21 इतकी होती. हे सदस्य विविध क्षेत्रातील होते. हा आयोग सन 1987 मध्ये आस्तित्वात आला. या आयोगाने 'आपले सामान्य भविष्य' (Our Common Future) हा अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालालाच 'ब्रुंटलॅंड आयोग' असे म्हणतात.

**चिरंतन विकासाची उद्दिष्टे**

1. लोकसंख्या नियंत्रण उद्दिष्ट साध्य करणे.
2. विकसनशील राष्टातील गरिबी, असमानता आणि कर्जबाजारीपणा कमी करणे.

3. शाश्वत शेती विकसित करणे.
4. वन्य नैसर्गिकता व जनुकीय अनुवंशिक विविधता यांचे संरक्षण करणे.
5. सागरी आणि किनाऱ्यावरील संसाधनांचे संरक्षण करणे.
6. गोड्या पाण्याच्या गुणवत्तेचे संरक्षण करणे आणि पाण्याची परिणामकारक कार्यक्षमता वाढविणे.
7. उर्जेची कार्यक्षमता वाढविणे.
8. पुनर्निर्मिती उर्जा संसाधने विकसित करणे.
9. हवा प्रदूषके व हरितगृह वायू नियंत्रण करणे.
10. वातावरणातील ओझोन वायूचे संरक्षण करणे.
11. टाकावू पदार्थांची कमीत निर्मिती करणे.
12. लष्करावरील खर्च कमी करुन तो निधी शाश्वत विकासासाठी वापरणे.

**ब्रुटलॅंड आयोगानुसार शिक्षणाचे आधारस्तंभ**

1. आर्थिक वृद्धी.
2. पर्यावरण संरक्षण
3. समाजिक समानता.

**3. युनेस्को**

दुसऱ्या महायुद्धानंतर 24 ऑक्टोबर 1945 रोजी जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेची (United Nations Organization – UNO) स्थापना करण्यात आली. युनोंचे मुख्य कार्यालय अमेरिकेतील न्युयार्क येथे आहे. भारत दिनांक 30 ऑक्टोबर 1945 रोजी युनोचा सदस्य झाला.

युनेस्को ही युनोची उपशाखा आहे. शिक्षण, शास्त्र व संस्कृतीच्या मदतीने व एकमेकांच्या सहकार्याने जागतिक शांतता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने दिनांक 16 नोव्हेंबर 1945 मध्ये युनेस्कोची (United Nations Educational Scientific and Cultural Organization – UNESCO) स्थापना करण्यात आली. युनेस्कोचे मुख्य कार्यालय पॅरिस (फ्रान्स) येथे आहे.




The **Bureau of Strategic Planning** (BSP) is the central focal point of UNESCO for all strategic, programmatic and budgeting issues, as well as for cooperation with extrabudgetary funding sources and public-private partnerships (PPPs), and it provides advice to the Director-General on all these matters.

**Specific responsibilities of the Bureau of Strategic Planning (BSP) include:**

- preparation and monitoring of the UNESCO Medium-Term Strategy and the biennial Programme and Budget of the Organization in line with the principles of results-based planning and programming;
- implementation of the principles of the results-based management and the risk management approaches;

- monitoring of the implementation of the approved programme and its work plans through regular reviews to assess progress towards the expected results, and report thereon periodically to the governing bodies in the context of the statutory reports;
- leading and coordination of UNESCO's participation in and contribution to United Nations system inter-agency activities, in particular concerning global programme issues, and those aiming to enhance system-wide coherence, globally, regionally and at the country levels;
- integration of a future-oriented approach and foresight in all the fields of competence of the Organization; identify, together with the programme sectors, emerging trends and challenges in the Organization's fields of competences; and undertake future-oriented activities together with the Programme Sectors;
- monitoring the implementation of the programme activities related to the two global priorities of the Organization, Gender Equality and Africa
- promotion of South-South and North-South-South cooperation; support to the least developed countries (LDCs); the small island developing states (SIDS); the most vulnerable segments of society; indigenous peoples; countries in post-conflict and post-disaster situations and to countries in transition as well as middle-income countries;
- coordination and backstopping for the intersectoral platforms;
- leading the intersectoral and interdisciplinary programme of action for a culture of peace and non-violence;
- monitoring the implementation of the integrated comprehensive strategy for category 2 institutes and centres;
- management of the System of Information on Strategies, Tasks and the Evaluation of Results (SISTER) and provisions of capacity training programmes for staff and permanent delegations.




### युनेस्कोची महत्त्वाची कार्ये/उद्दिष्टे

1. शाश्वत विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी पृथ्वीवरील सामाजिक व पर्यावरणीय गंभीर समस्यांचे परीक्षण करणे.
2. गंभीर समस्यांचे निराकरण करण्यासाठी व्यावहारिक उपाययोजना सुचविणे.
3. नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर व काळजी घेणे व भावी पिढ्यांसाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा ठेवा जतन करण्यासाठी उपाययोजना करणे.
4. जागतिक स्तरावर पर्यावरण शिक्षण व पर्यावरण संवर्धनासाठी उपक्रम हाती घेणे.
5. पर्यावरणासंदर्भात असलेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी कृती कार्यक्रम हाती घेणे.
6. आंतरराष्ट्रीय स्तरावर शाश्वत विकासाच्या शिक्षणासाठी बदल करण्यास प्रोत्साहन देणे.
7. शाश्वत विकासाच्या सन 2005 ते 2014 या शाश्वत विकासासाठीच्या शिक्षणाचे दशकाच्या अंमलबजावणीची पडताळणी करणे.
8. शिक्षणासाठी, शाश्वत विकासासाठी चर्चासत्रे, परिषदा व कृती कार्यक्रम जागतिक पातळीवर हाती घेणे.

### 8.2.2 ब. शाश्वत विकासाची ध्येये आणि शिक्षणाची भूमिका

**शाश्वत विकासाच्या विविध परिमिती**

1. भौतिक विकास
2. आर्थिक विकास
3. नैतिक विकास
4. लोकसंख्या विकास
5. राजकीय विकास
6. सामाजिक विकास
7. सांस्कृतिक विकास
8. आंतरराष्ट्रीय धोरण
9. पर्यावरण
10. स्वयंसेवी संस्था

**शाश्वत विकासाच्या शिक्षणाची अंगे**

**शा श्व त वि का स**

- लिंग समभाव
- शिकविण्यापेक्षा शिकण्यावर भर
- सांस्कृतिक शिक्षण
- आजन्म शिक्षण
- मूल्यशिक्षण
- पालक शिक्षण
- बहुउद्देशीय शिक्षण
- गुणवत्तापूर्ण शिक्षण
- समूहसंपर्क साधने
- संप्रेषण व माहिती तंत्रज्ञान
- जागतिक विचार व स्थानिक कृती
- भविष्यकालीन विचार

**शाश्वत विकासासाठी शिक्षणाची भूमिका**

1. शाश्वत विकासातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मबल, आत्मविश्वास व स्वावलंबी बनविता येते.
2. शाश्वत विकासामुळे विकासात सर्वांगांचा विचार केला जातो आणि समता प्रस्थापित होण्यास मदत होते.
3. शाश्वत विकास ही चिरंतन विकासाची दिशा देणारे तंत्र आहे.
4. स्वार्थनिरपेक्ष दृष्टी प्राप्त होण्यासाठी स्वयंकृतीला प्राधान्य दिले जाते.
5. व्यक्तीला सत्य हे अपरिवर्तनीय आहे याची खऱ्या अर्थाने जाणीव होते.
6. शाश्वत विकास हा सत्य व शाश्वत मूल्यांवर उभा राहतो.
7. शाश्वत विकास स्थल काल व व्यक्तीपरत्वे टिकून राहतो.
8. शाश्वत विकासातून व्यक्तीमध्ये कर्म करण्याची भूमिका तयार होते. तसेच इतरांच्या हिताचा विचार होतो.

### 8.2.3 क. जीवनकौशल्यांच्या विकासासाठी शिक्षण

युनेस्कोने फ्रेंच शिक्षणतज्ज्ञ डॉ. जेकब डेलॉर यांचा International Commission on Education for Twenty First Century हा अहवाल सन 1996 मध्ये सादर झाला. त्यानुसार एकविसाव्या शतकातील विद्यार्थ्याने शिक्षणाच्या चार स्तंभांनी परिपूर्ण असले पाहिजेत असे प्रतिपादन केले.

**शिक्षणाचे चार स्तंभ**

1. ज्ञानप्राप्तीसाठी शिक्षण – Learing to know.
2. कृतीसाठी शिक्षण – Learing to do.
3. आस्तित्वासाठी शिक्षण – Learing to be-
4. सहजीवनासाठी शिक्षण – Learing to live together.

ज्ञानाचा, माहितीचा, अपेक्षांचा व लोकसंख्येचा प्रस्फोट झालेल्या एकविसाव्या शतकातील विद्यार्थ्यांना ज्ञान मिळविणे, ज्ञानाचे उपयोजन करणे, स्वतःच्या क्षमता ओळखणे, एकोप्याने राहणे या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आणि गरजेच्या आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने सन 1997 मध्ये जीवनकौशल्ये मांडली.

शिक्षण व प्रत्यक्ष जीवनातील अनुभव यांच्या परस्पसंबंधांची दखल घेऊन राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 मध्ये बदलत्या काळानुसार भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये कराव्या लागणाऱ्या संभाव्य बदलांवर भर देण्यात आला आहे. जीवनातील आव्हानाना सामोरे जाण्यासाठी कालसापेक्ष व समयसापेक्ष मूलभूत जीवनकौशल्ये विकसित करुन ती जीवनातील संदर्भांशी निगडीत ठेवण्यासाठी महाराष्ट्रामध्ये सन 2009 पासून प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात दहा जीवनकौशल्यांचा समावेश करण्यात आला आहे.

**जीवनकौशल्ये**

1. व्यक्तीला दैनंदिन जीवनातील गरजा आणि आव्हाने यांना परिणामकारकपणे सामोरे जाण्यासाठी आवश्यक असलेल्या सकारात्मक आणि समायोजित वर्तनासाठी लागणाऱ्या क्षमता म्हणजे 'जीवनकौशल्ये' होत. ............ जागतिक आरोग्य संघटना
2. जीवनकौशल्ये म्हणजे ज्ञान, दृष्टिकोन आणि कौशल्ये या तिन्ही बाबींचे संतुलन होण्यासाठी आरेखित केलेला वर्तनबदल किंवा वर्तनविकास म्हणजे 'जीवनकौशल्यांचे शिक्षण' होय. ..... युनिसेफ
3. व्यक्तीच्या दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या समस्या व गरजांना सामोरे जाण्यासाठी व्यक्तीने स्वतःच्या वर्तनात स्वीकारात्मक तसेच सकारात्मक बदल घडवून आणण्याची क्षमता म्हणजे 'जीवनकौशल्ये' होत.

**जीवनकौशल्ये**

1. विद्यार्थ्यांमध्ये 'स्व' ची जाणीव निर्माण करणे. (Self Awareness)
2. समानुभूती विकसित करणे. (Sympathy)
3. स्वतःची समस्या सोडविण्यासाठी सक्षम बनविणे. (Problem Solving)
4. निर्णयक्षमता विकसित करणे. (Decision Making)
5. प्रभावी संप्रेषण कौशल्य विकसित करणे. (Effective Communication)
6. सहकार्यात्मक वृत्ती विकसित करणे. (Interpersonal Relation)
7. सृजनशील विचाप्रक्रिया विकसित करणे. (Creative Thinking)
8. चिकित्सक विचारप्रक्रियेचा विकास करणे. (Critical Thinking)
9. भावनांचे समायोजन करण्यास सक्षम बनविणे. (Coping with Emotions)
10. ताणतणावांचे समायोजन करण्यास सक्षम बनविणे. (Coping with Stress)

**जीवनकौशल्यांचे वर्गीकरण**

1. बोधात्मक कौशल्ये – माहितीचे विश्लेषण व उपयोगासाठी.

2. वैयक्तिक कौशल्ये – व्यकितगत संबंध.
3. आंतरव्यक्तीत कौशल्ये – इतरांशी संवाद व आंतरक्रिया.

**जीवनकौशल्यांची गरज**

1. मानसशास्त्रीय क्षमता, आंतरव्यक्तीत कौशल्यांचे संपादन यामुळे समस्या निराकरण, निर्णय क्षमता, सर्जनशील विचार, सौदार्हपूर्ण संबंध इत्यादी कौशल्यांचा विकास करुन स्वस्थ जीवन जगण्यासाठी जीवनकौशल्ये उपयुक्त आहेत.
2. निश्चित वर्तनासाठी जीवनकौशल्ये उपयुक्त आहेत.
3. व्यक्तीमध्ये वेगवेगळे सामर्थ्य येण्यासाठी जीवनकौशल्ये उपयुक्त आहेत.
4. जबाबदारी, पुढाकार, स्वतःवर व भावनांवर नियंत्रण मिळविण्याच्या क्षमता प्राप्त होण्यासाठी जीवनकौशल्ये उपयुक्त आहेत.
5. आरोग्यदायी व सामाजिक कल्याणासाठी जीवनकौशल्ये उपयुक्त आहेत.
6. जीवन आणि शिक्षण या दोन वेगवेगळ्या गोष्टी नसून, शिक्षण हेच जीवन व जीवन हेच शिक्षण असावे यासाठी जीवन कौशल्यांचे शिक्षण आवश्यक आहे.

**जीवनकौशल्यांच्या संपादनासाठी कृती**

1. प्रत्यक्ष कृती.
2. प्रत्याभरण व परावर्तन.
3. दृढीकरण व प्रबलन.
4. दैनंदिन जीवनातील आव्हानांचे प्रत्यक्ष उपयोजन.

**जीवनकौशल्यांसाठी अध्यापन पद्धती**

1. वर्गचर्चा
2. बुद्धीमंथन.
3. स्पष्टीकरण व मार्गदर्शन.
4. भूमिका पालन.
5. दृकश्राव्य आणि कृतीकार्यक्रम – कला, संगीत, नाटक, नृत्य इत्यादी.
6. छोटे गट.
7. शैक्षणिक खेळ व अभिरुपता.
8. व्यक्ती अभ्यास.
9. कथाकथन
10. वादविवाद.

**जीवनकौशल्यांच्या शिक्षणात शिक्षक व पालकांची भूमिका**

1. विद्यार्थ्यांच्या मानसिक, शारीरिक विकासासाठी भावना समजून घेणे.
2. व्यक्तीगत पूर्वग्रहावरुन आपली मते लादू नयेत.
3. स्वतःच्या समस्या स्वतः सोडविण्यासाठी मार्गदर्शन करणे.
4. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढेल अशी परिस्थिती निर्माण करुन, स्वावलंबी भावना, जबाबदारी, स्वतंत्र विचार प्रक्रियेला उत्तेजन देणे.
5. प्रत्येक विद्यार्थ्याची शैक्षणिक, कौटुंबिक व सामाजिक परिस्थिती भिन्न असते या बाबी लक्षात घेणे.
6. कौशल्ये संपादनासाठी पोषक वातावरण निर्माण करणे.
7. विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य व मोकळेपणा देणे.

8. विद्यार्थ्यांच्या भावनेवर नियंत्रण ठेवणे.
9. सकारात्मक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

**8.2.4 ड. सर्वसमावेशित शिक्षण/सर्वसमावशेक शिक्षण**

सर्वसमावेशक शिक्षण ही संकल्पना सर्व शिक्षा अभियानाचा एक भाग आहे. सर्वसमावेशक शिक्षणाची संकल्पना मानवी हक्कातून पुढे आली आहे. सन 1990 मध्ये थायलंडमधील जोमेटियन येथे झालेल्या जागतिक स्तरावरील परिषदेमध्ये सर्वांसाठी शिक्षण ही संकल्पना पुढे आली. ही संकल्पना जागतिक स्तरावर मांडण्यात आली. सन 1994 मध्ये जगातील 93 देश व 25 जागतिक संघटनांनी सर्वसमावेशक शिक्षण ही संकल्पना मान्य केली.

1. सर्वसमावेशक शिक्षण म्हणजे सर्वांना सहभागी करुन घेणारे शिक्षण होय.
2. शिक्षणाच्या वेगवेगळ्या संधी वेगळवेगळ्या मार्गांनी, पद्धतींनी उपलब्ध करून देणे म्हणजे सर्व समावेशक शिक्षण होय.
3. विशेष गरजा असणाऱ्या मुलांचा सर्वसामान्य श़िक्षण योजनने सहभाग होय.

**सर्वसमावेशक शिक्षणासाठी खालील बाबींचा विचार करावा**

1. शाळेची रचना कार्यक्रम व उपक्रम आखताना शाळेतील सर्व मुलांचा विचार केला जावा.
2. प्रत्येक मुलाची बुद्धिमत्ता, आवड, अभियोग्यता व क्षमतांनुसार शिक्षणाची संधी मिळणे आवश्यक आहे.
3. प्रत्येक बालकाला शिक्षणाचा हक्क असून बालक त्याच्या क्षमता समृद्धीपर्यंत शिकू शकते.
4. या पद्धतीनुसार शिक्षण प्रक्रिया प्रभावी होण्यास मदत होते.
5. विशिष्ट गरजा असलेल्या मुलांच्या गरजा विचारात घेऊन सामान्य मुलांत समावेश करण्यात यावा.

**सर्वसमावेशक शिक्षणाची आवश्यकता**

1. अपंगांचे पुनर्वसन करण्यासाठी.
2. सामाजीकरण करण्यासाठी.
3. शिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्यासाठी.
4. शाळेचे स्वरुप समजण्यासाठी.
5. अपंगाना सक्षम बनविण्यासाठी.
6. शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी.
7. प्रशिक्षण देण्यासाठी.

**सर्वसमावेशक शिक्षणाची वैशिष्ट्ये**

1. सर्व प्रकारच्या मुलांना प्रवेश.
2. शालेय उपक्रमांमध्ये सर्वांचा सहभाग.
3. सर्व विद्यार्थ्यांचा विचार.
4. गरजेनुसार वर्ग बदलण्याची व्यवस्था.
5. शिक्षणाबरोबर सामाजिक कार्य.
6. पालकांची भूमिका मित्रत्वाची.
7. मुलांच्या क्षमतेनुसार शिक्षणाची उद्दिष्टे ठरविली जातात.
8. सर्वसामान्य मुले व अपंग मुले यांच्यात आंतरक्रिया घडतात.
9. विशेष गरजा असणाऱ्या मुलांचे स्वागत होते.
10. गरजू मुले शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत यासाठी दक्षता घेतली जाते.

**सर्वसमावेशक शिक्षणाचे मुख्य घटक**

1. अध्ययन सहकार्याचा विकास.

2. विशेष शिक्षकांची भूमिका.
3. समाज व पालकांचा सहभाग.
4. मनुष्यबळ व साहित्य संशोधनाचे आदानप्रदान.
5. गरजाधिष्ठित मार्गदर्शन साहित्य.
6. सामान्य शिक्षकांचे क्षमता संवर्धन.

**सर्वसमावेशक शिक्षणात अपंगत्वाचे प्रकार**

1. अंध बालके / दृष्टिदोष असणारी बालके.
2. कर्णबधिर किंवा श्रवणदोष असणारी बालके.
3. मतिमंद असणारी बालके.
4. अस्थिव्यंग असणारी बालके.
5. अध्ययन अकार्यक्षम बालके.
6. मेंदूचा पक्षाघात असणारी बालके.
7. स्वमग्नता असणारी बालके.

## 8.4 सारांश

शाश्वत विकास म्हणजे स्वतःसाठी, आपल्या मुलांसाठी व त्यांच्या मुलांसाठी काळजी घेणे आणि आपण गेल्यानंतर उत्तम जागा ठेऊन जाणे. भावी पिढीच्या संरक्षणासाठी व विकासासाठी शाश्वत विकास गरजेचा आहे. ब्रुटलॅड आयोग / जागतिक पर्यावरण व विकास आयोगाचे (World Commission of Environment Development -WECD) मिशन चिरंतन विकासासाठी जगातील सर्व देशांना एकत्रित आणणे हे आहे. युनेस्को ही युनोची उपशाखा आहे. शिक्षण, शास्त्र व संस्कृतीच्या मदतीने व एकमेकांच्या सहकार्याने जागतिक शांतता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने दिनांक 16 नोव्हेंबर 1945 मध्ये युनेस्कोची (United Nations Educational Scientific and Cultural Organization – UNESCO) स्थापना करण्यात आली. शिक्षण व प्रत्यक्ष जीवनातील अनुभव यांच्या परस्पसंबंधांची दखल घेऊन राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005 मध्ये बदलत्या काळानुसार भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये कराव्या लागणाऱ्या संभाव्य बदलांवर भर देण्यात आला आहे. जीवनातील आव्हानाना सामोरे जाण्यासाठी कालसापेक्ष व समयसापेक्ष मूलभूत जीवनकौशल्ये विकसित करुन ती जीवनातील संदर्भांशी निगडीत ठेवण्यासाठी महाराष्ट्रामध्ये सन 2009 पासून प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात दहा जीवनकौशल्यांचा समावेश करण्यात आला आहे. सर्वसमावेशक शिक्षण ही संकल्पना सर्व शिक्षा अभियानाचा एक भाग आहे. सर्वसमावेशक शिक्षणाची संकल्पना मानवी हक्कातून पुढे आली आहे. सन 1990 मध्ये थायलंडमधील जोमेटियन येथे झालेल्या जागतिक स्तरावरील परिषदेमध्ये सर्वांसाठी शिक्षण ही संकल्पना पुढे आली. ही संकल्पना जागतिक स्तरावर मांडण्यात आली. सन 1994 मध्ये जगातील 93 देश व 25 जागतिक संघटनांनी सर्वसमावेशक शिक्षण ही संकल्पना मान्य केली. सर्वसमावेशक शिक्षण म्हणजे सर्वांना सहभागी करुन घेणारे शिक्षण होय.

## 8.5 स्वाध्याय

1. शाश्वत विकास म्हणजे काय ?
2. शाश्वत विकासाची संकल्पना व गरज सर्वप्रथम केंव्हा व कोठे मांडली ?
3. शाश्वत विकासाची आवश्यकता स्पष्ट करा.
4. शाश्वत विकासाच्या शिक्षणाची अंगे कोणती ?
5. शाश्वत विकासासाठी शिक्षणाची भूमिका स्पष्ट करा.
6. ब्रुंटलॅड आयोगाची स्थापना केंव्हा झाली ?
7. ब्रुंटलॅड आयोगाची उद्दिष्टे कोणती ?
8. ब्रुंटलॅड आयोगाचे मिशन कोणते ?
9. ब्रुंटलॅड आयोगाला आणखी कोणत्या नावाने संबोधले जाते ?

10. संयुक्त राष्ट्रसंघटनेची (United Nations Organization – UNO) स्थापना केंव्हा झाली ?
11. युनेस्कोची (United Nations Educational Scientific and Cultural Organization – UNESCO) स्थापना केंव्हा करण्यात आली ?
12. युनेस्कोचे मुख्य कार्यालय कोठे आहे ?
13. युनेस्कोची महत्त्वाची कार्ये/उद्दिष्टे कोणती ?
14. युनेस्कोच्या स्थापनेमागे मुख्य हेतू कोणता आहे ?
15. डॉ. जेकब डॉलर यांनी मांडलेले शिक्षणाचे चार स्तंभ कोणते ?
16. जीवनकौशल्ये म्हणजे काय ?
17. जीवनकौशल्यांचा अभ्यासक्रमात केंव्हा समावेश झाला ?
18. दहा जीवनकौशल्ये सांगून कोणत्याही एका जीवनकौशल्याचे स्पष्टीकरण करा.
19. जीवनकौशल्यांचा अभ्यासक्रमात का समावेश करण्यात आला ?
20. जीवनकौशल्ये रुजविण्यासाठी कोणत्या अध्यापन पद्धतींचा अवलंब करावा ?
21. जीवनकौशल्यांच्या शिक्षणात शिक्षक व पालकांची भूमिका विशद करा.
22. सर्वसमावेशक शिक्षण म्हणजे काय ?
23. सर्वसमावेशक शिक्षणाची आवश्यकता स्पष्ट करा.
24. सर्वसमावेशक शिक्षणाची वैशिष्ट्ये कोणती ?

## 8.6 संदर्भ


1. प्रा. आर्. आर्. माने, प्रा. व्ही. आर्. पालकर. समकालीन भारत आणि शिक्षण.
2. डॉ. लता पाटील, डॉ. भारती साकेकर. ज्ञान आणि अभ्यासक्रम.
3. डॉ. शैलजा भंगाळे. समकालीन भारत आणि शिक्षण.
4. डॉ. तापकीर दत्तात्रय, डॉ. तापकीर निर्मला, 2008. शिक्षणाचे तात्त्विक अधिष्ठान, नूतन प्रकाशन पुणे.
5. डॉ. करंदीकर सुरेश, डॉ. करंदीकर मीना, 2010, उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, फडके प्रकाशन कोल्हापूर.
6. प्रा. घोरमोडे यु. य., शैक्षणिक प्रशासन व व्यवस्थापन, विद्या प्रकाशन पुणे.
7. दुनाखे अ. रा., 2009, प्रगत शैक्षणिक तत्त्वज्ञान, नित्य नूतन प्रकाशन पुणे.
8. पारसनीस न. रा., 1998, शिक्षणाची तात्त्विक व समाजशास्त्रीय भूमिका, नूतन प्रकाशन पुणे.
9. डॉ. भोसले रमा, डोणे उज्ज्वला, शिक्षणातील बदलते विचारप्रवाह, फडके प्रकाशन कोल्हापूर.
10. कुंडले म. बा., 1998, शैक्षणिक तत्त्वज्ञान व शेक्षणिक समाजशास्त्र, श्री विद्या प्रकाशन पुणे.
11. प्रा. के. डी. शिंदे, प्रा. अनुराधा गोल्हार, 2017, समकालीन भारतातील शिक्षण, वर्ग आणि समाज, श्री प्रकाशन पुणे.
12. डॉ. चव्हाण संध्या विजय, ज्ञान अभ्यासक्रम आणि भाषार्जन, श्री प्रकाशन पुणे.
13. डॉ. भोसले आरती, प्रा. सरपोतदार प्राची, 2017, ज्ञान आणि अभ्यासक्रम, फडके प्रकाशन कोल्हापूर
14. प्रा. कपोले अरविंद, डॉ. सपकाळे आरती, भारतीय समाज आणि शिक्षण
15. डॉ. पेंडके प्रतिभा, भारतीय शिक्षणपद्धतीचा विकास आणि शालेय प्रक्रियेचे अधिष्ठान, श्री मंगेश प्रकाशन नागपूर